# NUTA BULLETIN

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Licensed to post without prepayment No. NR/ATI/78/2001

YEAR : 35 ) 15th December 2010 ( No : 11


# संपूर्ण सभागृहाने उभे राहून टाळ्यांच्या गजरात प्रा.बी.टी. देशमुख यांना निरोप प्रसंगी दिल्या शुभेच्छा

*महाराष्ट्र विधान परिषद : शुक्रवार, दिनांक ३ डिसेंबर २०१० : तिसरे अधिवेशन २०१०*

(मध्यंतरानंतर)

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांना याची कल्पना आहे की, या सभागृहाचे सन्माननीय ११ सदस्य येत्या ५ डिसेंबर, २०१० रोजी निवृत्त होणार आहेत. निवृत्त होणाऱ्या ११ सदस्यांना नेहमीच्या प्रथेप्रमाणे भावपूर्ण निरोप देण्याच्या दृष्टीने आज विधान भवनाच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ एकत्रित छायाचित्र काढण्याचा कार्यक्रम व विधान भवनाच्या प्रांगणात चहापानाचा कार्यक्रम आयोजित केलेला आहे. सबब, खालील सन्माननीय सदस्यांना निरोप देण्यासंबंधीची बाब आता घेण्यात येत आहे :-

१. श्री. कमलकिशोर नानासाहेब कदम, वि.प.स.
२. श्री. गुरुमुख जगवानी, वि.प.स.
३. श्री. राजेंद्र जैन, वि.प.स.
४. श्री. विलासराव शिंदे, वि.प.स.
५. डॉ. एन. पी. हिराणी, वि.प.स.
६. श्री. विक्रम वसंतराव काळे, वि.प.स.
७. श्री. विश्वनाथ उमाजी डायगव्हाणे, वि.प.स.
८. श्री. रामनाथ दादा मोते, वि.प.स.
९. प्रा. बी. टी. देशमुख, वि.प.स.
१०. डॉ. सुधीर भास्कर तांबे, वि.प.स.
११. श्रीमती वंदना हेमंत चव्हाण, वि.प.स.

**श्री. पांडुरंग फुंडकर** : सभापती महोदय, या सभागृहामधून निवृत्त होणाऱ्या सदस्यांपैकी काही सन्माननीय सदस्य आज उपस्थित नाहीत. याबाबत विधीमंडळ सचिवालयाने त्यांना उपस्थित राहण्याबाबत कळविले होते काय?

**उप सभापती** : निवृत्त होणाऱ्या सन्माननीय सदस्यांपैकी काही सन्माननीय सदस्यांचे पुनरागमन झाले आहे. त्यामुळे त्यांना निरोप देण्याची आवश्यकता नाही.

**श्री. पांडुरंग फुंडकर** : सभापती महोदय, निवृत्त होणाऱ्या सदस्यांपैकी काही सन्माननीय पुन्हा निवडून आले असून त्यांचे सभागृहात पुनरागमन झाले आहे. परंतु त्याशिवाय काही सन्माननीय सदस्य निवृत्त होत आहेत ते आज सभागृहात उपस्थित नाहीत. त्यापैकी सन्माननीय सदस्य श्री. कमलकिशोर कदम उपस्थित आहेत. त्याशिवाय आणखी एक-दोन सन्माननीय सदस्य उपस्थित आहेत.

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**सभापती** : विधीमंडळ सचिवालयाने निवृत्त होणाऱ्या सर्व सन्माननीय सदस्यांना पत्र पाठवून कळविले आहे.

**श्री.पांडुरंग फुंडकर (विधानसभेने निवडलेले)** : ..... सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख हे सातत्याने ३० वर्षे या सभागृहाचे सदस्य आहेत. कोणीही सदस्य सातत्याने ३० वर्षे या सभागृहामध्ये आला असेल असे मला वाटत नाही. सातत्याने ३० वर्षे त्यांनी या सभागृहामध्ये शिक्षकांचे नेतृत्व केले. सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख हे एकदा बोलण्यासाठी उभे राहिले की, त्यांची तोफ थांबत नव्हती. कधी कधी तुम्हाला त्यांना थांबवावे लागत होते, कधी आम्हाला त्यांना थांबवावे लागत होते. दोन वर्षापूर्वी हिवाळी अधिवेशनामध्ये एका प्रश्नावर विचार व्यक्त करीत असतांना सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख एवढे संतापले होते की, बाहेर गेल्यावर त्यांना हृदयविकाराचा झटका आला होता. त्यामुळे त्यांना तावडतोब हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करावे लागले होते. **एखाद्या प्रश्नासाठी जीव तोडून, मनापासून संघर्ष करण्याचा त्यांचा स्वभाव होता. शिक्षण क्षेत्राचा त्यांना प्रचंड अनुभव होता, प्रचंड अभ्यास होता. त्याचा अनुभव आपणही अनेकदा घेतलेला आहे. सन्माननीय**

---

**Nagpur University Teachers' Association**

**MEETING NOTICE : 1**

**DATED : 15.12.2010**

From :
**Prof. Dr. E. H. KATHALE**
Secretary, NUTA N-162, Reshim Bag,
Nagpur-444 009

To,
All the members of the Nagpur University Teachers' Association

Dear members,

I have the honour to inform you that General Body meeting of the Nagpur University Teachers' Association will be held at 12.00 noon, on the Day and the Date mentioned below.

2. If you propose to move any resolution for the consideration of the General Body, you are requested to send such resolution to me, with a copy to Prof. B.T.Deshmukh, President NUTA, No. 3, Subodh Colony, Near, Vidarbha Mahavidyalaya, Amravati 444604 within a period of 10 days from the date of the posting of this Bulletin.

3. It will not be possible to include in the agenda, resolutions received after the due date. So please make it convenient to send such resolutions, if any, within the stipulated time. The place of the meeting will be intimated to you alongwith the agenda.

Thanking you.

Yours faithfully
**Sd/- Dr.E. H. Kathale,**
Secretary, NUTA.

***Time, Day and Date of the Meeting : 12.00 Noon on Sunday, the 27 th February, 2011***

**सदस्य श्री. बी.टी.देशमुख बोलण्यासाठी उभे राहिले की, मागील ५-१० वर्षांचे तारीखवार दाखले देत असत.** हायकोर्टामध्ये जे जे निर्णय झाले असतील किंवा हायकोर्टाने सरकारला जे निर्देश दिले असतील ते याठिकाणी कोट करीत असत. शिक्षण क्षेत्राचा त्यांचा एवढा प्रचंड अभ्यास होता.

सभापती महोदय, विदर्भाच्या अनुशेषाचा विषय आला त्यावेळी माननीय देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली सर्वपक्षीय एक समिती स्थापन झाली होती. त्या समितीच्या माध्यमातून विदर्भाच्या अनुशेषाबद्दल गेल्या १० वर्षांपासून ते या सभागृहात झगडत राहिले. राज्यपालांच्या निदेशानुसार विदर्भाला झुकते माप मिळाले पाहिजे असा त्यांचा नेहमी आग्रह असे. याठिकाणी राज्यपालांच्या निदेशांचे वाचन ते नेहमी करीत असत. राज्यपालांची भेट घेऊन विदर्भावर कसा अन्याय होतो ते त्यांनी अनेकदा सांगितलेले आहे. त्यांनी विदर्भाला न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न अनेकदा केलेला आहे. **अनेकदा सरकारला निर्णय घेण्यास भाग पाडले आहे. सरकारला परिपत्रक बदलण्यास भाग पाडलेले आहे. एकदा तर विनियोजन विधेयकाला सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांनी उपसूचना दिली होती आणि ती सभागृहात मंजूर झाल्यामुळे घटनात्मक पेच निर्माण झाला होता.** त्यावेळी आम्ही या सभागृहात नवखे होतो. या सभागृहात खालच्या सभागृहातून विनियोजन विधेयक आले होते. ते विधेयक जसेच्या तसे मंजूर करण्याची नेहमीची पध्दत आहे. परंतु या सभागृहात ते विधेयक आल्यावर त्यांनी उपसूचना मांडली आणि ती मंजूर झाली होती. त्यामुळे सरकार हादरले होते. **ती उपसूचना मंजूर झाल्यानंतर त्या उपसूचनेसह ते विधेयक पुन्हा खालच्या सभागृहात जाणे आवश्यक होते, परंतु त्यापूर्वीच खालचे सभागृह संस्थगित झाले होते. त्यामुळे विधानसभेचे विशेष अधिवेशन बोलवावे लागले होते. विधिमंडळाच्या कामकाजामध्ये ते एक ऐतिहासिक उदाहरण असेल.** अशापध्दतीने अनेकदा सरकारला कोंडित पकडण्याचा प्रयत्न त्यांच्या माध्यमातून होत होता. जे जे शिक्षण मंत्री व्हायचे त्यांचे इतर सभासदांच्या बोलण्याकडे कमी लक्ष असे, परंतु सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख काय बोलत आहेत, कोणता प्रश्न विचारत आहेत त्याकडे त्यांचे बारीक लक्ष असे. आम्ही त्यांच्याविरुध्द ५ टर्म लढलो, परंतु पाचही वेळी आम्ही जिंकू शकलो नव्हतो. ५ वेळी त्यांनी निवडणूक जिंकली होती, असे त्यांचे व्यक्तिमत्व होते. शिक्षण क्षेत्राला विदर्भातील एक अभ्यासू व्यक्तिमत्व म्हणून ते परिचयाचे आहेत.

सभापती महोदय, शिक्षण क्षेत्राशी ते परिचित होते तसे यावेळी ते एका विषयामुळे चर्चेत होते. **विदर्भात सोफिया नावाचा विद्युत प्रकल्प होत आहे. त्या सोफिया प्रकल्पाविरुध्द ते गेल्या दोन वर्षापासून झगडत होते. महत्प्रयासाने विदर्भात आलेला वर्धा प्रकल्प पूर्ण करुन त्या प्रकल्पातील पाणी शेतकऱ्यांना मिळाले पाहिजे असा त्यांचा आग्रह होता.** परंतु त्यांच्या मनामध्ये शंका होती की, या प्रकल्पातील पाणी सोफिया विद्युत प्रकल्पाकडे वळविले जाईल. विदर्भातील प्रदूषण वाढू नये म्हणून त्यांनी सोफिया विद्युत प्रकल्पाच्या विरोधाला सुरुवात केली. त्यासंबंधी आंदोलने केली. आम्ही तर यापूर्वीही त्यांच्या विरोधात लढलो होतो आणि आताही लढलो होतो. **आमचा उमेदवार जिंकेल की नाही अशी धाकधुक आमच्या मनामध्ये होती. खरे तर प्रा.बी.टी.देशमुख यांच्या विरोधात आमचा उमेदवार नव्हताच. परंतु आम्हाला नंतर अशी माहिती मिळाली की 'सोफिया'ने त्यांना हरवले. सोफियाची ताकद ही एक निगेटिव्ह व्होट म्हणून ते निवडणुकीत पराभूत होण्यास कारणीभूत ठरली. आम्ही आमच्या पध्दतीने काम केले. एक धडाडीचा कार्यकर्ता, अभ्यासू आणि आक्रमक व्यक्तिमत्व म्हणजे प्रा. बी.टी.देशमुख.** विदर्भाचा सिंचनाचा अनुशेष, सोफिया अशा महत्वाच्या विषयावर त्यांनी या सभागृहामध्ये चर्चा घडवून आणल्या. शैक्षणिक धोरणाच्या बाबतीत सरकारला योग्य दिशा देण्याचा त्यांनी प्रयत्न केला. असे हे अभ्यासू व्यक्तिमत्व पुन्हा निवडून येऊ शकले नाही. मी त्यांना शुभेच्छा देतो......

**श्री.अजित पवार (उप मुख्यमंत्री)** : सभापती महोदय, आज आपण या सभागृहाचे सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख, श्री कमलकिशोर कदम, डॉ.एन.पी.हिराणी, डॉ.गुरुमुख जगवानी, सर्वश्री विलासराव शिंदे, विक्रमजी

*शनिवार, दिनांक ४ डिसेंबर २०१० रोजीच्या दैनिक 'लोकमत' मध्ये प्रसिद्ध झालेले वृत्त.*

# बीटी ही एक तोफ होती !

## सभागृहाने उभे राहून टाळ्यांच्या गजरात दिला निरोप

### सोफियाने बीटींचा पराभव केल्याचा फुंडकर यांचा आरोप

### विधानपरिषदेच्या सात सदस्यांना निरोप : मंत्री, आमदारांनी केला चरणस्पर्श

नागपूर दि. ३ (प्रतिनिधी) - उद्दिष्टांसोबत तडजोड करून सभागृहात जायचे की जडजोड न करता बाहेर राहायचे हे ठरविणे महत्वाचे आहे. मी तडजोड न करता बाहेर राहण्याचा मार्ग स्वीकारला, असे सांगत बी.टी.देशमुख यांनी आज सर्वांनाच अंतर्मुख केले.

विधान परिषदेत आज बी.टी.देशमुख यांच्यासह डॉ.एन.पी.हिराणी, विलासराव शिंदे, डॉ.कमलकिशोर कदम, डॉ.गुरुमुख जगवाणी, वंदना चव्हाण, विश्वनाथ डायगव्हाणे या सदस्यांना निरोप देण्यात आला. सर्वप्रथम मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी सर्व सदस्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यानंतर **विरोधी पक्षनेते भाऊसाहेब फुंडकर म्हणाले. बी.टी. ही एक तोफ होती. ती सुरू झाली की तिला थांबविण्याचे सामर्थ्य कुणातही नव्हते.** संयुक्त महाराष्ट्राची भूमिका मांडतांना विदर्भाचा अनुशेष भरुन काढण्याच्या मागणीसाठी सदैव आग्रही. शासनाचे त्यांच्या प्रत्येक वाक्याकडे लक्ष असायचे. त्यांनी सरकारला निर्णय घेण्यास अनेकदा भाग पाडले, असे त्यांनी सांगितले. **बी.टी. सर सोफिया वीज प्रकल्पाविरोधात दोन वर्षापासून लढत होते. सोफियाने त्यांना पाडण्यासाठी पैसा लावल्याचा आरोप करीत ही शोकांतिका असल्याचे त्यांनी सांगितले.**

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, बीटींचा प्रवास ही एका संघर्षाची कहाणी आहे. **सिंचनाच्या प्रश्नावर ते सभागृहात भांडायचे, त्यांचा सखोल अभ्यास व आक्रमकता मला माहित होती. त्यामुळे जलसंपदा खाते माझ्याकडे आल्यावर मी त्यांची धास्ती घेतली होती,** अशी प्रांजळ कबुली त्यांनी दिली. दिवाकर रावते यांनी बीटी हे ऋषीतुल्य व्यक्तीमत्त्व असल्याचे सांगून एका भांडवलदाराने सच्च्या लोकसेवकाच्या भरावासाठी पुढाकार घेणे ही चांगली बाब नसल्याचे सांगितले. गृहमंत्री आर.आर.पाटील म्हणाले, या निवडणूकीत पराभव मूल्यांचा झाला की व्यवस्थेचा, यावर अंतर्मूख होऊन विचार करण्याची गरज आहे. लोकनेत्याला कंत्राटदार जर पैशाच्या बळावर पराभूत करू लागले तर लोकशाहीचे काय होईल, असा यक्ष प्रश्न त्यांनी उपस्थित केला. **सार्वजनिक बांधकाम मंत्री छगन भुजबळ म्हणाले, बीटींना अनेक वर्षाचा इतिहास पाठ होता. त्यांच्या पराभवामुळे खऱ्या अर्थाने या सभागृहाचे नुकसान झाले.** त्यांची रिकामी खुर्ची विचार करण्यास भाग पाडत असल्याचे त्यांनी सांगितले. आ. कपिल पाटील यांनी बीटींचा उल्लेख 'वन मॅन आर्मी' असा केला. एवढ्यात बीटी सभागृहात आले आणि सदस्यांनी बाके बाजवून त्यांचे स्वागत केले.

**उल्हासदादा पवार म्हणाले, बीटींचा पराभव चटका लावून गेला. पैशाच्या बळावर लोकप्रतिनिधीला रोखले जाऊ शकते हे संतापजनक असल्याचे त्यांनी सांगितले. बीटींनी फकिरी वृत्तीने काम केले,** अशा शब्दात त्यांनी त्यांचा गौरव केला. डॉ. कमलकिशोर कदम यांनाही निरोप देण्यात आला. **निरोपाला उत्तर देताना कदम यांनी मला स्वतःच्या जाण्यापेक्षा बीटी या सभागृहात नसणार याचे जास्त दुःख असल्याचे सांगितले.**

निरोप स्वीकारतांना बीटी यांनी आपली तत्त्वे मांडत सर्वांना अंतर्मूख केले. ते म्हणाले कोणतेही प्रतिनिधीत्व हे निरंतर राहू शकत नाही. उद्दिष्टांशी तडजोड करून सभागृहात यायचे की तडजोड न करता बाहेर राहायचे, हे ठरविणे महत्वाचे आहे.

मला हा विषय स्पष्ट दिसत होता. मात्र तडजोड करून या सभागृहात यायचे नव्हते. त्यापेक्षा पराभव पत्करणे मी स्वीकारले. सभागृहात वार करीत असतांना मनात वैर ठेवू नका आणि दुजाभाव दाखवितांना मनात बंधूभाव ठेवा, असा मोलाचा सल्ला त्यांनी दोन्ही बाजूच्या सदस्यांना दिला. सभापती महोदय मी ३० वर्षे खूप त्रास दिला आज मात्र तुम्ही घंटी वाजविण्यापूर्वीच बसतो, असे म्हणत **बीटींनी हसत हसत निरोप घेतला. यावेळी सभागृहातील सदस्यांचे डोळे पाणावले. बीटी बसताच सर्व सदस्य उठले व टाळ्यांच्या गजरात बीटींचा सन्मान केला.**

काळे, विश्वनाथजी डायगव्हाणे, रामनाथजी मोथे, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेंद्र जैन आणि ॲड.वंदना चव्हाण यांना निरोप देत आहोत. ......

.....सभापती महोदय, तसे पाहिले तर देशातील मोजक्याच राज्यांमध्ये द्विसभागृही विधीमंडळे आहेत. त्यामध्ये महाराष्ट्र राज्याचा समावेश आहे. विधानसभा आणि विधानपरिषद अशा दोन सभागृहांची रचना जाणीवपूर्वक केली गेली. आणि समाजातील विविध क्षेत्रातील लोकांच्या ज्ञानाचा, अनुभवाचा फायदा कायदे करीत असताना व्हावा ही त्यामागची कल्पना आहे. आपल्याला माहीत आहे की, हे लोक समाजाकरिता इतके चांगले काम करु शकतात पण निवडून येण्यासाठी मतदारांची जेवढी ताकद आवश्यक असते ती ते उभी करु शकत नाहीत अशांनाच या सभागृहात प्रतिनिधीत्व देऊन समाजकार्य करण्याची संधी मिळाली पाहिजे या संकल्पनेतून हे सभागृह अस्तित्वात आले आहे. यामध्ये अनेक दिग्गजांनी काम केलेले आहे. त्यात माननीय केंद्रीय कृषी मंत्री हे सुध्दा एके काळी या सभागृहाचे सदस्य होते. तसेच माननीय ग.प्र.प्रधान, माजी सभापती माननीय जयवंतराव टिळक, निसर्ग कवी ना.धो.महानोर या लोकांनी उच्च संसदीय मुल्यांची आणि लोकशाहीची जपणूक व शिकवणूक केल्याचे वेळोवेळी राज्यातील जनतेने पाहिलेले आहे. आपल्यातील काही सहकारी सुध्दा त्यांचे अनुकरण करतात म्हणूनच या सभागृहाला एक वेगळे स्थान आहे. या परंपरेतील एक पाईक म्हणून प्रा. बी.टी. देशमुख साहेबांचा मी उल्लेख करणार आहे. त्यांना आपण आदराने बी.टी. भाऊ म्हणून ओळखत होतो. मी गेल्या २१ वर्षापासून विधिमंडळात काम करीत आहे. ज्यावेळेस मला राज्यमंत्री म्हणून काम करण्याची संधी मिळाली तेव्हा मला प्रथम या सभागृहात असलेले बी.टी. भाऊच आठवले. मला तेव्हा वाटले होते की आपण कसे काय यांना तोंड देऊ शकतो ? असाही विचार मनात येऊन गेला. अमरावती विभाग पदवीधर मतदारसंघाचे ते प्रतिनिधीत्व करीत होते. **माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितले ती वस्तुस्थिती खरी आहे. बी.टी. भाऊंचा पराभव होऊ शकत नाही असेच आम्हालाही वाटत होते. गेल्या ३० वर्षापासून ते या सभागृहात अमरावती विभागाचे प्रतिनिधीत्व करीत होते.** सहाव्यांदा उभे राहिले असता त्यांना यश आले नाही. त्यांची कहाणी एक प्रकारे संघर्षाचीच म्हटली तरी चालेल. या विदर्भातील अनुशेष भरुन काढण्यासाठी त्यांनी अत्यंत पोटतिडिकीने आवाज उठविण्याचे काम केले. आपल्यातील काही सन्माननीय सदस्यांनी सुध्दा त्यांना साथ दिली व अतिशय उत्तम काम केले याबद्दल दूमत असण्याचे कारण नाही. **या विभागाचे मंत्री डॉ. पद्मसिंह पाटील यांच्याकडे कार्यभार असताना त्यांचे सवाल-जवाब चालत असताना मी पाहिले आहे. बी.टी. भाऊंचा आक्रमकपणा पाहिला आहे. जेव्हा माझ्याकडे या विभागाची जबाबदारी आली तेव्हा मात्र खरोखरच भीती वाटली होती. परंतु सुदैवाने शासनाने सुध्दा या खात्याला चांगली तरतूद केली व त्यातून विदर्भाच्या बऱ्याच मागण्या गेल्या पाच वर्षात पूर्ण केल्या. परिणामी बराचसा अनुशेष या काळात दूर करण्यात यशस्वी होऊ शकलो. त्याचबरोबर मला सहकारी मंत्री डॉ. सुनील देशमुख हे होते. ते अमरावतीचेच असल्याने त्या दोघांमध्ये चांगला समन्वय साधला जात होता.** प्रा. बी.टी. देशमुख हे तरुणपणापासून विविध चळवळीमध्ये काम करीत होते. हे सर्व करीत असताना विद्यादानाचे व्रत देखील त्यांनी अखंडपणे सुरु ठेवलेले आहे. **तसेच नेतृत्वासाठी आवश्यक असणारे चारित्र्य असल्यामुळे आपोआपच त्यांच्याकडे नेतृत्व चालून आले.** शिक्षकांचे विविध प्रश्न, विदर्भातील सिंचनाचा अनुशेष यावर बी.टी. भाऊ बोलले नाही असे कधीच झाले नाही. माझ्या विभागाशी संबंधित प्रश्न अथवा लक्षवेधी सूचना असतील तर जास्तीची तयारी करुन मी येत होतो, कारण बी.टी. भाऊ आपल्या प्रश्नाची तड लावण्यासाठी एकदम आक्रमक असतात याची मला जाण होती. **आपण पाहिले तर असेही दिसून येत होते की, त्यांनी कधीही शिष्टाचार आणि वर्तनाचा तोल ढळू दिला नाही किंवा त्यांना बोलल्यानंतर कधी शब्द मागे घ्या असे सांगण्याची वेळ त्यांच्यावर आली नाही. अगदी व्यवस्थितपणे सर्व परंपरांचा मान राखत विधिमंडळाला साजेशा प्रकारचे काम केलेले आहे. असे व्यक्तिमत्व पुन्हा सभागृहात यावे असेच वाटत होते.** त्यांना सभागृहाचा निरोप देताना खरोखरच सर्वांच्या भावना येतात. पुढेही त्यांचे काम अशाच पध्दतीने चालेल अशा शुभेच्छा मी सर्वांच्या वतीने देत आहे.......

**श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) :** ..... सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांच्याबद्दल आपण सगळे भरभरुन बोलू शकतो. **खऱ्या अर्थाने त्यांच्या बाबतीत या सभागृहामध्ये एक प्रकारची पोकळी किंवा व्हॅक्युम जाणवेल. सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख हे या सभागृहातील ऋषितुल्य व्यक्तिमत्व होते.** त्यांच्याबद्दल आम्ही काही बोलावे इथपर्यंत आमचा अधिकार आहे की नाही, हे मला माहीत नाही. सातत्याने पाच टर्म ते या सभागृहामध्ये होते. ते नुसतेच या सभागृहामध्ये होते असे नाही. त्यांची बांधिलकी कोणत्याही पक्षाशी किंवा कोणत्याही विचाराशी नव्हती. विदर्भाच्या अनुशेषाच्या संदर्भात आम्ही जी सर्वपक्षीय अनुशेष समिती नेमली होती त्या समितीचे अध्यक्ष सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख होते. ते त्या समितीचे नेतृत्व एवढ्या कडवटपणे करावयाचे की, कोठे तरी आमचे एकमेकांचे राजकीय अभिनिवेश असावयाचे. सर्व पक्षांना विदर्भासाठी लढत असतांना मराठवाड्याचे काय होईल मराठवाड्याच्या बाबतीत लढत असताना पश्चिम महाराष्ट्रातील आमच्या पक्षातील लोक काय म्हणतील यामुळे थोडा तरी निर्बंध असावयाचा. पण सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख हे फक्त विदर्भाच्या लढ्याकरिता समर्पित भावनेने लढावयाचे. अमरावती हा सर्वात जास्त अनुशेष असलेला भाग होता. त्या भागाकरिता त्यांनी जो लढा दिला तो प्रचंड होता. **विनियोजन विधेयकावर उपसूचना मांडणे आणि तांत्रिकदृष्ट्या ती मंजूर करुन घेऊन या सरकारला झुकावयास लावून विधानसभेचे अधिवेशन घ्यावयास लावणे ही जी किमया या सभागृहामध्ये झाली ती सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांच्या कौशल्याची होती हा एक इतिहास आहे.** या सदनामध्ये एखादा सदस्य आपल्या कर्तृत्वावर आणि बुध्दिमत्तेवर एखादी गोष्ट कशी निर्माण करतो याची चुणूक सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख होते. ते आमच्या बरोबर अनेक विषयांवर बोलावयाचे तसेच शिक्षकांच्या विषयावर बोलावयाचे परंतु त्याचवेळेला संत गाडगेबाबा आणि संत तुकडोजी महाराज यांच्या बाबतीत ते भावनाविवश होऊन बोलावयाचे. त्यांनी आय कोट म्हणून एकदा सुरुवात केली व २५

*शनिवार, दिनांक ४ डिसेंबर २०१० रोजीच्या दैनिक 'लोकमत' मध्ये प्रसिद्ध झालेले "विधानपरिषदेतून" - हे विशेष वार्तापत्र.*

## .................... विधान परिषदेतून ....................

# बीटी सर, वुई मिस यू !

गेल्या दोन दिवसांपासून विधानपरिषदेत काही तरी हरवल्यागत स्थिती होती. सत्ताधारी आणि विरोधकांच्या मधोमध पहिल्या रांगेत असलेली एक रिकामी खुर्ची सर्वांनाच खुणावत होती. मान हलवीत **'अध्यक्ष महाराज... अध्यक्ष महाराज...' म्हणून ऐकू येणारा बी.टी.देशमुख सरांचा आवाज नाहीसा झाला होता. आज मात्र तो आवाज पुन्हा ऐकू येईल, याची सर्वांनाच हुरहूर लागली होती. सभागृहात निरोप समारंभ सुरू झाला. मंत्र्यांसह दोन्ही बाजूंच्या सदस्यांनी बीटीबद्दलचा आदर व्यक्त केला. अशातच बीटी सभागृहात आले अन, सर्वांनी बाके बाजवून त्यांना नमन केले.** एकाच मुद्यावर तासन्‌तास भांडणाऱ्या, संवैधानिक सिध्दांत पाळत सरकारची कोंडी करणाऱ्या व न्याय मिळेपर्यंत माघार न घेणाऱ्या बीटींनी गेल्या ३० वर्षात काय कमविले याची प्रचीती आज खऱ्या अर्थाने आली. कुणी बीटींना तोफेची तर कुणी सिंहाची उपमा दिली. अजित पवार यांच्यासारख्या कुणालाही न जुमानणाऱ्या नेत्यालाही आपण बीटी सरांचा खूप धसका घेतला होता, अशी प्रांजळ कबुली सभागृहात द्यावी लागली. अर्थात त्यामागे बीटींची तपश्चर्या आहे. ही तपश्चर्या जवळून पाहणाऱ्या दिवाकर रावते यांनाही बीटींचा उल्लेख ऋषितुल्य करतांना स्वतःच गौरवान्वित झाल्यागत झाले. **चार दिवसापूर्वी झालेल्या निवडणुकीत बीटींचा पराभव झाला. मात्र गोडासाठी उष्टे न खाण्याची भूमिका स्वीकारलेल्या बीटींच्या चेहऱ्यावर या पराभवाचे तसूभरही शल्य नव्हते. तर दुसरीकडे मात्र बीटींना सभागृहात पोटतिडकीने विषय मांडतांना पाहणाऱ्या सदस्यांचे चेहरे चिंतातूर झाले होते. विशेष म्हणजे सभागृहातील दोन्ही बाजूंनी असेच चित्र होते.** राहणारही का नाही? आजवर बीटी सत्ताधारी अन् विरोधकांच्या मधोमध बसून सामान्यांच्या न्यायासाठी दोघांचाही मेळ घालत आले होते. बीटींनी सभागृहात असतांनाही सर्वांना विचार करायला भाग पाडले आणि आज त्यांच्या नसण्यानेही वास्तविकतेचे विदारक चित्र सभागृहासमोर आणले. एका जटिल विषयाला त्यांच्या पराभवाने तोंड फोडले. भांडवलदारांचा पैसा लोकचळवळ चालविणाऱ्या लोकनेत्याला रोखण्यासाठी वापरला जात असेल तर लोकशाहीचे काय? **या प्रश्नावर प्रत्येकाला विचार करण्यास भाग पाडण्याचेही निमित्त ठरले ते बीटीच.** जाता जाताही उद्दिष्टांशी मी तडजोड करणार नाही, असे सांगून बीटींनी सभागृहाला अंतर्मुख केले. 'वन मॅन आर्मी' सारखे काम करणाऱ्या बीटींनी हसत हसत निरोप स्वीकारला. मात्र त्यांची हीच अदा सर्वांना रडवून गेली. सारेच त्यांना नतमस्तक झाले. डोळ्यातून अश्रू पडतात तेव्हा त्याचा आवाज होत नाही याचा अर्थ असा नाही की सरांच्या सभागृहात नसण्याचे आम्हाला दुःख नाही! काहीशी अशींच हळहळ प्रत्येकाने व्यक्त केली.- **कमलेश वानखेडे**

मिनिटे फक्त गाडगे बाबांचे अस्खलित भाषण त्यांच्या भाषेमध्ये या ठिकाणी उदधृत केले ते मी माझ्याकडे संदर्भ म्हणून काढून ठेवले आहे. २५ मिनिटे त्यांनी संत गाडगे बाबाचे भाषण त्यांच्याच भाषेमध्ये त्यांच्या पध्दतीने बोलून दाखविले. असे सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख या सभागृहामध्ये नसणार आहेत. मला आठवते की शिक्षकांच्या एका लढ्यामध्ये शासनाने मान्यता देऊन सुध्दा अधिकारी मान्यता देत नव्हते त्यामुळे त्यांनी विदर्भामध्ये मोठा लढा उभा केला होता तसेच आपल्याकडे त्यांनी फॅक्सद्वारे त्यांचा राजीनामा पाठविला होता. फॅक्सद्वारे आलेला त्यांचा राजीनामा आपण अस्वीकृत करुन आपण त्यांच्या सदस्यत्वाचा सन्मान ठेवला त्याबद्दल मी आपले आभार मानतो. **ते आमदार नसल्यामुळे एकच उणिव भासणार आहे. सोफियाच्या विरोधामध्ये त्यांचा जो तीव्र लढा चालू आहे त्यामध्ये थोडासा पांगुळपणा येईल. कारण आमदार म्हणून त्यांचे जे सामर्थ्य होते ते त्या ठिकाणी वापरत होते. सोफियाच्या विरूध्दचा लढा हा गंभीर लढा आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले की, सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांचा पराभव हा सोफियाच्या सामर्थ्यामुळे झाला. एका भांडवलदाराने या सभागृहातील एका प्रामाणिक, सच्च्या सदस्याचा पराभव करणे ही चांगली बाब आहे असे मला वाटत नाही.** सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांचा मी मनापासून आदर करीत होतो आणि ते या ठिकाणी असो किंवा नसो मी कायम त्यांचा आदर करीत राहीन. ज्यावेळी मी तिकडे जातो तेव्हा सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांना भेटणे हे माझे नेहमीचे काम असते त्याप्रमाणे त्यांना मी अवश्य भेटत जाईन. ....

**श्री.आर.आर.पाटील (गृह मंत्री) :** .... सभापती महोदय, मी आज प्रामुख्याने प्रा.बी.टी. देशमुख सरांच्या संबंधी माझ्या भावना व्यक्त करण्यासाठी उभा आहे. मी जिल्हा परिषदेचा सदस्य असताना वर्तमानपत्रात येणारे त्यांचे नाव वारंवार वाचत होतो. **जिल्हा परिषदेचा सदस्य असताना मुद्दाम त्यांची भाषणे ऐकण्यासाठी विधानपरिषदेच्या प्रेक्षक गॅलरीमध्ये सलग तीन दिवस मी थांबल्याचे मला आजही आठवतेय.** मी मंत्री म्हणून दोन्ही सदनाचे अनुभव घेतले. शिक्षकांच्या प्रश्नावर ग्रामविकास मंत्री असतांना या सदनामध्ये येतांना जितका अभ्यास करुन यायला लागत होता तेवढा तो कधीही करावा लागला नाही. प्रा. बी.टी.देशमुख सर हे कोणता उपप्रश्न कधी काढतील आणि कोणत्या प्रश्नावर सरकारने कधी काळी काय उत्तर दिले होते हे सांगून सरकारला कसे अडचणीत आणतील याचा नेम नसे. **या सभागृहामध्ये कशा पध्दतीने काम करायचे हे प्रा.बी.टी.देशमुख यांच्याकडून शिकण्यासारखे आहे.** त्यांची मते परखड होती. विदर्भाच्या संदर्भात त्यांच्या भावना आणखी तीव्र होत्या. आज ते निवडून आलेले नाहीत. पराभव त्यांचा झाला, त्यांनी स्वीकारलेल्या मूल्यांचा झाला, की पराभव आपल्या व्यवस्थेचा झाला ? या प्रश्नाचा अंतर्मुख होऊन विचार केला पाहिजे. मनाला चटका लावण्यासारखा त्यांचा पराभव आहे. या सदनाला त्यांची उणीव सातत्याने भासत राहील. ....

....सभापती महोदय, माननीय उपमुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांनी जे मत व्यक्त केले तेच मत ४ वर्षापूर्वी मी या सदनामध्ये व्यक्त केले होते. मी माननीय विरोधी पक्षनेत्यांचे भाषण देखील शांतपणे ऐकले आणि वर्तमानपत्रातील काही संकलने देखील मी वाचली. **प्रा. बी.टी.देशमुख सरांच्या पराभवाबाबत प्रसार माध्यमांनी जी अनेक कारणे सांगितली त्याला विरोधी पक्षनेत्यांनी देखील दुजोरा दिला. सोफीयाची ताकद देखील त्यांच्या विरुध्द गेल्यासारखी वाटत होती. जी शंका वर्तमानपत्रवाल्यांना आली तीच शंका या सदनाच्या माननीय विरोधी पक्षनेत्यांना येत असेल आणि जनता त्यावर विश्वास ठेवत असेल तर लोकशाहीमध्ये काम करणा-या कार्यकर्त्याने आता कुठेतरी विचार करण्याची आवश्यकता आहे की, जर पैशाच्या जोरावर कॉन्ट्रॅक्टर, उद्योगपती राजकारणासाठी आयुष्य देणा-या कार्यकर्त्याला पराभूत करु शकत असतील तर कोणती मूल्ये शिल्लक राहतील** ? सभापती महोदय, मी चार वर्षापूर्वी या सदनामध्ये काही सुधारणा सुचविलेल्या होत्या. आज माननीय उपमुख्यमंत्र्यांनी पुन्हा त्याच सुधारणा मांडलेल्या आहेत. पिपल्स रिप्रेझेंटेशन ॲक्टमध्ये दुरुस्ती करण्यासाठी, घटनात्मक बदल करण्यासाठी देशातील १/१० राज्यांनी मान्यता दिली पाहिजे. ही गोष्ट विचारात घेतली तर मग देशातील फक्त ६ राज्यामध्ये विधानपरिषदा आहेत. त्यामुळे बाकीच्या राज्यांना याच्या झळाच बसत नाहीत. त्यामुळे पुढाकार घेऊन याबाबतीत कायदा करण्याची त्यांना आवश्यकता नाही. म्हणून देशात जितक्या राज्यामध्ये विधान परिषदा आहेत त्याच्या १/१० राज्यांनी मागणी केली तर संसदेने त्याबाबतीत विचार केला पाहिजे आणि कुठे ना कुठे राजकारणामध्ये जात, धर्म आणि पैसा हे ह्या ज्या गोष्टी मोठ्या बनत चालल्या आहेत त्यांच्यावर नियंत्रण आणले पाहिजे.

सभापती महोदय, मी ज्यांचा किस्सा सांगणार आहे त्यांना मीही ओळखतो आणि आपणही ओळखता. आज दिवसा जर बाजार मांडला जात असेल तर या सदनाचे आणि राज्यसभेचे महत्व कसे टिकणार याचाही विचार केला पाहिजे. आपल्याच परिसरातील एका नेत्याने राज्यसभेमध्ये जाण्याचे स्वप्न बघितले. सुटे सुटे सहा आमदार निवडले. त्यांना मुंबईच्या ताज हॉटेलमध्ये नेऊन ठेवले. मी विनोदाने त्यांना जे बोललो होतो ते आज मला आठवते. निवडून येण्यासाठी २७ मतांचा कोटा लागतो. कितीही घासलीस तरी २७ मतांचा कोटा मिळणार नाही, का बाजार मांडला आहेस? त्याचा हिशोब माझ्यापेक्षा परफेक्ट निघाला. त्याला माहित होते की, टोटलमधून सहा बाजूला काढले तर शेवटच्या उमेदवाराला सहा मते कमी मिळणार आहेत. त्याने सहा मते बाजूला काढली आणि ज्या उमेदवाराला कमी मते मिळत होती त्याला बाद केले.

**सभापती महोदय, लोकशाहीमध्ये असा विचार मांडला जाणार असेल, एखाद्या कॉन्ट्रॅक्टरविरुध्द, कंपनीच्या विरुध्द मत व्यक्त केले तर त्याच्या विरोधात या कंपन्या निवडणुकीमध्ये उतरणार असतील तर या राज्यातील धनदांडगे लोक कोणालाही या सभागृहात येण्यापासून रोखू शकतात.** जे लोक राजकारणाच्या

*सोमवार, दिनांक १३ डिसेंबर २०१० रोजीच्या दैनिक 'देशोन्नती' मध्ये प्रसिद्ध झालेले वृत्त.*

## *बी.टी.देशमुखांचा पराभव लोकशाहीच्या प्रांगणातील अपघात : राज्यमंत्री भास्कर जाधव*

नागपूर १२ डिसेंबर (जयंत करंजवकर) : माजी आमदार बी.टी.देशमुखांसारख्या अभ्यासू व्यक्तीचा पराभव हा लोकशाहीच्या प्रांगणात झालेला अपघात होय, अशी प्रतिक्रिया राज्याचे नगरविकास राज्यमंत्री भास्करराव जाधव यांनी व्यक्त केली, सभागृहात काही ठराविक सदस्यच अभ्यासपूर्वक बोलतात. लोकांच्या प्रश्नांकडे राज्य सरकारचे लक्ष वेधण्यासाठी सदस्यांकडे सभागृहातील विविध मार्ग, आयुधे व साधने आहेत ते वेलमध्ये जाऊन आग्रह करु शकतात, पण त्यामुळे उपस्थित केलेला प्रश्न सामाजिक हिताला किती पोषक आहे, हे पाहिले पाहिजे, काही सदस्य त्यांच्या साहेबांची शाबासकी मिळेल आणि टि.व्ही. चॅनेलसाठी ब्रेकींग न्यूजही होईल, ही अपेक्षा ठेवून सदस्य वागू लागले तर जनतेचे प्रश्न सुटण्यास अडथळे निर्माण होऊ शकतात. बी.टी.देशमुखांसारखे आमदार त्यांच्या अभ्यासपूर्ण भाषणाने जनतेला प्रश्नांना न्याय मिळवून देत होते. त्यांच्या भाषणाने सरकारला मागण्या मान्य कराव्या लागत होत्या. बी.टी. भाऊंचा पराभव हा लोकशाहीला कळत नकळत अपघात आहे. याचा मी पुनरुच्चार करीत आहे, असे राज्यमंत्री जाधव यांनी सांगितले, ते आजपर्यंत वेलमध्ये गेले नाही. सरकारला लोकांच्या भावना कळतील अशा भाषेतच सभागृहात प्रश्नांची मांडणी केली. त्यामुळेच जागेवर उभे राहून सरकारला ठणकावले आहे, म्हणून त्यांच्यावर वेलमध्ये जाण्याची वेळ आली नाही, असेही जाधव पुढे म्हणाले. ते पुढे म्हणाले की, काही माणसं व्यक्ती नसून विचार असतात. बी.टी.देशमुख व्यक्ती म्हणून मी गेली १५ वर्षे विधिमंडळात सदस्य म्हणून त्यांना ओळखतो. साडे-तीन वर्षे त्यांच्याबरोबर विधानपरिषदेत आमदार म्हणून काम करण्याची संधी मला मिळाली. बी.टी. समोर एक वर्ष मंत्री म्हणून काम केले. माझ्या आमदार व मंत्री पदाच्या कारकिर्दीत बी.टी.भाऊंना पाहिले ते बी.टी. भाऊ आपल्या तत्वापासून आपल्या वैचारिक बांधिलकीपासून आणि सामाजिक हिताच्या संघर्षापासून तसूभरही मागे हटलेच नाहीत, परंतु विचलितही झाले नाहीत. म्हणून त्यांच्या पराभवाचीच महाराष्ट्रात चर्चा झाली व लोकही हळहळले.

**विरोधात उमेदवार उभा करायला नको होता : आ. घनदाट**

बी.टी. देशमुखासारख्या अभ्यासू आमदाराविरुद्ध उमेदवारच उभा करायला नको होता. बरं त्यांच्या विरोधात उमेदवार उभा करून काय मिळविले, असा प्रश्न आमदार (मामा) घनदाट यांनी या निमित्ताने केला. सभागृहात जनतेच्या प्रश्नांची जाण असलेले अभ्यासू सदस्य कमी होत आहे, ही फार मोठी शोकांतिका आहे. याबाबत सर्वच राजकीय पक्षांनी आता विचार करायची वेळ आली आहे, असे सांगून आमदार घनदाट म्हणाले की, मी विधानभवनात नोकरी करीत होतो, त्यामुळे सभागृहाचा सदस्य नसतांना मला बापूसाहेब काळदाते, एस.एम.जोशी, रामभाऊ म्हाळगी यांची भाषण ऐकण्याचा योग आला होता. त्यांच्या मुखातून महाराष्ट्राच्या जनतेच्या व्यथा बोलत होत्या आणि त्यांचे मार्गदर्शन संबंधित मंत्र्यांना उपयुक्त ठरत असे. हा सभागृहातील दरारा आता नाही. याचे सारखे दुःख होते. बी.टी.देशमुख यांचा पराभव लोकशाहीला काळिमा आहे. त्यांनी हयातभर लोकशाही जपली. ती स्वतःसाठी नाही तर लोकांसाठी, असे आमदार घनदाट यांनी व्यथित होऊन सांगितले,

धकाधकीमध्ये भाग घेऊ इच्छित नाहीत, ज्या लोकांची लोकशाही व्यवस्थेला गरज आहे, संसदीय पध्दतीला गरज आहे असे लोक या सदनामध्ये यावेत म्हणून या वरिष्ठ सभागृहाची रचना केलेली आहे. मला जी माहिती मिळाली ती तोंडी माहिती आहे. या संदर्भात खास कोणतेही पुरावे ठेवले जातात अशातला भाग नाही. परंतु महाराष्ट्रामध्ये कालच्या निवडणुकीमध्ये झालेल्या एका विधानपरिषदेच्या मतदारसंघातील सगळ्या उमेदवारांचा मिळून खर्च ७५ कोटीचा असेल, त्याची उघडपणाने सगळीकडे चर्चा होत असेल तर उद्या कोणता सर्वसामान्य माणूस निवडणूक लढविण्यास तयार होईल? कोण तज्ज्ञ, साहित्यिक या सभागृहात येतील?

सभापती महोदय, सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांनी मांडलेली सूचना अत्यंत चांगली आहे. या देशामध्ये कितीही चांगले कायदे करा, त्यावर मार्ग काढणारी डोकी कायदे करणाऱ्यांपेक्षा नेहमीच वरचढ ठरत आलेली आहेत. आज राज्यसभेमध्ये पक्षाने उमेदवारी द्यावी आणि पक्षाने उघडपणाने मदत करावी अशा पध्दतीची भूमिका घेतली. या देशातील एक गलेलठ्ठ उद्योगपती, कोणताही राजकीय पक्ष त्याला उघडपणाने समर्थन द्यायला तयार नव्हता. परंतु कोणत्याही राजकीय पक्षाचे समर्थन मिळविण्याची ताकद त्याच्याकडे होती. मार्ग काय निघाला? सगळ्या राजकीय पक्षांनी मिळून त्याला निवडून येण्यासाठी आवश्यक असलेला मताचा कोटा भरुन दिला. राज्यसभेच्या निवडणुकीमध्ये आमदार पैसे घेतात, नगरसेवक पैसे घेतात, जिल्हा परिषदेचे सदस्य पैसे घेतात म्हणून यावर पक्षाचा आदेश देण्याचा निर्णय घेतला. यात पक्षाने पैसे घेणे उपयोगाचे नाही. आज राज्यसभेमध्ये आणि वरिष्ठ सभागृहात ही उद्योगपतींची घराणी कार्यरत झालेली आहेत आणि आज का पुढे निघाली आहेत याचा देश स्तरावर विचार केला जाण्याची आवश्यकता आहे. हा अधिकार पक्षाला देत असतांना किमान ज्याला संधी दिली जाते तो दोनतीन वर्षे तरी पक्षाचा सदस्य असला पाहिजे. आज पक्षामध्ये येतो आणि पक्ष त्याला उमेदवारी देतो आणि खुशाल तो वरिष्ठ सभागृहात जाऊन बसतो. या सदनाचे महत्व भविष्यामध्ये टिकवायचे असेल तर, खालच्या सभागृहात घाईगडीबडीने कायदे मंजूर होऊ नयेत, भावनेच्या आहारी जाऊन कायदे होऊ नयेत म्हणून समाजातील तज्ज्ञ मंडळी या सदनामध्ये यावीत. यापूर्वी दोनदा ठराव केला आहे. केंद्र सरकार वेळेत त्याची दखल घेत नसेल तर आणखी खास विनंती आपण पार्लमेंटला करावी, केंद्र सरकारला करावी. आज या सदनामधील काही निवृत्त सदस्यांना निरोप देत असतांना शेवटचा ठराव म्हणून जे दोन ठराव आपण पूर्वी केले त्याची लवकर अंमलबजावणी व्हावी असा तिसरा ठराव मंजूर करुन तो केंद्र सरकारकडे पाठवावा. हा ठराव केला आणि या व्यवस्थेमध्ये बदल झाला तर ज्यांना निरोप देत आहोत त्यांना खरा निरोप दिल्याचे समाधान आपल्याला आणि त्यांनाही मिळेल. जे निवृत्त झाले त्यांना चांगले आरोग्य लाभो, चांगले आयुष्य लाभो. ते या सदनामध्ये येऊ शकले नसले तरी वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये त्यांना चांगले काम करण्याची संधी भविष्यात सुध्दा मिळावी अशा पध्दतीच्या भावना व्यक्त करतो. निवडणुकीच्या धकाधकीत जे पुनर्नियुक्त झाले त्यांचे मनापासून अभिनंदन करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

**श्री. छगन भुजबळ (सार्वजनिक बांधकाम मंत्री)** : सभापती महोदय, सभागृहाचे सन्माननीय सदस्य असलेले आणि ज्यांची टर्म संपलेली आहे त्यांच्या निरोप समारंभात माझे विचार मी व्यक्त करणार आहे. विशेषतः यातून पुनरागमन होत असलेले सन्माननीय सदस्य म्हणजे डॉ. सुधीर तांबे, प्रा. रामनाथ मोते, श्री. विक्रम काळे आणि श्री. राजेंद्र जैन यांचे मी मनापासून अभिनंदन करतो व त्यांच्या सभागृहातील तसेच समाज जीवनातील पुढील कामामध्ये त्यांना यश मिळेल अशी शुभेच्छा व्यक्त करतो.

.... सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांचे आपण कर्तृत्व पाहिलेले आहे. **सभागृहात एखादा विषय लावून धरला तर मंत्र्यांना त्याचे उत्तर द्यावेच लागत असे. प्रा.बी.टी.देशमुखांना उत्तर दिल्याशिवाय कोणीच बसवू शकत नव्हते. त्यांना कोणीही बनवू शकत नव्हते.** मा. देशमुख साहेबांच्या प्रश्नांना योग्य उत्तर दिल्याशिवाय ते कधीच बसत नसत. प्रा. बी.टी. देशमुख यांनी प्रश्न विचारला आणि त्या प्रश्नाला आपण उत्तर दिले आणि पुढील काही दिवसात तोच प्रश्न आला की, आपण ती माहिती विसरुन जातो परंतु त्यांनी २-५-१० वर्षापासून कोणत्या सेशनमध्ये कोणता प्रश्न विचारला होता, त्यावेळेस मंत्र्यांनी काय उत्तर दिले होते, त्यानंतर काय कार्यवाही झाली, कार्यवाही का झाली नाही? या सगळया गोष्टींचा ते पाढा वाचत असत. मा.प्रा.बी.टी.देशमुखांनी प्रश्न विचारल्यानंतर बहुतेक मंत्र्यांना निरुत्तर व्हावे लागत असे. सभागृहात अभ्यास कसा करुन यावयाचा याचे ते एक उत्तम उदाहरण आहे. ते अतिशय कष्ट करुन अभ्यास करुन प्रश्न विचारीत असत. प्रश्न विचारल्यानंतर त्यांनी कधीही तडजोड केली नाही. मा.प्रा.बी.टी.देशमुखांनी शिक्षकांच्या प्रश्नावर सुध्दा कधीही तडजोड स्वीकारली नाही. **मा.प्रा.बी.टी.देशमुखांच्या हरण्यामुळे केवळ अमरावतीचेच नुकसान झाले अशातला भाग नाही तर विदर्भाचे नुकसान झाले. केवळ विदर्भाचेच नुकसान झाले असे नाही तर या सभागृहाचे सुध्दा मोठे नुकसान झालेले आहे.** अशा चांगल्या माणसाला आपण सभागृहात आणू शकलो नाही याचे मला दुःख आहे. विदर्भाच्या अनुशेषाच्या बाबतीत मा. श्री.नितीनजी गडकरी आणि मा.प्रा.बी.टी.देशमुखांनी जे कार्य केलेले आहे त्या कार्याला तोड नाही. त्यांनी केलेला अभ्यास, प्रत्यक्ष शब्दाचा अर्थ काढावयाचा आणि तोच प्रश्न करुन मंत्र्यांपुढे फेकावयाचा आणि उत्तर द्या म्हणून सांगावयाचे याला कधीही तोड होऊ शकणार नाही. खरे म्हणजे अशा लोकांकडून शिकूनच आपण मोठे होत असतो. परंतु ते ग्रहण करण्याची शक्ती सुध्दा आपल्यामध्ये पाहिजे असते. चांगल्या लोकांकडून आपण शिकले पाहिजे. प्रत्येक मनुष्य हा शेवटपर्यंत विद्यार्थी असतो व त्याला शिकावेच लागत असते. **मा.प्रा.बी.टी.देशमुखांच्या न येण्यामुळे सभागृहाचे नुकसान झालेले आहे. मा.प्रा.बी.टी.देशमुख हे गेल्या ३० वर्षापासून या सभागृहाचे सदस्य होते. मा.प्रा.बी.टी.देशमुखांनी समाजाची सेवा करीत असतांना आपल्या तब्येतीकडे कधीही पाहिले नाही. त्यांची तब्येत मध्यंतरी खराब झाली होती त्यावेळेस आम्ही त्यांना भेटावयास गेलो होतो.** परंतु तब्येत बरी नसतांना सुध्दा ते कधीही थांबले नाहीत. दुर्दैवाने मा.प्रा.बी.टी.देशमुख यावेळी येऊ शकले नाही ही वस्तुस्थिती आहे.एकदा नागपूर अधिवेशनात प्रा.बी.टी.देशमुख आजारी पडले, त्यांना

*शनिवार, दिनांक ४ डिसेंबर २०१० रोजीच्या दैनिक 'जनमाध्यम' मध्ये प्रसिद्ध झालेले वृत्त.*

## *'बी.टी.भाऊं'चे सभागृहात नसणे, हे राज्याचे नुकसान : छगन भुजबळ*

**नागपूर, ३ डिसेंबर** (प्रतिनिधी)- ज्येष्ठ नेते बी.टी.देशमुख हे सलग तीस वर्षे विधान परिषदेचे सदस्य होते. त्यामुळे त्यांच्या अनुभवाचा, विचारांचा या सभागृहाला सातत्त्याने लाभ झाल्याचे नमूद करून भुजबळ म्हणाले की, एखादा विषय बी.टी.भाऊंनी लावून धरला की पूर्णतः समाधान होईपर्यंत ते त्याचा पिच्छा पुरवत असत. मंत्र्यांनाही निरुत्तर करण्याची क्षमता त्यांच्या अभ्यासपूर्ण आणि अमोघ वक्तृत्वशैलीत होती. जनतेच्या प्रश्नांबाबत त्यांनी कधीही, कुठलीही तडजोड स्वीकारली नाही. विदर्भाचा अनुशेष भरून काढण्यासाठी त्यांनी दिलेल्या लढाईला तोड नाही. त्यांच्या पराभवामुळे केवळ अमरावतीचे किंवा विदर्भाचेच नव्हे; तर संपूर्ण सभागृहाचे नुकसान असल्याची खंत आज सार्वजनिक बांधकाम मंत्री छगन भुजबळ यांनी विधान परिषदेत व्यक्त केली.

निवडणुकीच्या माध्यमातून विधीमंडळात थेट प्रवेश न करू शकणाऱ्या विविध क्षेत्रातील विद्वान, तज्ज्ञ व्यक्तींच्या अनुभवाचा लाभ कायदेमंडळास व्हावा, यादृष्टीने विधान परिषद सभागृहाची योजना करण्यात आली आहे. मात्र, या सभागृहापासून सरस्वतीपुत्र दूर रहायला लागले आणि लक्ष्मीपुत्रच पुढे यायला लागले, तर या व्यासपीठाचे औचित्य, पावित्र्य रहाणार नाही, असेही भुजबळ म्हणाले, महाराष्ट्र विधान परिषदेतून येत्या ५ डिसेंबर रोजी निवृत्त होणाऱ्या अकरा सदस्यांच्या निरोप समारंभात ते बोलत होते.

सुमारे तीस वर्षे या वरिष्ठ सभागृहाचे सदस्य राहिलेल्या बी.टी.देशमुख यांना केवळ काही उद्योजकांच्या विरोधी प्रयत्नांमुळे निवडून येण्यापासून वंचित राहावे लागल्याबद्दल खंत व्यक्त करून भुजबळ म्हणाले, निवडून येण्याइतकी क्षमता नसलेल्या किंवा राजकारणापासून दूर असलेल्या, परंतु समाजाच्या विविध क्षेत्रांत तसेच आपापल्या विषयांत तज्ज्ञ असलेल्या व्यक्तींच्या अनुभवाचा आणि ज्ञानाचा लाभ कायदेमंडळास व्हावा, यादृष्टीने लोकशाहीत विधान परिषदेच्या व्यासपीठाची निर्मिती करण्यात आली आहे. मात्र, या व्यासपीठावर येण्यासाठी पैशांच्या बळावर गैरप्रकारांचा अवलंब होऊ लागला, तर या व्यासपीठाच्या भवितव्याविषयीच चिंता वाटते. वाढत्या आर्थिक व्यवहारामुळे यापुढे सर्रास पदे विकत घेण्याचेच प्रकार होणार की काय, अशी शंका येते. खऱ्या अर्थाने जनतेची सेवा करण्याची तळमळ असणाऱ्या व्यक्तींना त्यामुळे काम करण्याची संधी मिळणार नाही. त्यासाठी विधानपरिषद अथवा राज्यसभेमध्ये येण्यासाठी ज्या वेगवेगळ्या प्रयोगांचा अवलंब केला जात आहे, ते वेळीच रोखले जाण्याची गरजही भुजबळ यांनी याप्रसंगी व्यक्त केली.

रुग्णालयात दाखल करण्यात आले. आम्ही त्यांना पहावयास रुग्णालयात गेलो होतो.काही दिवसानंतर ते बरे होऊन घरी गेले. पण त्यानंतरही त्यांचा जोश कमी झालेला नाही. पूर्वीप्रमाणेच अभ्यास करण्याचा जोश,कष्ट करण्याची तयारी होती. दुर्दैवाने ते पुन्हा या सभागृहात निवडून येऊ शकले नाहीत. ....

.... याठिकाणी माननीय उपमुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार व गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी सांगितले की, यापुढे या व्यासपीठाचे काय होणार आहे ? या व्यासपीठावर येण्यासाठी फक्त विकत घेण्याचे प्रकार होणार आहेत काय ? या व्यासपीठावर विद्वान, विद्वत्ताप्रचूर, तळागाळातील जनतेची तळमळीने सेवा करणारे लोक येथे येऊ शकणार नाहीत काय ?....

.... सभापती महोदय, विधान परिषदेचे व्यासपीठ कशासाठी निर्माण झाले आहे? क्रीडा, शैक्षणिक, सांस्कृतिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती सार्वजनिक निवडणुकीतून निवडून येऊ शकत नाही. त्यांच्या ज्ञानाचा , विद्वत्तेचा व सेवेचा फायदा सर्वसामान्य जनतेला झाला पाहिजे यासाठी विधान परिषदेचे व्यासपीठ तयार करण्यात आले आहे.या व्यासपीठापासून सरस्वतीपुत्र लांब रहावयास लागले, ते निवडणूक हरावयास लागले आणि फक्त लक्ष्मीपुत्रच निवडून यावयास लागले तर या व्यासपीठाची किंमत राहणार नाही. या व्यासपीठाची किंमत शुन्य होईल. या ठिकाणी माननीय उपमुख्यमंत्र्यांनी किंवा माननीय गृहमंत्री श्री आर. आर. पाटील यांनी जे सांगितले ते अगदी बरोबर आहे. तज्ज्ञ व्यक्ती सभागृहात निवडून येण्यासाठी जरुर तर नियमामध्ये बदल करावयालाच पाहिजे. **आज कोट्यावधी रुपये निवडणुकीत खर्च करावे लागतात असे आम्ही सुध्दा ऐकत असतो. हे काय चालले आहे ?. सर्वसामान्य माणसाच्या हातामध्ये ही निवडणूक राहणार आहे किंवा नाही ? महात्मा गांधीनी स्वातंत्र्य मिळवले आणि जे स्वराज्य आपण उपभोगत आहोत ते स्वराज्य फक्त लक्ष्मी पूत्रांसाठीच राहणार आहे काय ? विधान परिषद असो वा राज्यसभा असो त्या ठिकाणी होणाऱ्या निवडणुकीत निवडून येण्याकरता जे काही वेगवेगळे प्रयोग आज सुरु झालेले आहेत त्या प्रयोगाकडे या राज्यातील तसेच देशातील धुरीणांनी अतिशय गांभिर्याने पाहणे अतिशय गरजेचे आहे.** तसे झाले तरच ज्यासाठी ही यंत्रणा निर्माण केली आहे आणि हे व्यासपीठ निर्माण केले आहे त्याचे पावित्र्य वाचणार आहे अन्यथा हे पावित्र्य संपणार आहे. या निमित्ताने त्यांनी जी मागणी केलेली आहे त्याला मी पाठिंबा देतो. विधान परिषदेच्या निवडणुकीत जे सन्माननीय सदस्य पुन्हा निवडून आले आहेत त्यांचे मी अभिनंदन करतो आणि जे पुन्हा निवडून येऊ शकले नाहीत त्यांना बाहेरच्या जगतात , राजकीय क्षेत्रात सुयश मिळावे अशा प्रकारच्या शुभेच्छा व्यक्त करुन मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

**श्री.कपिल पाटील(मुंबई विभाग शिक्षक)** : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख या सभागृहात पुन्हा निवडून आलेले नाही याचे वैषम्य, त्याची हळहळ गेले तीन दिवस या सभागृहात मी सातत्याने ऐकत आहे.

( सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख सभागृहात प्रवेश करतात )

सभापती महोदय,सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख सभागृहाची शान होते इतकेच नव्हे तर विदर्भाची तळपती तलवारसुध्दा होते........

या सभागृहामध्ये केवळ विदर्भाच्या प्रश्नावर नाही तर या राज्यातील सर्व मागासलेल्या प्रदेशांच्या प्रश्नांवर वन मॅन आर्मी म्हणून जर कुणी काम केले असेल तर ते फक्त माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांनी केले आहे, हे मी गेली चार वर्षे प्रत्यक्ष अनुभविले. त्यापूर्वी गेली १५ वर्षे वार्ताहर गॅलरीमध्ये बसून मी त्यांचे सभागृहातील कामकाज पहात होतो आणि अनुभव घेत होतो. अशाप्रकारे या सभागृहामध्ये गेल्या २० वर्षामध्ये असे लढणे मी कधीही पाहिलेले नाही. **माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर साहेबांनी माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख साहेबांच्या प्रश्नाला तोंड फोडले त्या प्रश्नाकडे मला आपले लक्ष वेधावयाचे आहे. या सभागृहाच्या नेत्यांनी, आदरणीय दादांनी एका महत्वाच्या मुद्याला हात घातल्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सोफियाच्या संदर्भातील कारण याठिकाणी सांगितले त्यामुळे माननीय सदस्य प्रा.बी.टी. देशमुख साहेब या सभागृहामध्ये पुन्हा निवडून येऊ शकले नाहीत.** या सभागृहाबाहेरील शक्ती, राजकारणाबाहेरील शक्ती संसदेमध्ये काय होणार हे आता ठरवावयास लागली आहे. पूर्वीच्या काळात कोणते कायदे करावयाचे, कुणाच्या बाजूने करावयाचे याचा निर्णय ही शक्ती घेत होती. परंतु आता सभागृहामध्ये कुणाला पाठवावयाचे, कुणाला पाठवावयाचे नाही याचाही निर्णय ही शक्ती घेऊ लागली आहे याचे दुःख वाटते. अशावेळी सत्ताधारी राजकीय पक्ष तटस्थ भूमिका घेतो, त्यावेळी अशाप्रकारच्या बाह्य शक्तिंची शक्ती नेहमी वाढत रहाते. आणि म्हणून याकरिता सभागृहामध्ये बसलेल्या सर्व राजकीय शक्तिंनी आम्ही कुणाच्या बाजूने उभे रहाणार आहोत या संदर्भात निर्णय घेतला पाहिजे. केवळ तटस्थ भूमिका घेतली तर नको त्या शक्ती फोफावतात. याकडे मला या सभागृहाचे लक्ष वेधावयाचे आहे. सभापती महोदय, या विधानपरिषदेच्या निवडणुकीमध्ये निवडून येण्यासाठी पैश्यांनी मते विकत घेतली जातात हा विषय उपस्थित करुन माननीय उप मुख्यमंत्र्यांनी या प्रश्नाला हात घातला. आणि त्याबाबत त्यांनी सांगितलेले खर्चाचे आकडे पाहिल्यानंतर आपण अचंबित होतो.....

**श्री.उल्हास पवार** : सभापती महोदय, मला जाणीव आहे आणि माझ्या लक्षात देखील आले आहे. आज याठिकाणी आपल्या सभागृहाचे ११ सन्माननीय सदस्य निवृत्त होत आहेत. त्यापैकी ४ सन्माननीय सदस्य पुन्हा सदनामध्ये निवडून आलेले आहेत. यामध्ये सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, राजेंद्र जैन, डॉ.सुधीर तांबे आणि सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांचे पुन्हा सदनामध्ये आगमन झालेले आहे, त्यांचे मी प्रथम स्वागत करतो. पण जे सन्माननीय सदस्य आता निवृत्त होत आहेत, त्यांच्याबाबत याठिकाणी सर्वांनीच आपल्या भावना विस्तृतपणे व्यक्त केल्या आहेत. एकूण लोकशाहीच्या या प्रक्रियेचे एक उत्तम असे विचारमंथन या सभागृहाच्या माध्यमातून सर्वदूर लोकांपर्यंत आणि केंद्र सरकारपर्यंत पोहोचविण्याचा आपण प्रयत्न केलेला आहे.

.... सभापती महोदय, विशेषतः सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख

*रविवार, दिनांक ५ डिसेंबर २०१० रोजीच्या दैनिक 'देशोन्नती' मध्ये प्रसिद्ध झालेले वृत्त.*

# राजकारणातील आदर्श, अभ्यासू, तत्त्वशील, बाप माणूस

## बी.टी.देशमुखांना वरिष्ठ सभागृहाचा भावपूर्ण निरोप

**नागपूर ४ डिसेंबर** (प्रतिनिधी) : **राजकारणातील आदर्श, सिंचनाच्या अनुशेषावरील गाढे अभ्यासक, तत्वशील, तडजोड न करणारे व्यक्तिमत्त्व अशा शब्दात विधान परिषदेतील ज्येष्ठ सदस्य बी.टी.देशमुख यांना वरिष्ठ सभागृहाने भावपूर्ण निरोप दिला. सभापती शिवाजीराव देशमुख म्हणाले, बी.टी.देशमुखांना एकदा शिक्षणमंत्र्यांची ऑफर देण्यात आली होती, परंतु त्यांनी नाकारली. आपल्या तत्त्वाशी ते नेहमी प्रामाणिक राहिले.** मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी बी.टी.देशमुख अभ्यासू, दांडगा अनुभव असलेले लोकप्रतिनिधी असल्याचे मत व्यक्त केले. वरिष्ठ सभागृहाचे नेते उपमुख्यमंत्री अजित पवार यावेळी म्हणाले की, बी.टी. देशमुखांनी विदर्भातील सिंचनाचा अनुशेष भरून काढण्यासाठी मोलाचे काम केले. नेतृत्वासाठी आवश्यक असलेले चारित्र्य त्यांच्याकडे होते. शिष्टाचारात त्यांनी आपल्या वर्तनाचा तोल कधी ढळू दिला नाही, अशा शब्दात आपल्या भावना व्यक्त केल्या, विरोधीपक्ष नेते पांडुरंग फुंडकर यांनी बी.टी.देशमुखांना हरवणे भाजपला कधीही जमले नसल्याची कबुली दिली. त्यांच्यासारखे अभ्यासू व्यक्तिमत्व वरिष्ठ सभागृहात राहणार नाही, याचे दुःख वाटते, दिवाकर रावते म्हणाले की, बी.टी. देशमुख केवळ आमदार नव्हते तर ते एक सच्चे लोकप्रतिनिधी होते.

गृहमंत्री आर.आर.पाटील यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. जि.प. सदस्य असतांना बी.टी.देशमुखांचे भाषण ऐकण्यासाठी आपण अनेकदा सभागृहाच्या गॅलरीत येत असल्याची आठवण त्यांनी सांगितली. छगन भुजबळ म्हणाले की, बी.टी.नी विचारलेल्या प्रश्नावर उत्तर द्यावेच लागते. त्यातून सुटका नाहीच, मंत्र्यांना अनेकदा घामही फुटतो, इतका त्यांचा अभ्यास दांडगा असायचा. या शिवाय कपिल पाटील, उल्हास पवार, सुरेश नवले, हेमंत टकले आदींनीही आपल्या भावना व्यक्त केल्या.

**वार करतांना वैऱ्याची भूमिका नको** : लोकांचे प्रश्न सोडविताना एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप होतात. राजकारणात वार करावे लागतात. परंतु वार करीत असतांना वैऱ्याची भूमिका ठेवू नये, असा भावपूर्ण संदेश विधानपरिषदेतील ज्येष्ठ सदस्य बी.टी.देशमुख यांनी आज आपल्या निरोप समारंभाला उत्तर देतांना दिला. मानवी शरीर जसे अमर नाही, तसेच प्रतिनिधीत्वही अमर नाही. पराभवाचे दुःख नाही. परंतु आपण त्या उद्देशासाठी काम करतो, त्या उद्देशाशी तडजोड करून सभागृहात यावे की, तडजोड न करता पराभव स्वीकारावा हे दोन पर्याय आपल्या पुढे होते. आपण दुसरा पर्याय निवडला. यावेळी निवडणुकीला समोर जातांना पराभव स्पष्ट दिसत होता. परंतु आपण तडजोड केली नाही. उद्देशाशी तडजोड न करता पराभव स्वीकारला. त्यांच्या भाषणानंतर सभागृहातील सर्व सदस्यांनी उठून टाळ्या वाजवून त्यांना निरोप दिला.

यांच्याबद्दल सर्वच जणांनी विचार मांडलेले आहेत आणि आता त्यांचे या सदनामध्ये आगमन देखील झालेले आहे. त्यांच्याबद्दल दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांच्या मनातील भावना अशी आहे की, त्यांचा पराभव हा सर्वांना चटका लावून गेलेला आहे. म्हणून आता ते या सदनामधून निवृत्त होत असतांना, त्यांना निरोप देत असतांना त्यांच्या कर्तृत्वाचे, त्यांच्या योगदानाचे केवळ प्राध्यापक म्हणून नव्हे तर प्राध्यापक, शेतकरी, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार आणि समाजातील एक आदर्श जागरुक लोकप्रतिनिधी कसा असावा याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख आहेत. सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांना मी अनेक वर्षापासून म्हणजे माझ्या युवक काँग्रेस चळवळीपासून ओळखत आहे. अर्थात ते माझ्यापेक्षा मोठे आहेत. परंतु मी युवक काँग्रेसच्या चळवळीमध्ये काम करीत असतांना विदर्भामध्ये खूप ठिकाणी फिरलो आहे आणि त्यावेळी मला सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांना एकतर त्यांच्या महाविद्यालयीन जीवनामधील पत्रकार म्हणून आणि संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याचे बिनीचे शिलेदार म्हणून भेटण्याची अनेक वेळा संधी मिळाली. आज योगायोगाने महाराष्ट्र राज्याचे सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करीत असतांना संयुक्त महाराष्ट्राच्या, अखंड महाराष्ट्राच्या तीव्र भावना लक्षात घेऊन त्याबाजूने उभे रहाणारे, परंतु विदर्भातील सर्व प्रश्नांच्या बाबतीत इतरांच्या पेक्षाही दोन पावले पुढे जाऊन विदर्भातील सर्व बाबतीतील अनुशेषाचा प्रश्न पोटतिडकीने,अभ्यासपूर्ण मांडणारे सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख अशी त्यांची दोन व्यक्तीमत्वे आहेत म्हणजेच एका बाजूला विदर्भातील प्रश्न तेवढ्या पोटतिडकीने मांडणार, परंतु त्यावेळी कोणत्याही अभिनिवेषामध्ये टोकाला न जाता पुन्हा अखंड मराठी राज्याची जी संकल्पना आहे, त्याची जपणूक करणारे आणि त्याकरता आपले पद पणाला लावणारे असे सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांना मी जवळून पाहिलेले आहे. एकदा सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी मला काही आठवणी सांगतांना म्हणाले की, ऐन तारुण्यामध्ये वयाच्या १८-१९-२० व्या वर्षी मी विद्यार्थीही होतो आणि पत्रकारही होतो. **संत गाडगेबाबा आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज ही त्यांची आराध्य दैवत आहेत.तसेच यामध्ये डॉ.पंजाबराव देशमुख, आबासाहेब खेडकर अशी विदर्भ आणि अमरावतीच्या मातीतील किती तरी नावे येथे घ्यावी लागतील की ज्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन माननीय प्रा.बी.टी.देशमुख यांनी आपल्या सामाजिक आणि राजकीय कार्यामध्ये उडी घेतलेली आहे.** वयाच्या १८ व्या किंवा २१ व्या वर्षी पत्रिकारिता करीत असतांना संत गाडगे महाराजांचे निधन झाल्यानंतर त्या प्रसंगाचे वर्णन एक पत्रकार म्हणून एक श्रोता म्हणून प्रा. बी.टी. देशमुख यांनी त्यावेळी लिहून घेतलेला शब्द नी शब्द सांगितलेला मला आजही आठवतो. संत गाडगे बाबांचा अंत्यविधी कुठे करायचा? अमरावतीमध्ये करायचा की, त्यांच्या आवडत्या गावी करायचा की, पंढरपूरमध्ये करायचा याबाबतीत हजारो भक्तगणांचा संघर्ष चालू असतांना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज तातडीने प्रवासातून त्या ठिकाणी पोहचले. संत तुकडोजी महाराजांनी प्रवासामध्ये गाडगे महाराजांवर जे गीत लिहिले होते ते संपूर्ण गीत त्यांनी मला वाचून दाखविले. ते गीत संत तुकडोजी महाराजांनी सांगितल्याबरोबर हजारोंचा जनसमुदाय शांत झाला. भजन संपल्यानंतर संत तुकडोजी महाराजांनी असे सांगितले की, गाडगे बाबांचा अत्यंविधी येथेच होईल. त्यानंतर कोणी अवाक्षर बोलले नाही. असा वृत्तांत १९५६ साली एक विद्यार्थी म्हणून त्या वेळच्या वर्तमानपत्रात प्रा. बी. टी. देशमुख यांनी लिहिला होता **असे प्रा. बी.टी. देशमुख आहेत. विद्यार्थीदशेपासून शिक्षकपेशापासून प्राध्यापकापासून एक आदर्श प्राध्यापक, आदर्श शिक्षक आणि त्याचबरोबर केवळ शिक्षकांकरिता केवळ प्राध्यापकांकरिता किंवा केवळ शिक्षणाची बाजू ते या सभागृहात मांडत बसले नाहीत तर विदर्भाचा अनुशेष पोटतिडीकेने, घटनेच्या कलमांचा संदर्भ देऊन, त्यावेळच्या भाषणांचा संदर्भ देऊन प्रसंगी ॲडव्होकेट जनरलला आपले मत व्यक्त करण्याकरिता सभागृहासमोर बोलावण्याचे सामर्थ्य कसे असू शकते हे प्रा.बी.टी.देशमुख यांनी आपल्या शब्दातून या सभागृहात व्यक्त केलेल्या तीव्र भावना आजही आपल्या सर्वांच्या लक्षात आहेत.** शेतीचे प्रश्न असतील, कापसाचे प्रश्न असतील, धानाचे प्रश्न असतील, संत्र्याचे प्रश्न असतील, अवकाळी पावसाचे प्रश्न असतील या सगळ्या दुष्काळी किंवा अवकाळी पावसामुळे जी परिस्थिती निर्माण झाली त्या परिस्थितीचे अत्यंत विदारक असे चित्र या सभागृहामध्ये कसे मांडावे आणि प्रश्न कसे सोडवून घ्यावेत याचे आमच्या सारख्या सगळयाच नवीन आलेल्या सन्माननीय सदस्यांनी, **लोकप्रतिनिधी म्हणून कसे काम करावे याचा प्रा. बी.टी. देशमुख यांच्याकडून आदर्श घ्यावा असे प्रा. बी. टी. देशमुख यांचे व्यक्तिमत्व आहे. या सभागृहात त्यांना निरोप देत असतांना आम्हा सर्व सन्माननीय सदस्यांच्या भावना दाटून आलेल्या आहेत.** पण शेवटी सर्व सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी विवेचन केल्याप्रमाणे राज्यसभेमध्ये किंवा विधानपरिषदेमध्ये सदस्य म्हणून निवडून येण्याची लोकशाहीची जी प्रक्रिया आहे, त्या प्रक्रियेमध्ये स्थानिक स्वराज्य संस्था असोत किंवा नगरपालिकेतील को-आप्ट होणारे सदस्य असोत, जिल्हा परिषदेचा सदस्य किंवा सभापती होतांना आणि या सभागृहामध्ये येतांना भांडवलशाहीचे, पैशाच्या जीवावर लोकप्रतिनिधीसुध्दा विकत घेतला जाऊ शकतो याचे एक अत्यंत विदारक चित्र तुम्हाला-आम्हाला पहावयास मिळते आणि त्यामुळे या ठिकाणी बसलेल्या अनेक चांगल्या सन्माननीय सदस्यांकडे लोकांचा पहाण्याचा दृष्टिकोण हा अत्यंत भयानक झालेला आहे. आपल्याला देखील लोकांपुढे जात असतांना शरमेने मान खाली घालावी लागते अशी अवस्था निर्माण झालेली आहे. मागच्यावेळी माननीय श्री. अजित पवार, माननीय श्री. छगन भुजबळ, माननीय आर.आर.पाटील, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी आणि मी देखील त्यावेळी असे सांगितले होते की, राज्यसभेची जी पध्दत आहे किंबहुना दहा राज्यांसाठी कायदा असेल, त्या कायद्याला सहा राज्यांमध्ये अस्तित्व असेल तर त्यासाठी काही तरी क्लॉज असला पाहिजे. **तेव्हा ही बाब केंद्र सरकारच्या लक्षात आणून तो क्लॉज त्वरित कसा होईल हे सर्वांनी पाहिले पाहिजे. प्रा. बी.टी. देशमुख यांच्या सारख्या आदर्श नेतृत्वाचा जेव्हा पराभव होतो तेव्हा त्यासंबंधीचे चिंतन आपण अधिक अंतर्मुख होऊन केले पाहिजे असे मला वाटते.**

**श्री. हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) :** सभापती महोदय, या सदनातील

*शनिवार, दिनांक ४ डिसेंबर २०१० रोजीच्या दैनिक 'हिंदुस्थान' मध्ये प्रसिद्ध झालेले वृत्त.*

# बीटींनी शिक्षणमंत्रीपदाची ऑफर धुडकावली होती

## विधानपरिषद अध्यक्षांचा गौप्यस्फोट

**नागपूर, दि. ३** (विनय खरे) : अमरावती पदवीधर मतदार संघातून सलग ५ वेळा (३० वर्षे) विधान परिषदेवर निवडून जाणाऱ्या प्रा.बी.टी.देशमुख यांचा पराभव धक्कादायक असल्याची भावना संपूर्ण सभागृहाने व्यक्त केली. **बी.टीं.ची वैचारिक बैठक अत्यंत परखड आणि कणखर असल्याचे सांगत शिक्षण क्षेत्रातील त्यांचा अभ्यास आणि तळमळ पाहून तत्कालीन काँग्रेस सरकारनं त्यांना शिक्षणमंत्री होण्याची ऑफर दिली होती, असा गौप्यस्फोट विधान परिषदेचे सभापती शिवाजीराव देशमुख यांनी केला.** निरोपादाखल केलेल्या भाषणानंतर संपूर्ण सभागृहानंच नव्हे तर मोकळ्या जागेत बसणारा विधानमंडळ अधिकारी, कर्मचारी वर्ग वार्ताहर गॅलरीतील पत्रकार यांनी बीटींना उभे राहून मानवंदना केली. गेल्या कित्येक वर्षात असा दुर्मिळ क्षण केवळ बीटींच्या बाबतीतच घडला. काहींच्या डोळ्यात अश्रुही उभे राहिले. खुद्द सभापतींच्या डोळ्यांच्या कडा पाणावल्या होत्या. अत्यंत भावविभोर असं वातावरण होतं.

कुठलंही प्रतिनिधीत्व खरं तर निरंतर राहत नाही. तडजोड करून सत्तेत राहायचे कि जडजोड न करता बाहेर राहायचे हे ठरविता येणे महत्वाचे असते. मला कोणतीही जडजोड स्वीकारायची नव्हती. सार्वजनिक हिताचे प्रश्न मांडण्याची इच्छा नेहमीच प्रबळ राहिली. मात्र, त्यासाठी शक्तिचे बळ कुठून आले ते कळले नाही. या सभागृहानं शेकडो प्रश्न सोडवले. लोक तुमचं काम पाहात असतात. कोणत्याही प्रसंगाला आनंदाने सामोरे गेले पाहिजे. सभागृहाचे दोन्ही बाजूचे सदस्य, सभापती सर्वांनीच आपल्याला केलेल्या सहकार्याबद्दल बीटींनी आभार मानले. शिक्षणमंत्री होण्याची ऑफर देशमुखांनी धुडकावली. तडजोड स्वीकारली असती तर पुढे इथे आले असते. तत्व स्वीकारल्याने राजकीय अपघात झाला नुकत्याच झालेल्या निवडणूकीत झालेला बीटींच्या पराभव सर्वांनाच चटका लावून गेला. त्यामुळे विजयी उमेदवारापेक्षा बी.टींच्या पराभवाची चर्चा सर्वतोमुखी होती. सभागृहाबाहेर असलात तरी योग्य मार्गदर्शन करा सभागृहात पुन्हा याव अशी भावना दोन्ही बाजूच्या सदस्यांची असल्याचे सभापती देशमुख यांनी सांगितलं.

विदर्भ अनुशेषाच्या बाबतीत बीटींनी दिलेला लढा यावेळी सर्वांनीच अधोरेखीत केला. शिक्षण क्षेत्राशी निगडीत प्रश्न त्यांनी तेवढ्याच तळमळीने सोडवून घसास लावण्याचा प्रयत्न केला. बीटींच्या १४ प्रश्नांचा अभ्यास केला तरी पुढचा प्रश्न कोणता असेल याचा विचार मंत्री असतांना आपल्या डोक्यात सदैव असायचा, असे सभापती यावेळी म्हणाले. तर आपण राज्यमंत्री, मंत्री झाल्यावर विधान परिषदेत बीटींना तोंड द्यायचे आहे, याची जाणिव सदैव असायची असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले. सर्वाच्या तोंडून आपले कौतुक ऐकण्यास इच्छूक नसलेले बीटीं शेवटच्या क्षणी सभागृहात हजर झाले आणि त्यांनी प्रातिनिधीक स्वरुपात सर्वांचे आभार मानले.

जे ११ सन्माननीय सदस्य निवृत्त होत आहेत त्यापैकी डॉ. सुधीर तांबे, श्री. राजेंद्र जैन, श्री. विक्रम काळे आणि श्री. रामनाथ मोते हे चार सन्माननीय सदस्य पुन्हा या सभागृहाचे सदस्य झालेले आहेत. या चारही सन्माननीय सदस्यांचे मी स्वागत करतो. पहिल्या टर्ममधील आपला सहभाग आम्ही बघितलेला आहे. आपण सभागृहात असल्याने सभागृहातील चर्चेमधून आणि विधायक सूचनांमध्ये मोलाची भर पडेल अशीही अपेक्षा आपले स्वागत करीत असतांना मी व्यक्त करतो. या सभागृहाची वेगळी खासियत आहे असे म्हटले जाते. हे चिरंतन चालू राहणारे सभागृह आहे. या सभागृहात सदस्य येतात आणि जातात. त्यामुळे निरोप समारंभासारखा कार्यक्रम केवळ याच सभागृहात होऊ शकतो. ..... आपण सर्वांनी या कार्यक्रमाला सुरुवात केली त्यावेळी बोलत असतांना सगळयांचे लक्ष त्या रिकाम्या खुर्चीकडे जात होते. **त्या खुर्चीने या सभागृहाला जे काही दिले त्याबद्दलचे वर्णन केले जात होते. जेव्हा साक्षात सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख हे त्या खुर्चीत स्थानापन्न झाले, त्यावेळी खरोखर मन भरुन यावे अशा भावना सर्वांच्या मनामध्ये निर्माण झाल्या होत्या.**

**प्रा.सुरेश नवले (नामनियुक्त) :** सभापती महोदय, मी राज्यमंत्री असतांना सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी. देशमुख यांचा आणि माझा संबंध आला. मला आठवते की, वैद्यकीय खात्यासंबंधीच्या एका प्रश्नावर या सभागृहामध्ये ३०-३५ मिनिटे चर्चा झाली होती. **खरे तर त्या प्रश्नाच्या वेळी आणि प्रा. बी.टी.देशमुख सरांच्या प्रश्नांना उत्तरे देतांना माझ्या अंगाला घाम फुटला होता. प्रा. बी.टी.सरांच्या प्रश्नांना उत्तर देणे हे अवघड काम होते.** रात्री २-२ वाजेपर्यन्त अभ्यास करुन प्रश्नाची समर्पक उत्तरे जातील की नाही याबाबत साशंकता होती. शेवटी एक अनुभवी आणि ज्येष्ठ सदस्य या नात्याने त्यांनी मला सांभाळून घेण्याचे काम केले. **मध्यंतरी मी प्रा. बी.टी.देशमुख सरांना आर्थिक आणि भौतिक अनुशेष यामधील फरक समजावून सांगण्याची विनंती केली. त्यावेळी त्यांनी सभागृहाच्या लॉबीमध्ये जवळ जवळ ३० मिनिटे मला भौतिक आणि आर्थिक अनुशेष समजावून सांगितला. एखाद्या नवख्या सदस्याला सांभाळून घेण्याची अंगभूत वृत्ती प्रा. बी.टी.देशमुख सरांच्या अंगी आहे.** मी त्यांना मनापासून शुभेच्छा देतो.

**श्री.दिलीपराव सोनावणे (नाशिक विभाग शिक्षक) :** सभापती महोदय, अतिशय जड अंतःकरणाने निवृत्त होणाऱ्या माननीय सदस्यांना निरोप देत असतांना माझ्या भावना व्यक्त करण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

.... सभापती महोदय, ११ सदस्यांपैकी चार सदस्य याठिकाणी पुन्हा निवडून आलेले आहेत. आदरणीय श्री.रामनाथ मोते, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेंद्र जैन आणि श्री.विक्रम काळे यांना मी मनापासून शुभेच्छा देतो आणि त्यांचे स्वागतही करतो. या ११ सदस्यांपैकी माझा निकटचा संबंध असणाऱ्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघातील पाच जागा रिक्त झाल्या आहेत. आमचे ज्येष्ठ सहकारी माननीय प्रा.बी.टी.देशमुख म्हणजे आमचे हेडमास्तर. खऱ्याअर्थाने या सभागृहातील आमचे ते नेते आहेत. या सभागृहात कसे बोलावे, कशा पध्दतीने आपले प्रश्न मांडावेत याचे मार्गदर्शन गेली चार वर्षे त्यांच्याकडून निश्चितपणे आम्हाला लाभले आहे. शिक्षण क्षेत्रातील आणि शिक्षकांचे प्रश्न मांडण्याची त्यांची पध्दत वाखाणण्याजोगी होती. **विदर्भाचा अनुशेष, विदर्भाचे प्रश्न असतील ते कशा पध्दतीने मांडावेत हे आदरणीय प्रा.बी.टी.देशमुख यांच्याकडून आम्ही शिकलो. गेली तीस वर्षे त्यांचा या सभागृहातील अनुभव आम्हाला मागील चार वर्षे पहावयास मिळाला.** या अनुभवाला माझ्या जीवनात एक वेगळे स्थान निर्माण झाले आहे. प्रश्न मांडण्याच्या आत उत्तर काय द्यावे लागेल अशा प्रकारची जरब त्यांच्या प्रश्नामध्ये दिसून येत होती.

**श्री.भगवानराव साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) :** सभापती महोदय, आज आपण निवृत्त होणाऱ्या ११ सदस्यांना निरोप देत आहोत. त्यापैकी चार सदस्य पुन्हा निवडून आले आहेत, त्यांचे स्वागत करीत आहोत.

सभापती महोदय, योगायोगाने या सभागृहाला ११ प्रवेशद्वारे आहेत. चार सदस्य पुन्हा निवडून आले आहेत. ७ सदस्य सभागृहातून बाहेर गेलेले आहेत. त्यांना पुन्हा सभागृहात येण्यासाठी ७ प्रवेशद्वारे खुली आहेत. याठिकाणी पूर्वीच्या वक्त्यांनी जे मुद्दे मांडले त्यांची पुनरावृत्ती न करता एक-एक मुद्दा मांडून माझे भाषण पूर्ण करणार आहे.

सभापती महोदय, आदरणीय ज्येष्ठ सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांच्याबद्दल एवढेच म्हणेन की, राज्यशास्त्राचा अभ्यास करणारे, समाजशास्त्राचा अभ्यास करणारे, **अनेक पीएच.डी करणारे विद्यार्थी यांच्या दृष्टीने प्रा.बी.टी.देशमुख यांनी खूप काम करुन ठेवले आहे. राजकारणामध्ये कमी जास्त होऊ शकते. परंतु इतिहासाला त्यांची दखल घ्यावी लागेल.**

**श्री. कमलकिशोर कदम (नांदेड स्थानिक प्राधिकारी संस्था) :** सभापती महोदय, मी प्रथम आपणाबद्दल तसेच या सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांबद्दल, ज्यांनी सदनात भावना व्यक्त केल्या त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी उभा आहे.

.... महोदय, सध्या प्रामुख्याने निवडणुकीत जे बीभत्स स्वरुप आलेले आहे त्यावर निर्बंध आणावेत यासंबंधी काही सन्माननीय सदस्यांनी जे विचार प्रकट केले त्यांच्याशी मी सहमत आहे. सभागृहाने याबाबतीत निश्चितपणे काही निर्णय घेणे आवश्यक आहे. यासोबतच एक कार्यकर्ता म्हणून माझ्या मनात काही विचार आहेत. केवळ कार्यकर्ता म्हणून राजकारणात वर येणे अतिशय अवघड आहे. राजकारणात अशी अनेक बेटं निर्माण झाली आहेत. लोकशाही ही लोकशाही राहिली नाही तर ती एका अर्थाने कुटुंबशाही झालेली आहे. एकाच कुटुंबामध्ये सर्व सत्ता असते आणि कार्यकर्ता जन्मभर कार्यकर्ताच राहतो म्हणून हे कुठेतरी बदलले पाहिजे, याचा विचार पक्षाच्या नेतृत्वाने मनापासून करावा अशी माझी मागणी आहे. हा प्रश्न केवळ एखाद्या पक्षापुरता मर्यादित राहिलेला नाही तर सदनात जेवढे पक्ष आहेत त्या सर्वच पक्षांनी याबाबत चिंतन करणे आवश्यक आहे. **सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख आज सभागृहात उपस्थित आहेत ते देखील निवृत्त होत आहेत. आम्ही आज निवृत्त होत आहोत याचे आम्हाला बिलकूल दुःख नाही, आम्ही समाधानी आहोत पण या सभागृहात प्रा. बी.टी. देशमुखांसारखा सदस्य असणे अत्यंत आवश्यक आहे हीच आमची**

---

*रविवार, दिनांक ५ डिसेंबर २०१० रोजीच्या दैनिक 'देशोन्नती' मध्ये प्रसिद्ध झालेले वृत्त.*

# बी.टी.देशमुखांच्या पराभवाची विधानपरिषदेत दखल

## निवडणुकीतील भ्रष्टाचारावर आळा घालण्यासाठी कायदा हवा : केंद्र सरकारला प्रस्ताव पाठवणार

**नागपूर ४ डिसेंबर** (प्रतिनिधी) : स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूकीत प्रचंड प्रमाणात पैसा ओतला जात आहे. पैशाच्या भरवशावरच निवडणूका होऊ घातल्या असून ही बाब नवीन नसली तरी ज्येष्ठ सदस्य बी.टी.देशमुखांच्या पराभवामुळे आज विधानपरिषदेत या प्रकरणाची गांभीर्याने दखल घ्यावी लागली. निवडणूकीतील भ्रष्टाचारावर आळा घालण्यासाठी कायदा असावा, असा प्रस्ताव उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज वरिष्ट सभागृहात मांडला. या प्रस्तावाला सर्व सदस्यांनी समर्थन जाहीर केले. हा प्रस्ताव केंद्र शासनाकडे त्वरित पाठविण्यात यावा, अशी सूचनाही केली.

बी.टी.देशमुख यांच्यासह अकरा सदस्यांना आज विधानपरिषद सभागृहात भावपूर्ण निरोप देण्यात आला. यावेळी बोलतांना अजित पवार म्हणाले की, समाजातील शैक्षणिक, कला, सांस्कृतिक, क्रीडा आदी वेगवेगळ्या वर्गातील तज्ज्ञ हुशार मान्यवरांच्या अनुभवाचा लाभ राज्यातील कायदे करतांना व्हावा, त्यातून समाजाला लाभ मिळावा या उद्देशाने वरिष्ठ सभागृहाची संकल्पना करण्यात आली. परंतु गेल्या काही वर्षात विधान परिषदेतील निवडणूकांमध्ये प्रचंड भ्रष्टाचार बोकाळला आहे. त्यामुळे चांगले व आदर्श व्यक्तिमत्व वरिष्ठ सभागृहात निवडणून येणे कठीण झाले आहे. एकेका मतदार संघाचा खर्च हा सर्व मतदार संघातील निवडणूक खर्चाच्या बरोबरीचा झाला आहे. त्यामुळे हा प्रकार रोखण्यावर सर्वांचे एकमत दिसले.

**सरस्वतीपुत्राचा लक्ष्मीपुत्राने केला पराभव : बी.टीं.च्या विरोधात सोफियाची ताकद**

**विरोधीपक्ष नेते पांडुरंग फुंडकर यांनी बी.टी. देशमुख यांना सोफियामुळेच पराभूत व्हावे लागल्याचा आरोप केला. दिवाकर रावते यांनीही असाच आरोप करीत एक भांडवलदार सच्चा लोकप्रतिनिधीचा पराभव करतो. त्यामुळे आता या सभागृहात पैसेवालेच येतील का?** असा मुद्दा उपस्थित करीत अजित पवारांच्या प्रस्तावाचे समर्थन केले. गृहमंत्री आर.आर.पाटील यांनी बी.टी.देशमुखांच्या विरोधात सोफियाची ताकद होती, हे सत्य असेल तर ही बाब लोकशाहीसाठी घातक आहे, केवळ महाराष्ट्र सरकारनेच नव्हे तर देशातील सर्व विधानपरिषदांनी असा प्रस्ताव पारित करावा, अशी मागणी केली. याबाबतचे दोन प्रस्ताव अगोदरच केंद्राला पाठवले आहे, तेव्हा तो प्रस्ताव त्वरित पारित करावा, असा तिसरा प्रस्तावही पाठविण्याची मागणी केली. **छगन भुजबळ यांनीही सरस्वतीपुत्राना लक्ष्मीपुत्र हरवू लागले तर या सभागृहाचे काय होणार? अशी चिंता व्यक्त केली. यावर सभापतींनी याबाबतचा प्रस्ताव लवकर पाठवण्याचे निर्देश दिले.**

**खंत आहे. कारण आपल्यासारखा सुजाण सदस्य सभागृहात नसेल तर मागासलेल्या विभागाचे प्रश्न परखडपणे कोण मांडणार!** असा प्रश्न निर्माण होतो. मागच्या अधिवेशनात सांगण्यात आले होते की, मराठवाडा आणि विदर्भाचा अनुशेष आता संपला आहे. परंतु १९९४ मध्ये अनुशेषाच्या संदर्भात इंडिकेटर समितीची नियुक्ती करण्यात आली होती. या कमिटीने मराठवाडा आणि विदर्भाचा ६.५ हजार कोटींचा अनुशेष काढला होता तो अनुशेष १ एप्रिल, २०१० रोजी संपला आहे हे आम्हाला मान्य आहे. १९९४ ते २०१० या १६ वर्षामध्ये ५०-६० हजार कोटी रुपये खर्चले गेले त्यामधून जो काही अनुशेष निर्माण झाला आहे तो अनुशेष सरकारच्या निदर्शनास सातत्याने आणण्याचे काम मा. प्रा. बी.टी.देशमुख यांनी केलेले आहे. मा. देशमुखांना या सभागृहाचे प्रतिनिधीत्व करण्याची संधी मिळावयास पाहिजे होती असे मला वाटते. आपले येथे नसण्यामुळे मागासलेल्या भागाचे फार मोठे नुकसान होणार आहे. **मा. प्रा.बी.टी.देशमुखांनी केवळ विदर्भाचेच नेतृत्व केले असे नाही तर त्यांनी विदर्भ आणि मराठवाडा या दोन्ही भागाचे नेतृत्व केले होते.** या पूर्वी भौतिक अनुशेषासाठी ४० हजार कोटी रुपयांचे काम संपल्यानंतर मा. अजितदादा पवार यांना मला असे सांगावयाचे आहे की, आम्ही आज निवृत्त होत आहोत म्हणून आपण वाईट वाटून घेऊ नका अशी माझी विनंती आहे. ४० हजार कोटी रुपयांचे काम संपल्यानंतर उर्वरित महाराष्ट्राचे लागवड सिंचनाचे प्रमाण देशाच्या प्रमाणात ४६ टक्क्यावर गेलेले आहे. परंतु विदर्भाचे सिंचनाचे प्रमाण २६ टक्के होणार आहे तर मराठवाडयाचे सिंचनाचे प्रमाण २८ टक्के होणार आहे. त्यामुळे मराठवाडा आणि विदर्भातील सिंचनाचे प्रमाण व उर्वरित महाराष्ट्राचे सिंचनाच्या प्रमाणात २० टक्क्याचा फरक का आहे ? आम्ही पैशाचा हिशोब करीत नाही. पैशाचा हिशोब आम्हाला नको आहे. तुमच्या १०० एकरातील जमिनीतील ४६ एकर जमिनीला पाणी मिळणार आहे व विदर्भातील एकूण १०० एकराच्या जमिनीपैकी २८ एकराच्या जमिनीलाच पाणी मिळणार आहे. पाण्याचे समन्यायी व्यवस्था नसेल आणि केवळ पैशाचाच हिशोब असेल तर मराठवाडा आणि विदर्भाला न्याय मिळणार नाही.

सभापती महोदय, याप्रसंगी मी सांगू इच्छितो की, स्वर्गीय यशवंतराव चव्हाण व स्वर्गीय चिंतामणराव देशमुख हे महाराष्ट्राचे खरे द्रष्टे नेते होते. त्यांनी महाराष्ट्राची स्थापना होतांना असे सांगितले होते की, विदर्भ आणि मराठवाडयाचे नेतृत्व करणाऱ्यांचा खरा कस लागणार आहे. महाराष्ट्रातील मागासलेल्या विभागाला आपल्या बरोबर आणण्यासाठी खऱ्या अर्थाने कस लागणार आहे. प्रसंगी मराठवाडा आणि विदर्भाला झुकते माप दिले तरी ते वावगे होणार नाही. त्यामुळे मा. अजितदादांनी सुध्दा मराठवाडा आणि विदर्भाला झुकते माप द्यावे अशी विनंती आहे.....

सभापती महोदय, सभागृहात प्रश्नाच्या चर्चेच्या वेळेस माझे आणि मा. प्रा. बी.टी.देशमुख यांच्यामध्ये बऱ्याच वेळेस वादविवाद झाले होते. मा. प्रा. बी.टी.देशमुख आणि निवृत्त होणाऱ्या सदस्यांचा एकच विचार आहे की, महाराष्ट्र हा अभंग राहिला पाहिजे, महाराष्ट्र अखंड राहिला पाहिजे, महाराष्ट्रातील सर्व विभागांचा न्याय्य विकास झाला पाहिजे अशा भावना व्यक्त करुन आणि या सभागृहाला वंदन करुन माझे भाषण पूर्ण करतो.

**प्रा. बी. टी. देशमुख (अमरावती विभाग पदवीधर) :** सभापती महोदय, लोकशाहीच्या या पवित्र महामंदिरामध्ये सतत ३० वर्षे कार्य केलेला मी सभासद आहे. हे सभागृह आपल्याला निरोप देत असतांना या सभागृहाचा निरोप घेण्यासाठी आपण उपस्थित असू नये ही गोष्ट मला योग्य न वाटल्यामुळे मी मुद्दाम आज या ठिकाणी उपस्थित राहिलो आहे.

सभापती महोदय, या सभागृहामध्ये गेली ३० वर्षे मी काम करीत आहे. या कालावधीमध्ये या सभागृहात शेकडो प्रश्न सुटल्याचे मी पाहिले आहे. संसदीय लोकशाहीच्या जागतिक इतिहासात सर विन्स्टन चर्चिल यांच्या पराभवाचे अतिशय सुप्रसिध्द उदाहरण सांगितले जाते. संसदीय लोकशाहीच्या वर्गामध्ये मी अनेक वर्षे शिकलो आहे आणि शिकविले आहे. १९३९ ते १९४५ पर्यंत जवळ जवळ ६ वर्षे चाललेल्या दुसऱ्या महायुध्दाच्या खाईमधून आपल्या देशाला बाहेर काढणाऱ्या सर विन्स्टन चर्चिल यांनी त्या महायुद्धात देशाला उत्तम यश मिळवून दिल्यानंतर सुध्दा पुढील निवडणुकीमध्ये त्यांच्या पक्षाचा पराभव झाल्यामुळे त्यांना बहुमत मिळू शकले नाही. त्या पराभवासमोर आमच्या पराभवाचे काय मोजमाप? पराभूत होणाऱ्या प्रत्येक व्यक्तिनी ही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, मानवी शरीर हे जसे अमर नाही त्याप्रमाणे प्रतिनिधित्व सुध्दा हे कायम किंवा निरंतर असू शकत नाही. याला अपवाद असू शकतो, नाही असे नाही. आपल्या प्रतिनिधित्वाचा शेवट कसा व्हावा याचाही विचार ज्याचा त्यालाच करावा लागतो. **लोकशाहीमध्ये एक महत्वाची गोष्ट मानली गेली आहे की, आपण ज्या उद्दिष्टांसाठी काम करीत असतो त्या उद्दिष्टांशी तडजोड करुन खाली मान घालुन सभागृहात येण्याचा पर्याय स्वीकारावयाचा? की त्या उद्दिष्टांशी तडजोड न करता ताठ मानेने पराभव स्वीकारावयाचा, याचाही विचार ज्याचा त्यालाच करावा लागतो. आपल्या या पराभवाने सुद्धा उद्दिष्ट उत्तमरित्या साध्य होण्यास मदत होईल. तडजोडयुक्त यशाने माती होईल, असा मनाचा कौल मिळतो त्यावेळी त्या अपयशालासुध्दा सामोरे जावे लागते. सिंचन अनुशेषाच्या प्रश्नाच्या बाबतीत, सोफीयाच्या बाबतीत मी या दुसऱ्या पर्यायाची निवड केली. मला ती गोष्ट समोर दिसत होती. गेले दोन तीन महिने तसे इशारे मिळत होते. तडजोडी सुचविल्या जात होत्या.**

माननीय विरोधी पक्षनेत्यांनी त्याचा उल्लेख केला आहे. मी त्याबाबत तपशिलवार उल्लेख करणार नाही. लोकप्रतिनिधीने या मंदिराच्या आत प्रवेश करतांना आपली व्यक्तीगत व्यथा दाराच्या बाहेर ठेवली पाहिजे ही या सभागृहात पाळण्याची शिस्त आहे. आज मी अतिशय प्रसन्न मनाने, अंतःकरणाने आणि कृतज्ञतेच्या भावनेने या सभागृहाचा निरोप घेत आहे. सभासदत्वाची गोष्ट तर दूर राहिली, यापूर्वी सुध्दा माझ्यावर एकदा असा प्रसंग आला होता. १९७४ सालापासून पाटबंधारे प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता देण्याची व्यवस्था बदलून टाकण्यात आली होती. त्यासाठी आम्ही काही प्रतिनिधींनी एक जबरदस्त संघर्ष केला होता. मी ८-१५ दिवस अहोरात्र मेहनत करुन त्या विषयाच्या संबंधातील कागदपत्रे गोळा केली होती आणि एक मोठे बुलेटीन काढले होते. त्यावेळी विरोधी पक्ष आणि सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांनी या ठिकाणी चर्चा देखील उपस्थित केली होती. ८-१० दिवसाच्या शारीरीक श्रमामुळे दोनतीन दिवस मी सतत हॉस्पिटलमध्ये जाऊन येत होतो आणि वोक्हार्ड हॉस्पिटलच्या डॉ. प्रशांत जगताप यांच्या सारख्या तज्ञ डॉक्टरांनी तसेच डॉ.चौबेसाहेबांसारख्या ज्येष्ठ धन्वंतरींनी

---

*गुरुवार, दिनांक २ डिसेंबर २०१० रोजीच्या दैनिक 'सकाळ' मध्ये प्रसिद्ध झालेले वृत्त.*

## अन् बी.टी. खोली रिकामी करण्यास निघाले...!

अमरावती, ता. १ (सकाळ वृत्तसेवा) : निवडणूकीचा कौल हाती येताच त्यांनी तातडीने मुंबईला जाण्याचा निर्णय घेतला. बुधवारी (ता. १) सायंकाळच्याच रेल्वेगाडीत ते बसले अन् मुंबईच्या आमदार निवासात जाऊन त्यांनी गेल्या ३० वर्षापासून ज्या खोलीत वास्तव्य केले. त्या खोलीतील पुस्तकांचा गठ्ठा बांधला. गुरुवारीच (ता.२) ते अमरावतीकडे रवाना होणार आहेत. आजवर अमरावती जिल्हाच नव्हे तर बहुदा अन्य कुठल्याही शहरातील आमदारांनी केले नसेल ते बी.टीं.नी केले. कारण ते बी.टी.च करू शकतात.....

बी.टी.देशमुख यांचा पदवीधर मतदार संघाच्या निवडणूकीत पराभव झाला हे धक्कादायक वृत्त अनेकांच्या मनाला चटका लावणाले आहे. मंगळवारी रात्रीपासून त्यांच्या निवासस्थानी तसेच नुटाच्या कार्यालयात सन्नाटा होता. बी.टीं च्या घरापर्यंतच ही स्थिती नव्हती तर शहराच्या अनेक भागात बी.टी. देशमुख पराभूत झाले हे मान्य करतांना नागरिक डोक्यावर हात मारुन घेत होते. सकाळपासून घरी येणाऱ्यांशी संवाद साधल्यावर दुपारी दोन वाजताच्या सुमारांस बी.टीं चा डोळा लागला. पण दहा मिनटातच त्यांना जाग आली अन् परत भेटणाऱ्यांशी ते संवाद साधू लागले. पराभवाच्या कारणांची मिमांसा होत होती. एवढ्यात बी.टीं नी सायंकाळी मुंबईला जातो. खोलीत असलेली पुस्तके आवरतो अन् उद्याच परत येतो असे सहजपणे सांगितले. एका पदाधिकाऱ्याने एवढी घाई का करता? एकटेच का जाता? असा प्रश्न करुन आवरायला वेळ लागेल असा सल्ला देण्याचा प्रयत्न केला असता, ते चटकन म्हणाले, "आवरायला वेळ लागत नाही" पुस्तकेच आहेत, गुंडाळतो अन् येतो. प्रवासाच्या कुपन्सचा हिशेब देखील द्यायचा असल्याने जाऊनच येतो, असे ते अगदीच सहजतेने सांगत होते. ज्या सहजतेने ते बोलत होते, ते बी.टी. व्यतिरिक्त अन्य कोणी बोलूच शकत नाहीत हे स्पष्ट होते. पराभव का झाला, कसा झाला याची कारणे शोधण्यात त्यांना विशेष रस नव्हता. पुढची लढ्याची दिशा कशी ठरवायची अन् आपल्या विभागावरील संकट कसे दूर सारायचे याचाच विचार ते करित होते.

**जनादेश शिरोधार्य : बी.टी.** : लोकशाहीत लोक हे अंतीम न्यायाधीश असतात. ज्या मतदारांनी पाच वेळा निवडून दिले त्यांच्या विषयीचा आदर मनात असणे स्वाभाविक आहे. सहाव्या वेळा त्यांनी दिलेला जनादेश शिरोधार्य आहे. विभागीय आयुक्तांच्या नेतृत्वात या निवडणुकीची चोख व्यवस्था पार पडली. ज्यांनी मला पाठिंबा दिला त्यांच्याबद्दल मी आभारी आहे. लोकांचा निर्णय मनापासून स्वीकारत असून नवनिर्वाचित सदस्यांचे अभिनंदन करतो, या शब्दात बी.टी.देशमुख यांनी आपली प्रतिक्रिया दिली. निवडणूक निकालाच्या कारणांवर भाष्य करण्याचे त्यांनी टाळले.

मला लेखी स्वरुपामध्ये असा सल्ला दिला होता की, आता तुम्ही भाषण वगैरे करु नका. ताबडतोब भरती व्हा. त्यावेळी **माझ्या मनामध्ये जो विचार आला, तो चुकीचा आहे असे मला अनेकांनी त्यानंतर सांगितले आणि आज मलाही तसेच वाटते की अशी चूक कुणीही करु नये. पण त्यादिवशी ती चूक माझ्याकडून झाली. माझ्या मनामध्ये असा विचार आला की, आपण सभागृहामध्ये जाऊन हा विषय न मांडणे यामुळे होणारे नुकसान जास्त असेल म्हणून आपण सभागृहामध्ये गेले पाहिजे अशा प्रकारची भावना माझ्या मनामध्ये त्यादिवशी आली. त्यानंतर मी त्यादिवशी म्हणजे ७ डिसेंबर २००६ रोजी सदनामध्ये भाषण पूर्ण केल्यानंतर मनाची आक्रमकता शरिराला सहन न झाल्यामुळे मला शेवटी उपचारासाठी हॉस्पिटलमध्ये दाखल व्हावे लागले.**

या निवडणुकीला सामोरे जातांना सुध्दा मला ही गोष्ट स्पष्टपणे दिसत होती, मोठमोठ्या ठिकाणांहून इशारे येत होते. तसे ते दिसत असतांना सुध्दा आपण अशा प्रकारे उद्दीष्टांशी तडजोड स्विकारुन खाल मानेने सभागृहामध्ये जाण्यापेक्षा, आपण अशी **तडजोड न स्विकारता ताठ मानेने पराभव स्विकारल्यामुळे ते काम पुढे जाईल, उद्दीष्टपूर्तीला चालना मिळेल अशा प्रकारची भावना माझ्या मनामध्ये सातत्याने राहिली. आपण आपल्या पद्धतीने व आपल्या विचाराला धरुनच निवडणूकीत शेवटपर्यंत लढत दिली पाहिजे व यशस्वी झाले पाहिजे तरच ते खरे आहे. आपण 'असे' आहोत, म्हणूनच आपण 'असे' आहोत, आपल्याला 'तसे' होवून चालणार नाही. ही माझी भावना शेवटपर्यंत टिकून राहीली. याचा मला आजही मनापासून आनंद वाटतो.**

सभापती महोदय, गेली ३० वर्षे या सदनामध्ये काम करीत असतांना, या पवित्र अशा मंदिरात जनता जनार्दनाचे प्रश्न मांडतांना आपली जी उंची वाढते त्यातुन काम करण्याची उभारी कायम राहते अशी अनेक उदाहरणे माझ्या मनात, माझ्या डोळया समोर आहेत. गेल्या ३० वर्षाच्या काळामध्ये या सदनामध्ये शेकडो प्रश्न निकाली निघाल्याचे मी पाहिलेले आहे. आपण ज्यावेळी सदनामध्ये सार्वजनिक महत्वाचा प्रश्न घेऊन बोलतो, त्यावेळेला चारही बाजुने जे बळ आपल्या बाहुमध्ये येते, तेव्हा आपल्याला असे वाटते की, आपण किती बलवान झालो आहोत. अमरावती पाणी पुरवठ्याच्या प्रश्नाच्या बाबतीत केंद्र शासनाच्या जिऑलॉजीकल सर्व्हे ऑफ इंडियाचा रिपोर्ट होता की, हे गाव १०० टक्के बोअरच्या माध्यमातून पाणी पीत आहे आणि जर याबाबतीत ताबडतोब व्यवस्था केली नाही तर "This City will have to be evacuated" असा रिपोर्ट मध्ये उल्लेख होता. त्यावेळी माननीय श्री.सुब्रमण्यम् साहेब नगर विकास विभागाचे मंत्री होते आणि त्यांच्याकडे पाणीपुरवठा विभाग होता. त्यांना देखील सदरहू रिपोर्ट मिळाला होता आणि त्याची एक प्रत माझ्या हातात होती. मी ज्यावेळी अहवाल वाचून दाखविण्यास सुरुवात केली, तेव्हा माननीय सभापती, विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य आणि सत्ताधारी पक्षाचे सन्माननीय सदस्य या सर्वांनी माझ्या आक्रोशाला एक प्रकारचा भरजोर पाठिंबा दिला. त्यादिवशी मी अनेक वर्षे वर्गामध्ये जो सिध्दांत शिकलो आणि अनेक वर्षे शिकवला, त्याची मला प्रत्यक्ष अनुभूती त्यादिवशी मिळाली, सार्वजनिक महत्वाचा प्रश्न असेल तर तुमच्या बाहूमध्ये हत्तीचे बळ कुठून येते हे आपल्याला कळत देखील नाही. मग त्या प्रश्नासाठी एका बाजुला विरोधी पक्षाचे सर्व सन्माननीय सदस्य उठून उभे राहतात. माननीय सभापती पुन्हा-पुन्हा विचारतात आणि सत्ताधारी पक्षाचे सन्माननीय सदस्यांना उठून उभे रहाणे शक्य नसले तरी त्यातील काही उभे राहून व काही खाली बसून माननीय मंत्री महोदयांना सांगत असतात की, "तुमचे हे बरोबर नाही. ही तुमची चूक आहे." मी सदनामध्ये अशा प्रकारची भावना अनेक वेळा अनुभवलेली आहे. त्या अनुभवाने माझ्या सदस्यत्वाला फार मोठी धन्यता मिळवून दिलेली आहे. **सार्वजनिक हिताचा प्रश्न घेवून संघर्ष करणारा लहान माणूस सुद्धा सभागृहात मोठा होतो व एखाद्या अधिकाऱ्याच्या बदलीसाठी भांडतांना सभागृहात मोठी माणसे सुद्धा लहान होतांना मी पाहिलेली**

*शुक्रवार, दिनांक ३ डिसेंबर २०१० रोजीच्या दैनिक 'लोकमत' मध्ये प्रसिद्ध झालेले अविनाश दुधे यांचे निवडणूक विश्लेषण.*

# आदर्शवाद बीटींना नडला

### निवडणूक विश्लेषण - अविनाश दुधे

बी.टी.देशमुख नावाच्या राजकारणातील एका अनोख्या पर्वाची मंगळवारी अखेर झाली. अनेकांना आश्चर्यचकित करणाऱ्या अमरावती पदवीधर मतदारसंघातील निकालाचं एका वाक्यात वर्णन "आदर्श व मुल्यांचा पराभव आणि व्यवहारवादाचा विजय" असं करावं लागतं. बी.टी.देशमुख त्या पिढीचं प्रतिनिधित्व करतात जी पिढी काही शाश्वत मूल्य जोपासण्यासाठी "मोडेन पण वाकणार नाही" हा बाणा बाळगतात. बीटींचा हा बाणेदारपणाच त्यांच्या पराभवाला कारणीभूत ठरला.

खरं तर कोणतीही निवडणूक ही निवडणूकीसारखीच लढावयाची असते. तेथे तत्व वगैरे बाजूला ठेवून साम, दाम, दंड, भेद अशी सारी आयुधं वापरायची असतात. अलीकडच्या काही वर्षात विकसित झालेल्या निवडणूक तंत्राचाही वापर करावयाचा असतो. बीटींचं मात्र सारंच वेगळं होतं. फ्लेक्स-पोस्टर लावायचे नाहीत, गाड्या फिरवायच्या नाहीत, पत्रकं काढायचे नाहीत. जाहिराती द्यायच्या नाही, कोण्या नेत्याला मदत मागायची नाही, प्रसिद्धी माध्यमांना गळ घालावयाची नाही. अशी शेकडो बंधन त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांना घातली होती. मागील पाच निवडणूका त्यांनी ज्या पारंपारिक पद्धतीने जिंकल्या, त्याच पद्धतीने त्यांनी यावेळीही प्रचार केला. तालुका ठिकाणी आपल्या संघटनेच्या माध्यमातून एखाद्या शाळा महाविद्यालयात सभा आयोजित करायची. त्या सभेत आपले मुद्दे मांडायचे आपल्या संघटनेची 'नुटा बुलेटीन' ही पुस्तिका द्यायची आणि पुढे सरकायचं असा मामला होता.

यापूर्वीच्या निवडणूकांपेक्षा यावेळची निवडणूक सर्वार्थाने वेगळी आहे, याचं आकलनच बीटी व त्यांच्या सहकाऱ्यांना झालं नाही. अनेक उमेदवारांनी मोठ्या प्रमाणात मतदार नोंदणी केल्याने या निवडणूकीला विधानसभेच्या निवडणूकीसारखं स्वरुप आलं होतं. पाच जिल्ह्याच्या ५६ तालुक्यांतील १ लाख ४० हजार मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी वेगवेगळी साधनं प्रभावीपणे वापरण्याची गरज होती. मात्र बीटींनी आपला पारंपारिक मार्ग सोडला नाही. दुसरीकडे भारतीय जनता पक्षाचे उमेदवार रणजित पाटील व त्यांच्यासाठी जिवाचं रान करणाऱ्या आमदार चैनसुख संचेती यांनी अतिशय शिस्तबद्धपणे यंत्रणा कामी लावली होती. प्रचाराची सारी आधुनिक साधन त्यांनी वापरली. पैसा कुठेही कमी पडू दिला नाही. पाटलांसाठी भाजपा प्रदेशाध्यक्ष सुधीर मुनगंटीवार, शोभा फडणवीस, खासदार संजय धोत्रे, गोवर्धन शर्मा अशा पहिल्या फळीतील नेत्यासोबत भाजपाचे अनेक संघटनमंत्री राबत होते. (दुसरीकडे बीटी एकांड्या शिलेदाराप्रमाणे फिरत होते.) रणजित पाटलांनी भाजपाच्या यंत्रणेसोबत आपली वैयक्तिक प्रचारयंत्रणाही उभारली होती. या यंत्रणेने प्रत्येक मतदाराच्या घरापर्यंत संपर्क केला होता. प्रचाराच्या काळात फरक स्पष्ट जाणवत होता. एकीकडे एका राजकीय पक्षाची प्रोफेशनल, प्रत्येक बाबीचा बारकाईने विचार करणारी यंत्रणा, तर दुसरीकडे प्राध्यापक व शिक्षकांची ठाशीव पद्धतीने काम करणारी संघटना असा हा फरक होता.

अर्थात या एवढ्याच कारणाने बीटी हरलेत, अशातला भाग नाही. विदर्भ माध्यमिक शिक्षक संघटनेतील फूट, 'नुटा' पदाधिकाऱ्यांच्या विद्यापीठातील कारनाम्यांमुळे वाढलेले विरोधक, ..... अनुयायांच हात राखून काम करणे, सोफिया वीज प्रकल्पाला विरोध केल्यामुळे काँग्रेसच्या काही विद्यमान आमदारांचा त्यांना असलेला विरोध आदी गोष्टीही त्यांच्या विरोधात गेल्या. मात्र पराभवाची ही प्रमुख कारणं नाहीत. काही गोष्टी प्रकर्षाने लक्षात घ्याव्या अशा होत्या. बीटींव्यतिरिक्त निवडणूक लढविणाऱ्या बावीसही उमेदवारांच टारगेट बीटी होतं. या सर्वांनी दोन गोष्टी अतिशय प्रकर्षाने मतदारांच्या डोक्यात घुसवल्या. बीटी हा माणूस सोन्याचा असेल, पण त्यांना किती काळ संधी द्यायची? ३० वर्षे विधान परिषदेत राहिलेल्या माणसाने बाजूला होऊन नवीन रक्ताला संधी द्यायला नको का? दुसरं म्हणजे, बीटींनी अनुशेषाचा विषय वगैरे लावून धरला असेल, पण पदवीधरांसाठी त्यांनी काय केलं? या संभ्रमित करणाऱ्या प्रश्नांना बीटींची यंत्रणा उत्तरच देऊ शकली नाही. बीटी नावाचा माणूस काय गुणवत्तेचा आहे? विदर्भाचे मूलभूत प्रश्न सोडविण्यात त्यांचं काय योगदान आहे? एकंदर महाराष्ट्राच्या सासंदीय इतिहासात त्यांचं काय महत्व आहे? ३० वर्षात अनुशेषाव्यतिरिक्त बीटींनी किती महत्वाचे प्रश्न सोडविले? यापैकी कुठल्याही प्रश्नाचे उत्तर नवीन मतदारापर्यंत पोहोचलेच नाही. थोडक्यात सांगायचे झाल्यास, सामान्य पदवीधरांच्या लेव्हललाच बीटींच्या माणसांना जाता आलं नाही. बीटींनी जे केलं ते पदवीधरांना माहीतच आहे, असं गृहित धरल्याने सारा गोंधळ झाला.

निवडणूक काळात बीटींना त्यांच्या यंत्रणेतील या कमजोरीबाबत त्यांच्या हितचिंतकांनी माहिती दिली नाही, असं नाही. मात्र त्यावर त्यांचं उत्तर असायचं, "जी मुल्यं घेऊन आपण एवढी वर्षे सार्वजनिक जीवनात वावरलो, त्या मूल्यांशी वयाच्या ७२ व्या वर्षी केवळ यश मिळावे म्हणून तडजोड करायची का?" खरं तर बीटी हा माणूसच आजच्या युगात अनफिट आहे. आजच्या पिढीला दंतकथा वाटेल असं आयुष्य हा माणूस जगतो. गेल्या कित्येक वर्षापासून भल्या पहाटे ४ वाजता त्यांचा दिवस सुरु होतो. साडेपाच वाजता पोहून आल्यानंतर पुढचे १५ तास हा माणूस केवळ अभ्यासात गर्क राहायचा. सांगितलं तर नवल वाटेल, प्रचाराला जातांना घरची शिदोरी घेऊन जाणारा आणि पाच वेळा आमदार राहूनही रेल्वेस्टेशनवरून ऑटोने घरी परतणारा हा आमदार होता. कोणी मागितलं नसतांनाही आयुष्यात कमाविलेला प्रत्येक पैसा आला कुठून आणि गेला कुठे, याची बारीकसारीक माहिती मतदारांना देणारा हा ज्ञानतपस्वी होता. स्वाभाविकच लौकिक यशासाठी तडजोडी करणं त्यांना जमल नाही. परिणामी महाराष्ट्राला हळहळ वाटावा असा पराभव त्यांच्या वाट्याला आला. मूल्यांसाठी आयुष्य पणाला लावणाऱ्या दुर्मिळ माणसांच्या साखळीतील ते एक कडी आहेत. ती कडी व्यवहाराच्या लढाईत पराभूत झाली.

आहेत.

सभापती महोदय, मला या सदनामध्ये येऊन ८-१५ दिवस देखील झाले नव्हते. या राज्याच्या निर्मितीसाठी जी चळवळ झाली, त्याचा मी एक अपरिहार्य असा भाग होतो आणि मला त्याचा सातत्याने अभिमान वाटत आला आहे. तसेच मी व्यवसायाने शिक्षक असल्यामुळे शिक्षक आणि शिक्षण, त्याचप्रमाणे या राज्याच्या निर्मितीच्या कार्यामध्ये सहभागी असल्यामुळे अनुशेषाचा प्रश्न ही माझ्या कामाची प्रमुख दालने राहिलेली आहेत आणि माझ्या जिव्हाळ्याचे विषय राहिलेले आहेत. विकासाच्या असमतोलाचा जो विषय आहे तो महाराष्ट्राच्या हिताचा नाही हे मी अनेक वेळा बोललो आहे. पण आज मी त्या विषयाबाबत बोलत नाही. या सदनामध्ये आल्यानंतर पहिल्या आठ दिवसामध्ये नागझरी येथे जो गोळीबार झाला होता. तेव्हा कापूस उत्पादक संघाच्या वतीने डॉ.बोकरे, भाई श्री.सुदाम देशमुख यांनी आंदोलनाचे नेतृत्त्व केले होते आणि मी त्या आंदोलनामध्ये सहभागी होतो. त्यावेळी नागझरी येथे झालेल्या गोळीबारामध्ये माणसे मृत्युमूखी पडली. त्यावेळी विरोधी पक्षनेते माननीय श्री.ग.प्र.प्रधानसर होते आणि माननीय सर्वश्री.एन.डी.पाटीलसाहेब, कानिटकर, मधु देवळेकर इ.होते. यांनी नियम ९३ ची सूचना दिली होती. त्यावेळी मी देखील .नियम ९३ अन्वये सूचना दिली होती. सभागृहाचे कामकाज चालवित असतांना सभापती महोदय, आपल्याला त्या जागेवरुन अनेक अडचणी असतात, याची आपल्याला जाणीव आहे आणि जेव्हा त्या जाणिवेतून चर्चा सुरु झाली, तेव्हा दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर त्यावेळचे माननीय सभापती श्री.दादासाहेब उर्फ रा.सु.गवई यांनी असा निर्णय दिला की, "हा विषय महत्वाचा आहे. त्यामुळे याबर चर्चा झाली पाहिजे ही सन्माननीय सदस्यांची सूचना मी मान्य करतो. उद्या दुपारी इतके वाजता  या विषयावर चर्चा होईल. पण माननीय सभापती यांनी असे सांगितल्याबरोबर सदरहू चर्चा आजच झाली पाहिजे असा विरोधी पक्षाकडून आग्रह सुरु झाला. परंतु माननीय सभापती यांनी त्याबाबत निर्णय दिलेला असल्यामुळे ते आपल्या निर्णयावर कायम राहिले. मग विरोधी पक्षाने सभात्याग केला. त्यावेळी विरोधी पक्षाने सभात्याग केल्यानंतर माननीय सभापतींनी असे सांगितले की, "तुम्ही जर सभात्याग करणार असाल तर उद्या ही चर्चा करण्यासाठी परवानगी दिली जाणार नाही."

सभापती महोदय, मी त्यावेळी सभागृहात उठून उभा राहिलो आणि माननीय सभापतींना असे म्हणालो की, "महोदय, मी सुध्दा नियम ९३ अन्वये ही सूचना दिलेली आहे. विरोधी पक्ष आणि सत्ताधारी पक्ष याच्याबाहेर सुध्दा पुष्कळ जग शिल्लक आहे. मी सभात्यागामध्ये सामील नाही. आपण मला चर्चा उपस्थित करण्याची संधी दिली पाहिजे".  माननीय सभापतीच्या तोंडून असे उद्‌गार

*रविवार, दिनांक ५ डिसेंबर २०१० रोजीच्या दैनिक 'लोकमत' मध्ये प्रसिद्ध झालेले अविनाश दुधे यांचे 'मिडिया वॉच'.*

# बीटी सर, आता सामूहिक पुरुषार्थ जागवा !

## मीडीया वॉच - अविनाश दुधे

फार कमी लढाया अशा असतात, ज्यात जिंकणाऱ्यापेक्षा हरणारा अधिक लक्षात राहतो. विजेत्याच्या पराक्रमापेक्षा पराभूताची कमिटमेंट, इंटेग्रिटी, त्याची झुंजार वृत्ती याची चर्चा अधिक होते. (इतिहासात अर्जुन-कर्ण, सिकंदर-पोरस, मिर्झा राजे जयसिंह-शिवाजी महाराज अशी काही उदाहरणं आहेत.) रणजीत पाटील-बी.टी.देशमुख यांची लढाई अशा लढाईपैकी एक होती. निकाल येऊन चार दिवस झालेत; पण बीटींच्या पराभवाचं दुःख ओसरायला तयार नाही. साऱ्या  महाराष्ट्राला हा पराभव चटका लावून गेला आहे. मोठमोठी माणसं ढसढसा रडत आहे. अनेक जण सारं काही गमावलं या भावनेनं सुन्न झाले आहेत. बीटींचा द्वेष करणारे काही मोजके महाभाग सोडले, तर सर्वांना हा पराभव कमालीचा अस्वस्थ करून गेला आहे. राजकारणातील माणसं सहसा डोळ्यात पाणी आणत नाही. मात्र परवा विधानपरिषदही बीटी आता सभागृहात नसणार या जाणिवेने हेलावून गेली. सभापती शिवाजीराव देशमुख, अजित पवार, आर.आर.पाटील, छगन भुजबळ, पांडुरंग फुंडकर अशी ताकदीची माणसं बीटींच्या पराभवामुळे गलबलून गेली होती. फारच कमी लोकांच्या वाट्याला येईल, असा निरोप विधानपरिषदेने त्यांना दिला. सारं सभागृह उभं राहून टाळ्यांच्या गजरात या ज्ञानयोग्याला मानवंदना देत होतं. त्यांच्या कर्तृत्वाला मुजरा करत होत. निरोप समारंभानंतर अनेक आमदार, अधिकारी, पत्रकार, कर्मचाऱ्यांनी भरल्या डोळ्यांनी प्रवेशद्वारापर्यंत बीटींना साथ दिली.

कोणत्याही राजकारण्याला हेवा वाटावा असा हा निरोप समारंभ होता. खरं तर बीटी हा माणूस राजकारणी नाहीच. आपल एक कार्यक्षेत्र निश्चित करून सारे लोभ, मोह बाजूला सारून ३० वर्षे अतिशय निरिच्छेने वेगवेगळ्या प्रश्नांच्या सोडवणुकीची तपस्या करीत असलेला हा योगी आहे. त्यामुळेच बीटीच्या पराभवाने एक पर्व संपल, अशी भावना व्यक्त झाली. केवळ अभ्यास, जिद्द, चिकाटी, संसदीय कौशल्य यामुळे बीटी मोठे झाले नाहीत. त्यांचं वैयक्तिक आयुष्यातील वर्तन त्यांना अधिक मोठं करून गेलं. निकाल येताच त्याच दिवशी मुंबईला जाऊन मॅजेस्टिक आमदार निवासातील ३० वर्ष दुसरं निवासस्थान झालेली खोली त्यांनी रिकामी केली. (एका दिवसात ते कसं होणारं असं विचारल्यावर, "घर लावायला वेळ लागतो, आवरायला नाही", असं त्यांच उत्तर होतं) विधानभवनातील लायब्ररीची पुस्तकं परत केली. प्रवासाची कुपनं वापस दिली. दुसऱ्या दिवशी नागपूरला जाऊन तेथेही त्यांनी तोच उपचार पार पाडला. किती आमदार पराभूत झाल्यानंतर लगेच हे करू शकतील? बीटींचं वेगळेपण हेच आहे. आमदार म्हणून मिळणाऱ्या कुठल्याही सोयीसुविधांचा त्यांना कधी मोह पडला नाही. सांगितलं, तर नवल वाटेल; पण आमदार म्हणून अधिवेशन काळाव्यतिरिक्त कधी नागपूरला गेलं तर आपल्याला राहायला रवी भवन मिळू शकते याची माहिती त्यांना अलीकडे झाली होती. (बीटींचे असे अनेक किस्से आहेत. आपल्या पत्नीला, मुलींना त्यांनी कधीही आमदार असण्याचा कुठलाही फायदा मिळू दिला नाही.) समाजाच्या व्यापक हिताचं आपलं काम बरं आणि आपण बरं याचं वृत्तीनं हा माणूस आतापर्यंत जगत आला आहे.

बीटींच्या या वेगळेपणामुळेच त्यांचा पराभव अनेकांच्या काळजात रुतून बसला आहे. काही चुका संपूर्ण समाजाला अनेक दिवसापर्यंत छळतात. तशी ही चूक आहे. त्यामुळे हे झालंच कसं, हा प्रश्न प्रत्येकजण  एक  दुसऱ्याला विचारत आहे. याचं उत्तर सोप आहे. "**हजारो सज्जनांच्या वांझोट्या सद्‌भावनांपेक्षा काही मोजक्या दुर्जनांची संघटित कृती निर्णायक लढाईत नेहमीच महत्वाची ठरते**" हा इतिहासाने घालून दिलेला धडा विसरला की, हे असं झालंच कसं? असा पोकळ प्रश्न विचारण्याशिवाय हातात काहीच उरत नसतं. बीटींच्या धक्कादायक पराभवाची नेमकी काय कारणं होती याची मीमांसा 'बीटींना आर्दशवाद नडला' या 'लोकमत'मध्ये प्रसिद्ध झालेल्या लेखात करण्यात आली आहे. बीटींचे काही भाबडे समर्थक या पराभवासाठी सोफिया बीज कंपनी व जिल्ह्यातील काही आमदारांना जबाबदार ठरवीत आहे. याला काहीही अर्थ नाही. आपला नाकर्तेपणा लपविण्याचा हा प्रकार आहे. बीटी पराभूत व्हावे असे सोफिया कंपनीच्या अधिकाऱ्यांना व त्यांचे समर्थक असलेल्या आमदार यशोमती ठाकूर, रावसाहेब शेखावत, डॉ. अनिल बोंडे यांना मनातून वाटतही असेल; मात्र त्यांच्यापैकी कोणीही संघटीतपणे वा नियोजनबद्ध पद्धतीने त्यांच्या पराभवासाठी प्रयत्न केले, याचा कुठलाही पुरावा मिळत नाही. सोफियाने कदाचित काही उमेदवारांना पैसा पुरवला असेल; मात्र इतर काही नियोजन त्यांनी केले असल्याचे कुठेही दृष्टीपथात आलं नाही. मनाची समजूत घालण्यासाठी या मंडळीवर आरोप करणं ठीक आहे. पण असं करणं म्हणजे वस्तुस्थितीकडे पाठ फिरवणं ठरेल. अतिशय दुबळ नियोजन व ३० वर्ष एकाच माणसाला निवडून द्यावयाचं का? हा प्रचार बीटींच्या पराभवाला कारणीभूत ठरला. बीटी नियती हा प्रकार मानत असले तरी त्यांची ओळख कायम बुद्धिप्रामाण्यवादी अशीच राहिली आहे. त्यामुळे बीटींच्या अनुयायांनीही बुद्धीनेच त्यांच्या पराभवाची उकल केली पाहिजे. त्याविषयात बुद्धिभेद केल्याने स्वतःच्या फसवणुकीपेक्षा दुसरं हाती काही येणार नाही.

बीटींचा पराभव या विषयातून स्वतः बीटी व त्यांच्या अनुयायांनी आता तातडीने बाहेर आलं पाहिजे. एका पराभवामुळे बीटी लहान झाले नाहीत. त्यांचं स्थानं महाराष्ट्राच्या राजकीय सामाजिक जीवनात कायमच मोठं राहणार आहे. आमदारकीच नसलेले विरुद्ध त्यांना छोटं ठरवेल, एवढी त्यांची कर्तबगारी खचितच लहान नाही. अमरावतीला लाभलेल्या महापुरुषांच्या यादीतच त्यांचा समावेश राहणार आहे. त्यामुळे बीटींनी आता ताबडतोब पराभवाच्या दुःखातून बाहेर पडून नवीन रोलमध्ये शिरलं पाहिजे. बीटींजवळ नवीन पिढीला देण्याजोगं खूप काही आहे. विदर्भाचा अनुशेष, मागासलेपण, नोकऱ्यांच समन्यायी वाटप अशा अनेक विषयातील ज्ञानभंडार त्यांनी आता खुलं केलं पाहिजे. दुर्दैवाने बीटींनी आतापर्यंत आपलं ज्ञान स्वतःपुरतं मर्यादित ठेवलं. एकही सक्षम शिष्य त्यांनी तयार केला नाही. ही उणीव दूर करण्यासाठी आता पुन्हा शिक्षकांच्या भूमिकेत उतरून (आमदार होण्यापूर्वी बीटी अतिशय उत्तम शिक्षक होते.) नवीन आमदार, राजकीय व सामाजिक कार्यकर्ते, स्वयंसेवी संस्थांचे पदाधिकारी, पत्रकार यांचे क्लासेस घेऊन त्यांना वरील विषयात तयार केले पाहिजे. हे असं जर त्यांनी केलं, तर आतापर्यंत आमदार म्हणून जे काही काम झालं त्यापेक्षा अधिक परिणामकारक काम होईल. बीटींनी यापुढे स्वतःला कोंडून न घेता साऱ्या विदर्भात फिरल पाहिजे. आपल्याजवळ जे काही आहे ते सारं काही नवीन पिढीजवळ रितं केलं पाहिजे. बीटी सर, आतापर्यंत तुम्ही वेयक्तिक पराक्रम गाजविला. आता समाजाचा सामूहिक पुरूषार्थ जागृत करण्यासाठी तुमचं ज्ञान, बुद्धिमत्ता वापरा. कदाचित हीच नियतीची इच्छा असेल.

निघाले की, "मग प्रा.बी.टी. देशमुख यांचे पहिले नाव असेल व ते चर्चेला सुरुवात करतील. ठरावावर पहिले नाव प्रा. बी.टी. देशमुख यांचे राहील आणि प्रा.बी.टी.देशमुख या चर्चेला सुरुवात करतील" आपल्याला माहीत आहे की, विरोधी पक्ष नेत्यांचा तो अधिकार असतो. दुसऱ्या दिवशी तो विषय दिवसाच्या कामकाजामध्ये आला. मला विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य येऊन भेटले ते असे म्हणाले की, "विरोधी पक्ष नेत्यांचा तो अधिकार आहे." त्यावेळी मी असे म्हटले की, "माननीय विरोधी पक्ष नेते श्री. ग.प्र. प्रधान सर यांनी हा विषय मांडला तर मला अतिशय आनंद होईल. पण चर्चाच होणार नसेल तर मला ते मान्य होणार नाही." या सर्व घटनाक्रमामुळे दुसऱ्या दिवशी ती चर्चा उपस्थित करण्याचे, सुरु करण्याचे, कर्तव्य मलाच पार पाडावे लागले.

सभापती महोदय, या सभागृहामध्ये लोकांचे शेकडो प्रश्न सुटलेले, येथील लोकप्रतिनिधींनी सोडविलेले मी आपल्या डोळयांनी पाहिलेले आहे. अतिशय पवित्र अशा प्रकारची ही प्रक्रिया आहे. संघर्ष करत असतांना बाळासाहेब भारदे यांनी याविषयी मर्यादा घालून दिलेल्या आहेत "वार करत असतांना वैर करण्याची भावना मनामध्ये ठेवू नये. वार तर करावाच लागतो. वार करणार नाही तर लढाई होणार नाही. वार करत असताना वैराची भावना मनामध्ये ठेवू नये आणि दुजाभाव दाखवत असताना सुध्दा बंधुभाव मनामध्ये असला पाहिजे. वाद आणि संवाद याची चढाई करण्यात लोकांची भलाई हीच आपली कमाई आहे असे जर मानले तरच लोकशाहीची पुण्याई कृतार्थ होईल. बहुमत आहे म्हणून बेपर्वाई नको आणि बहूमत नाही म्हणून दांडगाई नको." **म्हणून सभापती महोदय, मला मनापासून धन्यता वाटते की, गेल्या ३० वर्षात मी माझी जागा सोडून कधीही हौदात म्हणजे वेलमध्ये उतरलो नाही.** मला माझ्या गुरुंनी तो बोध दिला होता. सभापती महोदय, वेळ संपल्याची घंटी वाजविण्याची संधी आज आपल्याला देऊ नये अशा प्रकारची तीव्र भावना माझ्या मनामध्ये आहे. या सभागृहाचा मी मनापासून आभारी आहे. ३० वर्षांचा फार मोठा असा कालखंड माझ्या मतदार संघाने मला दिला. या सभागृहांनी आणि सभागृहातील उभय पक्षांनी माझी भूमिका मान्य करुन काम करण्याची संधी मला दिली. त्यासंबंधीचा भेदभाव मनामध्ये न ठेवता एखाद्या विषयाला पुढे नेण्याचे काम मला करता आले. यामध्ये दोन्ही बाजूच्या पक्षाने जी भूमिका घेतली त्याचे फार मोठे श्रेय त्यांना आहे असे मानणारा मी सभासद आहे.

सभापती महोदय, शेवटी मी एक गोष्ट सांगू इच्छितो की, लोकशाहीमध्ये आपण या ठिकाणी येऊन जे काम करतो ते लोक पहात असतात. **ज्या दिवशी आपल्याला असे वाटते की, आपल्या न येण्याने सुध्दा त्या कामाला जास्त न्याय मिळेल. ज्या व्यथा आपण या ठिकाणी मांडतो, जी उद्दिष्टे आपण याठिकाणी घेऊन येतो. ती साध्य होण्याचा मार्ग प्रशस्त होतो. निवडणुकीचे सुध्दा आपल्याला कळते.** ते कळत नाही अशातला भाग नाही आणि ते ज्या वेळी कळते त्यावेळी त्याला आनंदाने सामोरे जाण्याची तयारी ठेवणे हा त्यावरील अतिशय उत्तम उपाय व्यथांच्या सोडवणुकीसाठी असतो. महाराष्ट्र राज्याची प्रगती आपल्याला पुढे न्यावयाची असेल तर या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये हा विषय आपण मनापासून सोडविला पाहिजे आणि ही सभागृहे तो निश्चितपणाने सोडवतील.कारण त्याशिवाय दुसरा तरणोपाय नाही. सभापती महोदय, शेवटी पुन्हा एकदा मी आपले आभार मानतो. सर्व माननीय सभापतींनी माझ्या कामावर अत्यंत अलोट प्रेम केले. व्यक्तीगत जिवनामध्ये अनेक संधी उलटया-सुलटया येत असतांना मी त्यात कधी पडलो नाही, याचे अनेक साक्षीदार आहेत. सभापती महोदय, अनेक चांगल्या संधी समोर येत असतांना त्याला मी बळी न पडता काम करीत राहीलो आहे ज्या मार्गावरुन चालण्याचे स्वीकारले त्याच मार्गाने प्रवास केला.

त्यामुळे या सभागृहाचा निरोप घेत असतांना मी अतिशय प्रसन्न मनाने या सभागृहाचा निरोप घेत आहे. मी मनापासून आपला आभारी आहे. विरोधी पक्ष नेत्यांचा, सत्ताधारी पक्षांच्या नेत्यांचा आणि उभय बाजूच्या सन्माननीय सदस्यांचा आणि या सभागृहाचा मी अत्यंत आभारी आहे. आपल्या सभागृहाच्या कामकाजाची सुरूवात आपण वंदेमातरम या गीताने करतो. "वेदमंत्राहून आम्हा वंद्य वंदेमातरम" असे या गीताविषयी महाराष्ट्रातील एका महाकवीने लिहून ठेवले आहे. आता लोकशाहीच्या या महामंदीराविषयी बोलायचे झाल्यास मी असे म्हणेन, :-

वंद्य हे मंदीर आम्हा वेद मंत्राहूनहि
धन्य आम्ही जाहलो इथे ३० वर्षे राहूनी
लोकव्यथांना लोपविण्याचे सामर्थ्य इथले पाहूनी
धन्य आम्ही जाहलो इथे ३० वर्षे राहूनी
वंद्य हे मंदीर आम्हा वेद मंत्राहूनहि

सभापती महोदय, अत्यंत कृतार्थतेच्या भावनेने या सभागृहाला मी मनापासून वंदन करीत आहे व संपूर्ण कृत कृत्यतेच्या भावनेनी या सभागृहाचा आदरपूर्वक निरोप घेत आहे.

**( संपूर्ण सभागृहाने उभे राहून टाळ्यांच्या गजरात सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी. देशमुख यांना शुभेच्छा दिल्या )**

.................................

*(सभागृहाला वंदन करीत प्रा.बी.टी.देशमुख यांनी आपले आसन ग्रहण केले तेंव्हा मा. सभापतीसह संपूर्ण सभागृहाने उभे राहून टाळ्यांचा जोरदार कडकडाट केला. "सभागृहाचा भाग नसलेले" प्रेक्षक गॅलरीतील प्रेक्षक व सभागृहाच्या मध्यभागी उपस्थित असलेला कार्यरत अधिकारी व कर्मचारीवर्ग यांनीसुध्दा उभे राहून सभागृहाला सोबत दिली. महाराष्ट्र विधान परिषदेच्या इतिहासात अशी घटना प्रथम घडली असल्याचे दुसऱ्या दिवशी काही वृत्तपत्रांनी नमुद केले होते. प्रत्यक्ष सभागृहाच्या कामकाजात ही बाब पुढील शब्दात नोंदवद्ध करण्यात आली आहे. :- "संपूर्ण सभागृहाने उभे राहून टाळ्यांच्या गजरात सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी. देशमुख यांना शुभेच्छा दिल्या" )*

.................................

**सभापती** : या सभागृहाचे ११ सन्माननीय सदस्य आज निवृत्त होत आहेत. त्यापैकी सन्माननीय सदस्य श्री. राजेंद्र जैन, सन्माननीय सदस्य श्री. विक्रम वसंतराव काळे, सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ दादा मोते आणि सन्माननीय सदस्य डॉ. सुधीर भास्कर तांबे हे चार सन्माननीय सदस्य पुन्हा या सभागृहात निवडून आलेले आहेत. त्यांचे मी या ठिकाणी अभिनंदन करतो, स्वागत करतो. या व्यतिरिक्त या सदनाचे ७ सदस्य यापुढे सदस्य म्हणून या सभागृहात येणार नाहीत परंतु त्यांनी या सदनाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील सर्वसामान्य समाजाकरिता जे काम केलेले आहे त्या कामाच्या अनुषंगाने या ठिकाणी जवळजवळ तीन तास सदनाच्या दोन्ही बाजूने सदनाचे नेते त्याचबरोबर विरोधी पक्ष नेते आणि अन्य सदस्यांनी आपल्या उत्स्फूर्त भावना या ठिकाणी मांडल्या.

सन्माननीय सदस्य श्री. कमलकिशोर कदम हे माझ्याबरोबर राज्याचे मंत्री म्हणून सुध्दा काम करीत होते. ज्यावेळी मी स्वतः आमदार होतो तेव्हा ज्या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. कमलकिशोर कदम बसतात ते ठिकाण त्यांचे आणि त्याच्या बाजूला सन्माननीय सदस्य श्री. हुसेन दलवाई यांनी जे ठिकाण घेतलेले आहे ते माझे होते. आम्ही दोघेही बॅक बेंचर्स होतो. त्यावेळी आमचा सातत्याने एक विचार होता की, कोणत्या ना कोणत्या मार्गाने महाराष्ट्रामध्ये असमतोल विकासाची जी भावना सातत्याने तीव्र होत आहे, विदर्भाच्या अनुषंगाने,

*गुरुवार, दिनांक २ डिसेंबर २०१० रोजीच्या दैनिक 'तरुण भारत' मधील वृत्त.*

## *विनम्रता - अनुभवी कारकीर्दीला नव्या पर्वाचा सलाम!*
## *डॉ. रणजीत पाटील बीटींचे घर गाठतात तेव्हा*

**अमरावती, १ डिसेंबर** (शिवराय कुळकर्णी) : विधिमंडळात सांसदीय आयुधांचा प्रभावी वापर करुन ३० वर्षे सातत्याने वाढत्या अनुशेषाविरोधात लढा देणाऱ्या आमदार प्रा.बी.टी.देशमुख या मुरब्बी नेत्याचा पराभव केल्यानंतर विजयाचा उन्माद न आणता, भविष्यात त्यांचे अनुभवी मार्गदर्शन मिळावे म्हणून भाजपाचे नवनिर्वाचित आमदार डॉ. रणजीत पाटील यांनी विजयानंतर सरळ बीटी सरांच्या घरी जाऊन त्यांचे आशीर्वाद घेतले. काल डॉ. रणजीत पाटीलांची विजयाकडे निर्णायक वाटचाल सुरु झाली. तेव्हापासूनच त्यांनी आपल्या शालीनतेचा परिचय दिला!

काल मतमोजणी दरम्यान डॉ. रणजीत पाटील यांची विजयाकडे आगेचूक सुरू असतांना पत्रकारांनी त्यांना प्रतिक्रिया विचारली असता, त्यांनी प्रा.बी.टी.देशमुख यांच्या विषयी अतिशय आदरयुक्त उद्गार काढले होते. आपण निवडून आल्यावर बीटी सरांकडून मार्गदर्शन घेऊ, असे डॉ. रणजीत पाटील यांनी स्पष्ट केले होते. आजच्या विजयानंतर डॉ. रणजीत पाटील यांनी नम्रपणे आपण नवखे असल्याचे स्पष्ट केले. प्रथम आपण संपूर्ण मतदारसंघाचा अभ्यास करू, पदवीधर मतदारांचे प्रश्न आणि समस्या समजून घेऊ आणि त्या आधारे प्रामाणिकपणे पदवीधरांसाठी काम करू, हे सांगतांना त्यांनी बीटींच्या ३० वर्षाच्या कारकिर्दीचा सन्मानपूर्वक उल्लेख केला. आज सकाळी विजयाची घोषणा झाल्यानंतर डॉ.रणजीत पाटील यांनी डॉ. अतुल आळशी यांच्या समवेत थेट बीटींचे घर गाठले. बीटींनीही रणजित पाटलांचे उमदेपणाने स्वागत केले. निवडणूक ही लोकशाहीतील महत्वपूर्ण प्रक्रीया आहे. कधी हार तर कधी जीत होणारच. लोकांनी दिलेला कौल आपण मान्य केला पाहिजे, अशा संवादासह विजयाबद्दल बीटींनी डॉ. रणजित पाटलांचे अभिनंदनही केले. यावेळी डॉ.रणजित पाटील यांनी बीटी सर आपण माझ्यासाठी पितृतुल्य असून, आपले मार्गदर्शन मिळावे आणि आशिर्वाद मिळावा, अशी भावना व्यक्त केली.

सतत ३० वर्षे झुंज दिलेली मात्र, जनरेट्यामुळे थांबलेली अनुभवी कारकिर्द आणि आकांक्षापुढती गगन ठेंगणे वाटणारे नव्याने सुरू झालेले युवा पर्व यांच्यातील या संवादाने वातावरण भावूक झाले होते. अलिकडच्या राजकारणात निवडणूकीच्या रणधुमाळीनंतर मनं कायमची कलुषित झालेली असतात. संवादा ऐवजी कायमचा विसंवादच असतो. मात्र, अमरावती पदवीधर मतदार संघात बीटी आणि डॉ. रणजित पाटील या दोन्ही प्रमुख उमेदवारांनी स्तर सोडून कधीच प्रचार केला नाही. परिणामी दोघांनाही निवडणूक छान झाल्याचे वाटतं होते. डॉ. पाटील यांच्या शालिन भूमिकेचेही कौतुक होत होते!

मराठवाड्याच्या अनुषंगाने, कोकण विभागाच्या अनुषंगाने असमतोल विकासाच्या संदर्भात दिवसेंदिवस तीव्र भावना निर्माण होत आहे आणि त्यामुळे अखंड महाराष्ट्राचे आमचे जे स्वप्न आहे ते नकळत काही प्रमाणात अडचणीत येईल की काय अशा पध्दतीची जी भावना आहे ती कोणत्या पध्दतीने सोडवावयाची यासाठी आम्ही लॉबीत आणि या ठिकाणी सातत्याने विचार करीत होतो. अलीकडच्या काळामध्ये सुदैवाने महाराष्ट्र शासनाने पुढाकार घेऊन विशेषतः पाटबंधारे विभागाची जी तरतूद वाढविली त्यावेळी आम्ही दोघेही खरे खूश झालो. जरी दोन, तीन, चार वर्षात आम्ही समतोल विकास गाठू शकलो नाही तर त्यादृष्टीने महाराष्ट्र शासनाने टाकलेले हे अत्यंत महत्वाचे पाऊल आहे. त्यावेळी आम्ही शेजारच्या आंध्र प्रदेशच्या बाबतीत सातत्याने बोलत होतो. त्या आंध्र प्रदेशमध्ये इरिगेशनसाठी जास्तीत जास्त अर्थसंकल्पीय तरतूद केली जाते. ते कधीही केंद्र सरकारला दाद देत नव्हते. किंबहुना तुम्ही आम्ही ज्यावेळी चर्चा करतो त्यावेळी तुमच्या आमच्याबरोबर सुध्दा ते कधी सरळ बोलत नव्हते. परंतु अर्थसंकल्पामध्ये जास्तीत जास्त तरतूद करुन आंध्र प्रदेशमध्ये जास्तीत जास्त पैसे कसे येतील आणि सिंचनाची क्षमता कशी वाढेल यासंबंधी आम्ही चर्चा करीत होतो. सन्माननीय सदस्य श्री. कमलकिशोर कदम हे अतिशय परखड विचाराचे आहेत. त्याचा सखोल अभ्यास आहे. ते अत्यंत कमी बोलणारे आणि एखाद्या प्रश्नाच्या संदर्भात त्यांचे अत्यंत पक्के मत असले तर मग ते कोणाचीही भीड न बाळगता बोलतात.. ते मनाने अत्यंत मोकळे आहेत. यापूर्वी एकदोन वेळा त्यावेळच्या माननीय सभापतींबरोबर नकळत त्यांची मतभिन्नता झाली. त्यावेळी शेवटी मी सन्माननीय सदस्य श्री. कमलकिशोर कदम साहेबांना विनंती केली. आम्ही दोघेही त्या ठिकाणी बसत होतो. ते माझे म्हणणे मानत होते आणि मी त्यांचे म्हणणे मानत होतो. म्हणून त्यादिवशी ती मतभिन्नता निघून गेली. अशा पध्दतीचे त्यांचे व्यक्तिमत्व होते. महाराष्ट्रामध्ये अत्यंत प्रभावी काम करण्याची ज्यांची उमेद आहे, वैचारिक बैठक आहे असे आपले सर्वांचे मित्र सन्माननीय सदस्य डॉ. कमलकिशोर कदम साहेब निवृत्त होत आहेत. अन्य कामाच्या निमित्ताने ते सभागृहामध्ये काम करीत आहेत. त्यांच्या पक्षामध्येही त्यांचे प्रभावी काम आहे. सन्माननीय श्री. पवारसाहेब आणि त्यांच्या अन्य सहकाऱ्यांचा त्यांच्यावर अढळ विश्वास आहे. अन्य क्षेत्रामध्ये त्यांनी प्रभावी काम करावे, मनन करावे आणि महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने त्यांनी आम्हा सर्वांना सातत्याने वैचारिक फार मोठी देणगी द्यावी आणि या पुढच्या काळात सुध्दा काम करण्याच्या दृष्टीने आम्हाला सहकार्य करावे अशी माझी त्यांना सदनामार्फत विनंती आहे.....

.... सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख हे गेली ३० वर्षे या सदनाचे सदस्य म्हणून आहेत. तेही निवृत्त होत आहेत. **मी राज्यमंत्री आणि मंत्री होतो तेव्हा पासून प्रा. बी.टी.देशमुख साहेबांना पाहिलेले आहे. प्रा. बी.टी.देशमुख सरांचा प्रश्न असला की रात्री अडीचतीन वाजेपर्यन्त अभ्यास करुन सकाळी सभागृहामध्ये येत असताना बी.टी.सरांच्या १३ उपप्रश्नांचा पूर्ण अभ्यास केलेला असला तरी त्याच्या १४व्या आणि १५व्या प्रश्नात अडकणार नाही याची पूर्ण काळजी घेऊन येत होतो.** त्यांच्या मनामध्ये व्यक्तिगत आकस कधीही नव्हता, सर्वसामान्य समाजाचे प्रश्न सुटावेत, विदर्भाच्या अनुशेषाच्या बाबतीत न्याय मिळावा यासारखे अनेक व्यापक प्रश्न ते या सदनामध्ये विचारीत होते आणि विचारलेल्या प्रश्नाची अचूक उत्तरे मिळतील यादृष्टीने त्यांचा प्रयत्न असायचा. प्रा. बी.टी.देशमुख सरांचे वैशिष्ट्य असे की, त्यांची वैचारिक बैठक अत्यंत परखड आणि कणखर आहे. एकदा स्व. सुधाकरराव नाईक साहेबांनी मला एक कामगिरी दिली होती. स्व. सुधाकरराव नाईक हे त्यावेळी राज्याचे मुख्यमंत्री होते आणि मी प्रदेश काँगेसचा अध्यक्ष होतो. त्यांनी मला प्रा.बी.टी.देशमुख सरांशी व्यापक चर्चा करण्यास सांगितले. आम्ही दोघे तासभर एकत्रित बोललो. मी त्यांना सांगितले की, "बी.टी.सर! महाराष्ट्राच्या, विदर्भाच्या आणि शैक्षणिक क्षेत्राच्या हिताच्या दृष्टीने माननीय मुख्यमंत्री आणि मी असे ठरविलेले आहे की, तुम्ही महाराष्ट्राचे शिक्षण मंत्री म्हणून आमच्याकडे यावे. त्यामुळे शिक्षण क्षेत्राचा विकास होईल, महाराष्ट्राच्या विकासाच्या दृष्टीने काम करता येईल." त्यावेळी त्यांनी सांगितले की, "व्यापक चर्चा करावयाची आहे असे जेव्हा मला तुम्ही सांगितले त्याचवेळी, आपण अशी चर्चा करण्याकरिता येणार हे मी हेरले होते". त्यांनी मला असे सांगितले की, "मी वैचारिक बैठकीवर ठाम आहे. काही केले तरी मी माझ्या विचारापासून बाजूला होणे बरोबर नाही. त्यामुळे तुम्ही देऊ केलेले पद मी स्वीकारु शकत नाही." अशा कणखर पध्दतीने उत्तर देणारे महाराष्ट्रातील एक तेजपुंज व्यक्तिमत्व असे बी.टी.सरांच्या बाबतीत म्हणावे लागेल. दुर्दैवाने अनपेक्षितपणे ते पराभूत झाले. तडजोड की तत्व या दोन गोष्टी त्यांच्यापुढे होत्या. त्यांनी तडजोड स्वीकारली असती तर कदाचित ते तरले असते. पण तत्व म्हणून ते पुढे गेले. त्यावेळी नकळत राजकीय दृष्ट्या एक अपघात झाला. मी फक्त एवढेच सांगेन की बी.टी.साहेब तुम्ही ज्या ज्या क्षेत्रात आहात त्या त्या क्षेत्रामध्ये महाराष्ट्रातील सर्व कार्यकर्त्यांना सातत्याने मार्गदर्शन करा. राजकीय आणि वैचारिक जबाबदारीच्या बाबतीत योग्य पध्दतीने मार्गदर्शन करा. आपण या सदनामध्ये पुनश्च यावे यासाठी सदनातील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांचा आपणाला पूर्ण पाठिंबा आहे. ....

.... निवृत्त होणाऱ्या सन्माननीय सदस्यांना निरोप देण्याच्या निमित्ताने आता विधानभवनाच्या मुख्य प्रवेशद्वाराच्या पोर्चमध्ये एकत्रित छायाचित्र काढण्याचा आणि त्यानंतर विधानभवनाच्या प्रांगणात चहापानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. कृपया सर्वांनी उपस्थित रहावे.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. शनिवार, दिनांक ४ डिसेंबर, २०१० रोजी सकाळी १०.०० ते १२.४५ या वेळेत सभागृहाची विशेष बैठक घेण्यात येईल. या बैठकीमध्ये म.वि.प.नियम ९७ अन्वये अल्पकालीन प्रस्तावावरील अपूर्ण चर्चा मंत्रीमहोदयांच्या उत्तरासह पूर्ण करण्यात येईल. सभागृहाची नियमित बैठक दुपारी १.०० वाजता पुनः भरेल.

( सभागृहाची बैठक सायंकाळी ६ वाजून १७ मिनिटांनी, शनिवार, दिनांक ४ डिसेंबर, २०१० रोजीच्या सकाळी १०.०० वाजेपर्यन्त स्थगित झाली. )

*गुरुवार, दिनांक २ डिसेंबर २०१० रोजीच्या दैनिक 'सकाळ' मध्ये प्रसिद्ध झालेले वृत्त.*

# सत्ताधाऱ्यांच्या खेळीनेच 'बी.टी.' पराभूत !

## विरोध नियोजनबद्धच; प्रचाराच्या मर्यादाही उघड

**अमरावती, ता. ३०** : विधानपरिषदेच्या सभागृहात सत्ताधारी पक्षाच्या मंत्र्यांना दस्तऐवजाच्या आधारावर जेरीस आणणाऱ्या बी.टी.देशमुख यांच्या विरोधात यावेळी सत्ताधाऱ्यांनी खेळी खेळून त्यांना सभागृहाबाहेर ठेवण्याचे काम केल्याचे आता स्पष्ट होत आहे. विशेष म्हणजे, अतिशय नियोजनबद्ध पद्धतीने विविध बाजूंनी बी.टीं. च्या विरोधात काम केले गेले.ज्या समान न्यायाच्या मुद्यावर बी.टीं.नी लढा उभारला, त्याचा पाया खिळखिळा करण्याचे काम त्यांनाच आजवर मदत करणाऱ्या सत्ताधाऱ्यांनी केले. यावेळी पदवीधरांची मोठ्या प्रमाणात नोंदणी झाल्याने मतदानदेखील जास्त होईल, असे मानले जात होते. त्यामुळे गफलतीत असलेल्या बी.टी.देशमुख यांचा पराभव झाला. **या निवडणुकीत डॉ. रणजित पाटील यांच्या विजयापेक्षा बी.टीं.च्या पराभवाबद्दलच जास्त बोलले जात आहे.**

इंडिया बुल्स या कंपनीच्या सोफिया औण्गिक प्रकल्पाला बी.टी.देशमुख यांनी केलेला विरोध, सिंचनाच्या पाण्याच्या मुद्यावर त्यांनी घेतलेली आक्रमक भूमिका हेच मुद्दे खऱ्या अर्थाने त्यांच्या पराभवासाठी कारणीभूत ठरले असल्याचे लक्षात येत आहे. सभागृहात ते जोरदारपणे विषय मांडत असल्याने तसेच विदर्भाच्या अनुशेषाच्या मुद्यावर त्यांनी अनेक नेत्यांना चांगलेच जेरीस आणल्याने बी.टीं.ना सभागृहात येऊच द्यायचे नाही, असा निर्णय झाल्याची माहिती असून त्यातूनच बी.टी. देशमुख यांना दर निवडणुकीत पाठिंबा देणाऱ्या सत्ताधारी पक्षाने यावेळी पाठिंबा जाहीर केला नाही. सत्ताधारी पक्षाने आपला उमेदवार न देणे म्हणजे तो आमच्यावर दाखविलेला विश्वास असल्याचे ते सांगत होते. प्रत्यक्षात वेगळेच गणित मांडले जात होते आणि त्यातून त्यांचा पराभव करण्याची योजना साकारत होती. शेवटी, याच कारणांनी बी.टी. देशमुख यांना पराभव पत्करावा लागला. 'नुटा' या संघटनेच्या माध्यमाने त्यांचे गेल्या ३० वर्षापासूनचे काम जारी होते, परंतु काही शिक्षक संघटना नाराज होत्या. प्राथमिक शिक्षकांच्या संघटना एवढ्या ताकदीने बीटींच्या विरोधात सक्रिय होतील, याची कल्पना कुणालाच नव्हती. 'बीटी विरूद्ध २२ उमेदवार' असे या निवडणूकीचे चित्र निर्माण झाले होते.

डिसेंबर १९८० मध्ये झालेल्या विदर्भ पदवीधर मतदारसंघातून प्रा.बी.टी. देशमुख पहिल्यांदा विधानपरिषदेवर निवडून गेले. त्यानंतर डिसेंबर १९८६ मध्ये झालेल्या अमरावती विभाग पदवीधर मतदारसंघातून ते परत निवडून आले. डिसेंबर १९९२ मध्ये याच मतदारसंघातून त्यांनी तिसऱ्यांदा प्रतिनिधित्व केले १९९८ मध्ये चौथ्यांदा, तर २००४ मध्ये पाचव्यांदा त्यांची फेरनिवड झाली. या सर्वच निवडणुकीत बी.टी.देशमुख यांनी त्यांच्या प्रतिस्पर्ध्यापेक्षा दरवेळी पहिल्या पसंतीची आठ ते नऊ हजार मतांची आघाडी घेतली. यावेळी निवडणूक अटीतटीची होणार हे शेवटच्या दोन दिवसांत स्पष्ट झाले होते; परंतु बी.टी. फार कमी फरकाने निवडून येतील, अशी शक्यता वर्तविण्यात येत होती. प्रत्यक्षात भाजप-सेनेचे उमेदवार डॉ. रणजित पाटील यांनी पहिल्या पसंतीची २५ हजार ८ मते घेतली; अन् बीटींना फार मोठा धक्का बसल्याचे स्पष्ट झाले. त्यावेळी बीटींना केवळ १६ हजार ७५८ मते होती. डॉ. संतोष ठाकरे यांना ३ हजार ९९३; तर कांचनमाला गावंडे यांना २ हजार ५२२ मते होती.

*रविवार, दिनांक १२ डिसेंबर २०१० रोजीच्या दैनिक 'लोकमत' मध्ये प्रसिद्ध झालेला अग्रलेख.*

# बी.टीं.च्या निमित्ताने..

गेली अडीच दशके आपल्या अभ्यासपूर्ण भाषणांनी विधिमंडळ गाजविणारे शिक्षक आमदार बी.टी.देशमुख पडले आणि त्यांच्या पराभवाने सारे विधिमंडळ दुःखात बुडाल्याचे दिसले. कुणी म्हणाले "विधान परिषदेतील तोफ हरविली" कुणी म्हटले "विदर्भाचा आकडेवारीनिशी कैवार घेणारा अभ्यासू प्रतिनिधी यापुढे सभागृहात दिसणार नाही." तर कुणाला "शिक्षक आणि पदवीधरांचे प्रश्न धसाला लावणारा आणि विदर्भाच्या विकासासाठी आपली सारी बुद्धीमत्ता पणाला लावणारा पुढारी पडला" याचे दुःख झाले... मात्र याहून दुःखाची जी वेगळी तऱ्हा यावेळी प्रकट झाली ती साऱ्या समाजाला अस्वस्थ करणारी आणि आपल्या लोकशाहीत शिरलेल्या शाही संस्कृतीची ओळख सांगणारी होती. "थैलीशहांनी बी.टीं.चा पराभव केला" इथपासून "पैशाकडून प्रामाणिकपणा पराभूत" इथपर्यंतची व्यथा यावेळी अनेकांनी बोलून दाखविली... गंमत ही की ही व्यथा व्यक्त होत असतांना बी.टी. सभागृहात हजर होते आणि त्यांचा पराभव करण्यासाठी जीवाचा आटापीटा आणि पैशाचा चुराडा केलेले अनेकजणही त्यात होते. त्यातल्या काहींनी त्यांच्या गौरवाची भाषणेही केली.

विधानपरिषदेची निवडणूक कशी होते, तीत पैशाचे वाटप कसे केले जाते आणि त्यातला एकेक मतदार स्वतःची बोली लावूनच कसा बसला असतो याची माहिती बी.टी.ना, त्यांच्या समर्थक व विरोधकांना आणि त्यांच्यावर भाषणे करणाऱ्या त्या सभागृहातील साऱ्यांनाच आहे. बी.टीं.ची निवडणूक पदवीधर मतदार संघातली असल्यामुळे तीत पैसा कमी आणि पक्ष अधिक चालतो हे खरे असले तरी त्या सभागृहात जे सभासद स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत निवडून येतात त्यांचे खिसे किती लक्ष किंवा कोटी रुपयांनी रिकामे झाले असतात याची कहाणी त्यांच्यातील अनेकांना सांगता येईल. विधानसभेच्या आमदारांमधूनही त्या सभागृहाचे एक तृतीयांश सभासद निवडले जातात. त्यासाठी होणाऱ्या मतदानात एकेका आमदाराचा भाव किती लाखांचा असतो आणि जसजशी निवडणूक जवळ येते तसतसा तो केवढ्या वेगाने वर चढत जातो याच्या कथा सारेचजण नंतर चघळताना दिसतात. बी.टीं. च्या पराभवाच्या निमित्ताने व्यक्त होतांना दिसलेली खंत त्याचमुळे खरी नव्हती. ती पुरेशीही नव्हती. खरेतर या निमित्ताने आपण या सभागृहापर्यंत कसे पोहचलो याचा कबुलीजबाबच त्यातल्या प्रत्येक सभासदाने द्यायला हवा.

लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींनी आपले प्रतिनिधी निवडतांना पैसे घेवून मतदान करणे ही प्रथा मूळची भारतीय वा मराठी नाही. ती आपण अमेरिकेतून आयात केली आहे. १९१३ पूर्वी सिनेट या अमेरिकेतील केंद्रीय कायदेमंडळाच्या (काँग्रेस) वरिष्ठ सभागृहाचे सभासद, आपल्या राज्यसभेच्या सभासदांप्रमाणेच राज्यांच्या विधिमंडळांकडून निवडले जात. आरंभी पारदर्शक असलेली ती निवडणूक कालांतराने धूसर व अस्वच्छ बनली व तीत मतांची खरेदी विक्री सुरु झाली. अमेरिका हे तेव्हाही श्रीमंत राष्ट्र असल्यामुळे त्यातल्या मतांची किंमतही मोठी होती. पुढे हा घोडाबाजार नको तेवढा घाण व ओंगळ झाला तेव्हा त्या देशाने घटनादुरुस्ती करून सिनेटचे सभासद प्रत्यक्ष जनतेकडून निवडून देण्याचीच तीत तरतूद करून घेतली.. आपल्या राज्यसभेचेही स्वरुप परवापर्यंत याहून फारसे वेगळे नव्हते. त्या सभागृहाचे सभासद गुप्त मतदानाने निवडले जात तोपर्यंत त्याच्या ज्या अनेक धनवंत उमेदवारांनी मते खरेदी करून खासदारकी मिळवली त्यांची नावे आजही साऱ्यांना सांगता येतील. या निवडणूकीत हात वर करून मतदान करण्याची पद्धत आता सुरू झाल्याने तिच्यातील खरेदी विक्रीला काहीसा आळा बसला आहे. मात्र तेवढ्यावरही त्यातील अनेकांचे हात वर जायला त्यात किती पैसे घालावे लागतात याचे रहस्य आता लपून राहिले नाही. **दारूचे कारखानदार, मोठमोठे बिल्डर्स, उद्योगपती, व्यापारी, कंपन्याचे पदाधिकारी आणि दलालीत सहभागी होणारे पत्रकार यासारखी माणसे केवळ त्यांच्या विधायक गुणवत्तेच्या बळावर तेथे आली असतात**

---

*गुरुवार, दिनांक २ डिसेंबर २०१० रोजीच्या दैनिक 'लोकसत्ता' मध्ये 'व्यक्तिवेध' या सदराखाली प्रसिद्ध झालेला मजकूर.*

# व्यक्तिवेध

विधान परिषदेच्या अमरावती पदवीधर मतदारसंघाच्या झालेल्या निवडणुकीत प्रा.बी.टी.देशमुख यांचा पराभव झाल्याने, प्रदिर्घ काळ सुरु असलेल्या शैक्षणिक चळवळीचा आणि विदर्भाच्या अनुशेषाच्या संसदीय संघर्षाचाही पराभव झाला आहे. भाऊराव तुळशीरामजी उपाख्य बी.टी.देशमुख नावाची चळवळ १९६० साली अमरावतीच्या शैक्षणिक क्षेत्रात सुरू झाली आणि पाहता पाहता या चळवळीने राजकारण, समाजकारण अशा विविध क्षेत्रात संचार सुरू केला. विद्यार्थी असतानाच संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत बी.टी.सहभागी झाले. बी.टी.च्या घरी अठराविश्वे दारिद्र्य होते. पण, तरूण वयापासूनच परिस्थितीला शरण न जाता संघर्षरत राहण्याची बी.टीं.ची वृत्ती होती. शिक्षण आणि संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, **अशा दोन्ही आघाड्यांवर सक्रिय राहण्यासाठी पोट किमान भरलेले असावे, ही मूलभूत गरज होती आणि ती भागवण्यासाठी भाऊराव नावाचा हा युवक चक्क कंपोझिटरचे म्हणजे छापखान्यात अक्षरे जुळवण्याचे काम करत असे.** कंपोझिटरची ही नोकरी करत करतच राज्यशास्त्र या विषयात एम.ए.ची पदवी संपादन केली आणि राज्यशास्त्राचे प्राध्यापक म्हणून शिक्षण क्षेत्रात पाऊल टाकले. तो काळ शिक्षकी पेशासाठी कमी वेतन आणि प्रामाणिकपणे विद्यादानाचा होता. विद्यादान करणाऱ्यांना चरितार्थासाठी येणाऱ्या अडचणी स्वतः अनुभवतांना बी.टी. मधला चळवळ्या जागा झाला त्यातूनच महाविद्यालयीन शिक्षकांच्या मागण्यासाठी विदर्भभर आंदोलने उभारण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला. **नेतृत्वासाठी नैतिक पातळीवर असणारे स्वच्छ चारित्र्य त्यांच्याजवळ होतेच. त्यामुळे शिक्षक चळवळीचे नेतृत्व त्यांच्याकडे आपसूकपणे चालत आले. नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाचे (नुटा) १९७३ पासून आजपर्यंत ते अध्यक्ष आहेत. सलग एखाद्या चळवळीचे ३० वर्षे अध्यक्षपद भूषवले जाण्याचा हा विक्रमच असावा! 'नुटा'चे अध्यक्ष पद सांभाळत असतांनाच महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे अध्यक्षपदही त्यांच्याकडे अपरिहार्यपणे आले.**

चळवळी उभारतानाही विद्यादानाच्या व्रतापासून बी.टी. क्षणभरही ढळले नाहीत. प्राध्यापकपदाच्या नोकरीतून अधिकृतरित्या निवृत्त होईपर्यंत म्हणजे ३०-३२ वर्षे बी.टी. नियमितपणे शिकवत असत. केवळ रस्त्यावर संघर्ष करुन शिक्षकांचे प्रश्न सोडवता येणार नाही. म्हणून १९८० साली बी.टीं.नी विदर्भ पदवीधर मतदारसंघातून महाराष्ट्र विधान परिषदेत प्रवेश केला. अमरावती विद्यापीठाची स्थापना करण्यासाठी बी.टीं.नी विधिमंडळात सर्व संसदीय अस्त्रांचा वापर केला. हे विद्यापीठ स्थापन झाल्यावर म्हणजे १९८६ मध्ये हा मतदारसंघ अमरावती विभाग पदवीधर मतदारसंघ म्हणून ओळखला जाऊ लागला. **या मतदारसंघातून सलग पाच वेळा बी.टी.विधान परिषदेवर विजयी झाले. ३० वर्षाच्या संसदीय जीवनात त्यांची प्रतिमा अभ्यासू आमदार म्हणून राहिली. शिष्टाचाराचा, वर्तनाचा कोणताही तोल ढळू न देणारा आणि तरी अत्यंत आक्रमक आमदार म्हणून बी.टी.देशमुख यांची कारकीर्द तेजस्वी राहिली, तशीच ती निष्कलंकही राहिली. याच संयत आक्रमकतेच्या जोरावर शिक्षकांचे अनेक प्रश्न सोडवण्यात बी.टी.ना यश आले. एखाद्या विषयावर बी.टी. बोलायला लागले तर संपूर्ण सभागृहात पूर्ण शांतता असे.** दहा बारा वर्षात बी.टी. आणि नितीन गडकरी यांच्या पुढाकाराने सभागृहात विदर्भाच्या अनुशेषाच्या निवारणासाठी जो 'संसदीय संघर्ष' उभारला गेला, त्याची नोंद सुवर्णाक्षरांनी होईल. विदर्भ विकासाच्या निधीवर डल्ला मारणाऱ्यांना देशमुख गडकरी या दुकलीने अक्षरशः सळो की पळो करून सोडले. भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष झाल्यावर गडकरी दिल्लीला गेले आणि विकासाच्या संसदीय लढाईची जबाबदारी एकट्या बी.टी.वर आली. एकाच वेळी संसदीय आणि उच्च न्यायालय अशा दोन पातळ्यांवर एकहाती ही लढाई बी.टी.लढत होते. बी.टी.च्या पराभवामुळे विधान परिषदेतील या लढाईचे नेतृत्वच संपले आहे. असे नव्हे तर या लढाईची धार अतिशय बोथट झाली आहे. विधान परिषद निवडणूकीतील बी.टी. देशमुख यांच्या पराभवाचा अर्थ इतका असा व्यापक आहे आणि विदर्भाचे केवढे मोठे नुकसान झालेले आहे हे स्पष्ट करणारा आहे. बी.टी.देशमुख तन आणि मनाने चळवळे आहेत. वयाच्या सत्तरीतही चैतन्याने फुललेलेच आहेत. ते हार मानणार नाहीत. आता पुन्हा रस्त्यावरचा संघर्ष सुरू करतील. त्यांच्या पुढच्या लढाईला शुभेच्छा!

**यावर फक्त भाबड्यांचाच विश्वास बसू शकेल.** हात वर करून राज्यसभेचे सभासद निवडण्याच्या नव्या पद्धतीमुळे मतांसाठी पैसे हा गैरप्रकार थांबेल असे ज्यांना वाटते त्यांनी एक आणखीही गोष्ट लक्षात घ्यायची आहे. पैसे देवून मते विकत घेणे यामुळे थांबत असले तरी पैसे देऊन तिकीट विकत घेणे मात्र त्यातून थांबत नाही. तिकीट उघड्यावर दिले जात नाही आणि ते मिळवणारे त्यासाठी मोजलेली किंमत बाहेर सांगत नाहीत. राज्यसभा हे वरिष्ठांचे, ज्येष्ठांचे आणि अनुभवी अभ्यासकांचे सभागृह मानले जाते. लोकसभेच्या चुका दुरुस्त करण्याची गंभीर जबाबदारी त्या सभागृहावर असते ही गोष्ट राज्यशास्त्राचे प्राध्यापक राहिलेल्या बी.टी. देशमुखांनीच त्यांच्या विद्यार्थ्यांना वर्षानुवर्षे शिकविली असणार. **तरीही या सभागृहात दारूवाले, दोन नंबरचा व्यवसाय करून गब्बर बनलेले, दरदिवशी नव्या बाईच्या खांद्यावर नको तसा हात ठेवून आपली छायाचित्रे काढून घेणारे, अपक्व, अननुभवी, नवखे आणि साऱ्या क्षेत्रात अपयशी म्हणून नाकारले गेलेले लोक का व कसे निवडून येतात याची उजळणी कोणी नव्याने करण्याचे कारण नाही.**

राजकारण स्वच्छ, सुसंस्कृत आणि पारदर्शक करायचे तर ते केवळ घोटाळ्यांच्या चौकशीत दोषी आढळणाऱ्यांना शिक्षा ठोठावल्याने करता येणार नाही. त्यामुळे काही काळ दहशतीचे वातावरणच तेवढे उत्पन्न होईल. राजकारणाच्या स्वच्छतेसाठी त्यात चांगली, अभ्यासू व स्वच्छ माणसे यावी लागतील. बी.टीं. सारखी माणसे त्यात पराभूत होणार नाहीत याची साऱ्याच पक्षांना व त्यांच्या नेत्यांना काळजी घ्यावी लागेल. सारे आयुष्य समाजाच्या सेवेत निःस्वार्थपणे घालवलेल्या माणसांना एखादा पुरस्कार द्यायचा, कुठल्यातरी सन्मानाने गौरवायचे आणि नुसत्याच तोंडी प्रशंसेने त्यांची बोळवण करायची हा सध्याचा प्रकार असाच चालू राहीला तर आताच्या दुर्दैवी स्थितीत परिवर्तन व्हायचे नाही. कालपरवा राजकारणात येवून अब्जाधीश झालेली नवी माणसे सत्तेवर रहात असतील आणि आयुष्याचा प्रत्येक क्षण समाजासाठी नुसताच झिजवत जगणारी माणसे पुरस्कार आणि सन्मानावर बोळवली जात असतील तर राजकारण आणि स्वच्छता यांच्यातील अंतर कधी दूर व्हायचे नाही. गांधीजी म्हणत, जी गोष्ट नैतिकदृष्ट्या चुकीची असते ती राजकीय किंवा दुसऱ्या कोणत्याही

*सोमवार, दिनांक ६ डिसेंबर २०१० रोजीच्या दैनिक 'हिंदुस्थान' मध्ये प्रसिद्ध झालेला अॅड नरेंद्र काळे यांचा लेख.*

# 'खास - आदमी' च्या आदर्शामुळे 'आम आदमी' चे नुकसान

चांगला माणूस पराभूत होवून मागे पडतो त्यावेळी मानवी संस्कृतीचे फार मोठे नुकसान होते. कर्तृत्ववान आणि चांगल्या माणसाच्या पराभवामुळे सारेच दुःखी झाले आहेत. आपल्या आदर्शवादी पिठात व्यवहार वादाचे थोडेसे मीठ घातल्यास चांगल्या भाकरी थापल्या जातील आणि त्यातून आम आदमीचे भले होईल. - ***अॅड नरेंद्र काळे***

आदरणीय बी.टी.साहेब,

अनंत कोटी नमस्कार,

असं काही घडेल अस स्वप्नातही वाटलं नव्हतं. तुमचा विजय निश्चित आहे हे प्रत्येकाला वाटत होत, विरोधाकांना सुद्धा. परंतु विपरित घडलं. निकालानंतर सर्व अस्वस्थ झाले. तुमचा पराभव तमाम जनतेला चटका लावून गेला. त्यात सर्व साधारण माणूस ते बुद्धिवंतांचा समावेश आहे. लोकशाहीच्या निवडणूक पद्धतीत कधी कधी काही निकाल मनाला चटका लावून जातात व त्याची चर्चा बरेच दिवस चालते, दुसऱ्या महायुद्धात ब्रिटनचे तत्कालीन पंतप्रधान चर्चिल यांनी विजयश्री खेचून आणली होती, परंतु लगेच झालेल्या सांसदीय निवडणुकीत चर्चिल यांना पराभवाला सामोरे जावे लागले. स्व. पंतप्रधान इंदिरा गांधी यांचा पराभव समाजवादी नेते राजनारायण यांनी केला होता. तसंच आता तुमच्याबाबत घडलं. मागासलेल्या विदर्भातील सिंचनाचा अनुशेष दूर करण्यासाठी आपण केलेलं कार्य हिमालयाएवढं मोठं आहे.

आपल वर्क्तृत्त्व, कर्तृत्त्व आणि त्यातुन निर्माण झालेलं नेतृत्त्व सर्वांना माहीत आहे. आपलं बोलणं आणि बोललेल कृतीत उतरविणे हा आपला स्वभाव होता आणि त्यामुळेच आम आदमीचा तुमचा नेतृत्त्वावर पुर्ण विश्वास होता. महाविद्यालयीन जीवनापासून तोच पांढरा शुभ्र पायजामा आणि पांढरा शुभ्र झब्बा. आजच्या सारख्या घोटाळ्याच्या वातावरणातही तुमच्या पांढऱ्या शुभ्र कपड्यांवर अद्यापपर्यंत भ्रष्टाचार किंवा व्यभिचाराचे शिंतोडे उडालेले नाहीत.

**आदर्शवादी नेतृत्त्व**

आपले नाव कुठल्याही घोटाळ्यात समोर आले नाही हे आपल्या राजकीय जीवनाचे वैशिष्ट्य आहे आणि म्हणूनच विधानपरिषदेने आपल्याला भावपूर्ण निरोप दिला. **खरं म्हणजे विधानपरिषदेतील निरोप समारंभांची भाषणे म्हणजे एक प्रकारचा सोपस्कार असतो, परंतु त्या दिवशी आपल्या बाबतीत वेगळे पहायला आणि ऐकायला मिळावे. सांसदीय इतिहासात असं कधी घडल नाही. संपूर्ण विधान परिषद गहिवरून आली. प्रत्येक आमदार व मंत्री अंतःकरणापासून बोलत होता. आपण केलेल्या कर्तृत्वाची आठवण करून देत होता. प्रेस गॅलरीमधील पत्रकार मंडळींनाही वाईट वाटत होते.** सभापती शिवाजीराव देशमुख, आर.आर. पाटील, अजित पवार, छगन भुजबळ व पांडुरंग फुंडकर इत्यादींना आपल्या भावना व्यक्त करतांना गलबलून गेले होते. साऱ्या सभागृहानं उभं राहून तुम्हाला निरोप दिला. फारच कमी राजकीय नेत्यांच्या वाट्याला असा निरोप समारंभ येतो. निरोप समारंभाचे आपले भाषण ऐकले आणि माझ्या सारख्या आम आदमीच्या मनाला असे वाटले की, आपला अती आदर्शवाद आपल्या पराभवाला कारणीभूत ठरला.

पोस्टर्स लावले असते, थोडी फार स्वतःची जाहिरात केली असती आणि नवीन मतदारांशी थोडा बहुत सरळ संपर्क साधला गेला असता तर अधिक बरे झाले असते. राजकीय निवडणूक ही एक कुरुक्षेत्रावरील लढाई सारखीच असते, कुरुक्षेत्रावरील लढाई जिंकण्यासाठी धर्मराजालाही खोटे बोलावे लागले होते. धर्मराजालाही अश्वत्थामा मरण पावला असे म्हणावे लागले होते.

**मधू दंडवते**

काही वर्षापूर्वीची गोष्ट आहे. स्व. मधु दंडवते यांचे नाव देवगौडा यांच्याऐवजी पंतप्रधान म्हणून पुढे आले होते. बिहारमधून मधू दंडवते यांनी राज्यसभेवर जावे यासाठी लालू यादव त्यांचे मागे होते. फक्त मधू दंडवते यांना एक प्रतिज्ञापत्र द्यावयाचे होते की, मी बिहार प्रदेशचा रहिवासी आहे. मधू दंडवतेंचा अति आदर्शवाद आडवा आला आणि दंडवते ऐवजी देवेगौडा पंतप्रधान झाले. स्व. मधू दंडवते यांच्यापासून व्यावहारिक यश दूर पळाले. मधू दंडवतेंनी प्रतिज्ञापत्र दिले नाही.

आपले विद्यमान पंतप्रधान मनमोहन सिंग हे कर्तृत्ववान आहेत. हुषार आहेत. काही वर्षापूर्वी वित्तमंत्री म्हणून त्यांचा शपथविधी पार पडला होता. सहा महिन्याच्या आत राज्यसभेवर पाठविणे अत्यंत जरुरीचे होते. त्यांनी त्यावेळी आपले प्रतिज्ञापत्र दाखल केले आणि चक्क सांगितले की मी आसामचा रहिवासी आहे. त्यावेळी ते वित्तमंत्री होते. ते वित्तमंत्री झाल्याने देशाचा फायदा झाला व ते आज प्रधानमंत्री आहेत. मी आसामचा रहिवासी आहे असे प्रतिज्ञापत्र दाखल केले होते. त्यामुळे ते प्रामाणिक नाहीत असे कुणी म्हणत नाही. त्यांच्या नेतृत्त्वामुळे आज देशाचा फायदाच होत आहे. चांगला माणूस पराभूत होऊन मागे पडतो. त्यावेळी मानवी संस्कृतीचे फार मोठे नुकसान होते. कर्तृत्ववान आणि चांगल्या माणसाच्या पराभवामुळे सारेच दुःखी झाले आहेत. आम आदमीच्या विकासाचे स्वप्न नेस्तनाबूत झाले आहे. सिंचनासाठी राखीव असलेल्या पाण्याचा उपयोग इतर कामासाठी होवू नये या आपल्या भूमिकेमुळे आम आदमी आपल्यावर जाम खूष आहे. आम आदमीच्या भल्यासाठी विशेषतः सिंचनाचा अनुशेष दूर करण्यासाठी आपण तन-मन-धनाने संघर्ष करावा, अशी आम आदमीची इच्छा आहे. शैक्षणिक क्षेत्रातील तज्ञ म्हणून विधान परिषदेवर राज्यपालांनी आपली नियुक्ती करावी, असे आम आदमीला वाटते. यदाकदाचित तशी ऑफर आपणास आल्यास ती 'ऑफर' धुडकावू (शिक्षण मंत्र्यांची ऑफर धुडकावली होती) नये असे आम आदमीला वाटते.

प्रामाणिकपणा आणि वास्तविकता एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. त्याचप्रमाणे आदर्शवाद आणि व्यवहारवाद एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. आदर्शवाद आणि व्यवहारवाद यांचा समन्वय साधल्या गेल्यास आम आदमीचे भले होईल. आपल्या आदर्शवादी पिठात व्यवहार वादाचे थोडेसे मीठ घातल्यास चांगल्या भाकरी थापल्या जातील आणि त्यातून आम आदमीचा विकास होईल.

दृष्टीने बरोबर असू शकत नाही. समाजकारणातील चांगली माणसे राजकारणात चालत नसतील आणि त्यातली बी.टी.सारखी माणसे दूरच राखली जाणार असतील तर आताचा अनाचार संपणार नाही आणि राजकारणाला चांगले वळण कधी मिळणारही नाही.

बी.टी.देशमुखांच्या पराजयाला इतर कारणे नसतीलच असे नाही. मात्र त्यांच्या पराजयाच्या निमित्ताने राजकारणाने केलेले अरण्यरूदन असह्य झाले म्हणून हे लिहायचे. **त्यातून बी.टीं.ना पराभूत करणारा मतदार संघ शिक्षक, प्राध्यापक व पदवीधर अशी बिरूदे मिरविणाऱ्यांचा. ग्रामीण व अशिक्षितांचे मतदार संघ जातीपातीच्या किंवा मतविक्रीच्या गर्तेत असतात तसा तो असणार नाही. त्यात विचार करणाऱ्या, सेवेचा आदर आणि कर्तृत्त्वाची कदर करणाऱ्यांचा वर्ग मोठा असणार. त्यातून बी.टी. हे प्राध्यापकांचे नेते, शिक्षकांचे शिक्षक आणि प्रसंगी सरकारवरही मास्तरांची छडी उगाणारे. त्यांचा पराभव शिक्षितांचे वर्ग ठरवून करीत असतील तर राजकारणात यशस्वी होण्याची सगळ्या सत्प्रवृत्तींची आशाच मावळेल.** डॉ. मनमोहनसिंग हे एकेकाळी नवी दिल्ली या उच्चंभ्रूच्या मतदारसंघातून पराभूत झाले तेव्हा सारा देश हळहळला होता. त्यांच्याविरुद्ध तेव्हा निवडून आलेल्या इसमाचे नाव आता कोणाच्या स्मरणातही नाही. **बी.टी. बाबतची अशीच हळहळ साऱ्या विदर्भात नव्हे तर महाराष्ट्रातील जनतेतही आहे... त्यांचा पराभव त्यांना काही शिकवणारा नाही, तो समाजालाच आत्मपरीक्षण करायला लावणारा व त्याला धडा शिकविणारा आहे.** सध्याच्या संसदेत असलेल्या शंभराहून अधिक सदस्यांवर खून, बलात्कार आणि खंडणीखोरी यासारखे गुन्हे आहेत. विविध राज्यांच्या विधिमंडळातही गुन्हेगारांची संख्या समाजाला भीती वाटायला लावावी एवढी मोठी आहे. गुन्हेगार निवडून येतात, जनतेच्या पैशाचा अपहार करणारी माणसे मंत्रिमंडळात असतात, प्रसिद्धीमाध्यमे अशा माणसांना नको तेवढी प्रसिद्धी देऊन त्यांचा उदोउदो करण्यात पुढाकार घेतात आणि चांगली व प्रामाणिक माणसे राजकारणापासून दूर राहतात किंवा त्यात पराभूत होतात हा साऱ्यांनी काळजी करावी असा विषय आहे.

---

*गुरुवार, दिनांक २ डिसेंबर २०१० रोजीच्या दैनिक 'हिंदुस्थान' मध्ये प्रसिद्ध झालेला अग्रलेख.*

# भाजपचा गड आला पण विदर्भाचा सिंह ....

पदवीधर मतदार संघ हा तीस वर्षापूर्वी भाजप म्हणजे जनसंघाचा गड होता. शिक्षक मतदार संघ व पदवीधर मतदार संघाचे त्यावेळी कार्यक्षेत्र फार मोठे होते. विदर्भात नागपूर येथे विभागीय मुख्यालय व नागपूर विद्यापीठ असल्याने पदवीधर मतदार संघाचे सिमांकनही नागपूर महसुल विभागीय मुख्यालयाचे अंतर्गत होते.

भाजपचे गड असलेले हे दोन्ही मतदार संघ त्यांच्यापासून हिरावून घेण्याचे घाडस बी.टी. उर्फ भाऊराव देशमुख यांनी केले. भाऊरावांची पहिली पदवीधर मतदार संघातील निवडणूक ही नागपूर विभागीय महसुल आयुक्तालयाच्या सिमांकनात झाली. नागपूर विद्यापीठ टिचर्स असोसिएशनच्या बॅनरखाली ही निवडणूक लढविण्यात आली. नागपूरचे अरविंद बारहाते व त्यांचे सहकारी बी.टी. सोबत असल्याने या निवडणूकीत बी.टीं. ना यश आले. नुटाचा जन्म भारतीय विद्यामंदीरात झालेल्या सभेत झाला.

भाऊरावांचा विजय महाविद्यालयीन व उच्च माध्यमिक, माध्यमिक व प्राथमिक शिक्षकांना सुगीचे दिवस आणणारा ठरला. प्रशासनास शास्त्रशुद्ध पद्धतीप्रमाणे शिक्षकांना मिळणारा पगार व पदोन्नतीबद्दल होत असलेल्या भेदभावाची माहिती दिली. महसुल व इतर कार्यालयात सेवा देणाऱ्यांना मिळणारी पदोन्नती नी त्यांचे वाढत जाणारे पगार व इतर सवलतींचा लाभ व उच्च शिक्षण घेवून होणारे प्राध्यापक शिक्षक यांच्या पगारात व पदोन्नतीत होणारी वाढ याचे शास्त्रसुद्ध विवेचन बीटींनी केले व यश मिळविले, शिक्षक प्राध्यापकांना आश्वस्त सेवा केवळ भाऊरावांनी मिळवून दिली.

शिक्षकांच्या नंतर शेतकऱ्यांच्या प्रश्नासंबंधी भाऊरावांनी आपला मोर्चा वळविला. शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या प्रकरणी सरकार आता बोलते, परंतु २० वर्षापासून भाऊराव सिंचनासाठी शासनास धारेवर धरत होते. विदर्भाचा विकास निधी पळविल्या जात असल्याचे त्यांनाच सर्वप्रथम लक्षात आले. अमरावती विभागातील पांचही जिल्ह्यांचा सिंचन अनुशेष, पुर नियंत्रण, रस्ते, बायपास, रिंग रोड असे अनेक प्रश्न त्यांनी सातत्याने सभागृहात लावून धरले.

अमरावती जिल्हा सर्वाधिक सिंचन अनुशेष असलेला जिल्हा. अप्पर वर्धा, वर्धा डायव्हर्शन अमरावती शहराचा वाढीव पाणी पुरवठा, चंद्रभागा प्रकल्प, पेढी प्रकल्प असे जिल्ह्यातील सर्वच लहान, मोठे, मध्यम सिंचन प्रकल्प भाऊरावांची कायम स्वरुपी विदर्भाला ठेव म्हणावी लागेल. अकोला शहराला असलेला पुराचा धोका टाळण्यासाठी कराव्या लागणाऱ्या उपाय योजनेसाठी सरकारकडे त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला. 'पाणी हेच जीवन' म्हणून विदर्भवासियांचे जीवन सुखी करण्यात भाऊरावांचा सिंहाचा वाटा. विदर्भाच्या अनुशेषाचे अभ्यासक, विदर्भाच्या कृषकांच्या प्रश्नावर सभागृहात पोटतिडकीने बोलणारे, भुमातेची, मानवाची तृष्णातृप्ती करणारे भगीरथ म्हणून भाऊरावांनी कार्य केल. अमरावती विद्यापीठाची स्थापना व त्याच्या संपूर्ण कार्यपद्धतीचे नियोजन व मांडणी भाऊंनी केली.

सातत्याने ३० वर्षे पदवीधर मतदार संघाचे कार्य करतांना सर्वांनाच खुष करणे त्यांना जमले नाही. तो त्यांचा स्वभाव नाही. व्यक्तिगत कामापेक्षा सामुहिक जनहिताचे कामाकडे अधिक लक्ष. त्यामुळे बी.टी. विरोधकांना राईचा पर्वत करणे शक्य झाले. नविन नोंदविण्यात आलेला मतदार विरोधकांचे एकच लक्ष, महाभारतातील अनिमन्युसारखे चक्रव्युहात अडकविण्यास विरोधकांना आलेले यश व अति आत्मविश्वास असे कांहीसे वर्णन या पराभवाचे करावे लागेल. ३० वर्षे विदर्भाच्या अनुशेषावर लढणारा हा विदर्भाचा सिंह सभागृहात नसल्याने अनेकांना चुकल्या चुकल्यागत वाटेल.

निवडणूकीत जय-पराजय होतातच, परंतु त्यामुळे लोकप्रियतेचा आलेख कमी होत नाही. भाऊरावांचा पराभव बरोबर आहे हे मान्य करावेच लागेल. डॉ. पाटील यानी विजयी होताच आपण बी.टी. सराचा आदर करतो असे गौरवोद्गार काढून त्यांच्या कार्याची व लोकप्रियतेची पावती दिली.

डॉ. पाटील यांची जबाबदारी निश्चितपणे वाढली आहे. सभागृहात पदवीधर मतदार संघाच्या प्रतिनिधिने गेल्या ३० वर्षात निर्माण करुन ठेवलेले, शुद्ध आचरण, अभ्यासू वृत्ती, समस्यांचा सातत्याने अभ्यासपूर्ण पाठपुरावा हा वसा जोपासावा लागेल. इतर मतदार संघापेक्षा हा मतदार संघ वेगळा आहे. या मतदार संघात निवडून येणारे प्रतिनिधीही वेगळे आहेत हे त्यांना दाखवून द्यावे लागेल. सभागृहातील गोंधळात सहभागी होण्यापेक्षा डॉक्टरांनी समस्यांवर उपचार करावेत अशी अपेक्षा आहे.

महाराष्ट्रात झालेल्या विधान परिषदेच्या निवडणूकीतील मतदार सुशिक्षित असतो. पदवीधर, शिक्षक, असणाऱ्या मतदारांना मत कसे द्यावे हे कळत नसल्याचे दुर्दैवाने पुन्हा एकदा सिद्ध झाले. खानदेश मधील, जळगांव मधिल निवडणूक असो की अमरावतीचा पदवीधर मतदार संघ, मते अवैध होण्याचे प्रमाण चिंतनीय आहे असे कां व्हावे. या मतदार संघातील मतदार साक्षर की निरक्षर, केवळ पुस्तकी ज्ञान म्हणजे सर्वच होत नाही हे या मतदार संघातील अवैध झालेल्या मतांनी सिद्ध केले त्यामुळेच अवैध मतांची संख्या चिंतनीय झाली आहे याचाही मतदारांनी विचार केला पाहिजे.

विदर्भातील गेल्या तीस वर्षाची भाजपची हुकमी आमदारकी भाऊराव देशमुख यांनी हिरावून घेतली होती. ती पुन्हा काबीज करून भाजपने आपला गड पुन्हा जिंकला पण विदर्भाच्या प्रश्नाचा सभागृहातील सिंह मात्र पराभूत झाला. लोकशाहीतील ओली सुकीचा खेळ आहे तो खेळाडू वृत्तीने स्विकारावा हे मान्य केलेच पाहिजे. डॉ. पाटील यांच्या विजयाबद्दल अभिनंदन व शुभेच्छा.

*गुरुवार, दिनांक २ डिसेंबर २०१० रोजीच्या दैनिक 'विदर्भ मतदार' मध्ये प्रसिद्ध झालेला अग्रलेख.*

# प्रा.बी.टी.देशमुखांचा पराभव ...
# बुघ्यांकाची जेथे गच्छंती ! तेथे कर माझे जुळती !!

महाराष्ट्र विधान परिषदेच्या निवडणुकीत त्या त्या मतदार संघातील मतदारांनी जो 'कौल' दिला आहे तो अत्यंत भयावह असून लोकशाहीचा थरकाप उडविण्यास तो पुरेसा आहे. मतदारांच्या घरावर सोन्याची 'कौलं' चढविल्यानंतर मिळणारा हा 'कौल' आहे. स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघातील ३०० ते ४०० मतदारांपैकी दोन अडीचशे मतदारांना ५ ते २५ लाखाची चोळी बांगडी 'नजर' करुन 'पैशा'च्या जोरावर जर 'पिशाच्चं' प्रतिष्ठित होणार असतील तर अशा 'लोकशाही'चे नेमके करायचे काय? या प्रश्नाचा विचार आता सुज्ञ आणि स्वच्छ (आम्ही सुज्ञ म्हटलेलं आहे बरं...) मतदारांना करावाच लागेल. जळगाव स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघात सुरेशदादा जैन समर्थित राष्ट्रवादी बंडखोर मनिष जेन यांनी ४५ कोटी, विरोधी पक्ष नेते एकनाथ खडसे यांचे पुत्र निखील खडसे यांनी ३० कोटी आणि राष्ट्रवादीचे अधिकृत उमेदवार अनिल चौधरी यांनी १२ कोटी असे एकूण ८७ कोटी खर्च केल्याचे वृत्त दैनिक लोकमतने प्रकाशित केले आहे. जळगावात मनिष जैन यांची संपूर्ण निवडणूक मोहिम सुरेशदादा जैन यांनी हाकली होती, त्यामुळे लोकमतने दिलेला ४५ कोटीचा आकडा निश्चितपणे खरा असावयास हरकत नाही. यवतमाळात राष्ट्रवादीच्या उमेदवाराने प्रती मत ४ ते १० लाख रुपये मोजल्याचा ठोस पुरावाच दैनिक मतदारकडे आहे. सर्वसामान्य मतदारांनी नगर परिषद, महानगरपालिका, जिल्हा परिषद, सदस्यांना निवडून द्यायचे आणि त्यांनी आपल्या मतदारांना विकून असे शेणं खायचे हे आता नित्याचेच झालेले आहे. यवतमाळ स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघात सर्व उमेदवारांचा मिळून २० ते २५ कोटी रुपये खर्च झाला. तेथे एका मतदाराचे मुल्य ४ ते १० लाख होते मग जळगावातील ८७ कोटी रुपये खर्चात तेथील मतदारांचा किती सहभाग असेल? लावत बसा हिशोब.

निवडणूक म्हणजे 'मतदान' आणि मतदान म्हणजे पैसा हे समिकरण आता लोकशाही व्यवस्थेचा पाया झाला आहे. बंधू-भगिनींच्या निवडणुकीत रंजल्या गांजलेला विचारा गरजू मतदार जमेल तसा जमेल तेवढा हात मारतो तेव्हा किती गहजब होतो? सर्वसामान्य मतदारांनी स्थानिक स्वराज्य संस्थांवर निवडून दिल्यामुळे दारिद्र्य रेषेच्या वर पोहोचलेले मतदार आपापल्या गव्हाणीत हादडत हुदडत असतांनाच विधान परिषदेसारख्या निवडणुकीत 'आंघोळ' केल्याशिवाय राहत नाहीत. एवढेच काय? खाऊन 'पिऊन' सुखी असलेले विधानसभा सदस्यही विधान परिषद वा राज्यसभा निवडणुकीत चांगलाच हात मारतात हे डॉ. अनिल बोंडे यांनी, मधुकर भावे यांच्यावर 'आमदारांनी मतासाठी २-२ कोटी घेतले' या अमरावती मुक्कामी केलेल्या विधानावर दाखल केलेल्या हक्कभंगामुळे सर्वसामान्यांच्या लक्षात आले. म्हणजे मतदार मग तो सर्वसामान्य असो वा असामान्य, असतो भिकारीच, फरक असतो केवळ कपड्यांचा, रकमेचा आणि ही रक्कम खाण्याच्या पद्धतीचाच का? असा भयावह प्रश्नार्थक विचार करण्यास भाग पाडणारी आपली ही लोकशाहीतील निवडणूक पद्धत धनदांडग्यांची बटीक झाल्याच्या शक्यतेवर शिक्कामोर्तब करणाऱ्या स्थानिक संस्था मतदार संघातील विधान परिषद निवडणुका लोकशाहीवरील विश्वास उडविणाऱ्या, भांडवलशाहीला भक्कम करणाऱ्या ठरत आहेत. अशा पार्श्वभूमीवर पदवीधर व शिक्षक मतदार संघाची निवडणूक मात्र यास अपवाद ठरत आहे. मतदारांना पैसा देऊन निवडून येण्याएवढी प्रगल्भता अद्याप या मतदार संघांना लाभलेली नाही, मतदारांची संख्या आणि महत्वाचे म्हणजे शिक्षीत असल्याने (सुशिक्षीत कसे म्हणायचे?) भिकारी वृत्ती ऐवजी स्वाभिमानी शिकवण अंगी रुजल्याने म्हणा वा सधनतेमुळे म्हणा पैशाचा प्रादुर्भाव आज तरी या निवडणुकीस झालेला नाही. असे असतांना बी.टी. का पडले? बी.टी. विव्दतेत कुठं फिके पडले? त्यांच्या आमदारनिधीच्या पारदर्शकतेत उघडे पडले? विदर्भाच्या कोणत्या प्रश्नांसाठी त्यांनी हात राखला? सिंचनाच्या अनुशेषाची संपुष्टी व्हावी म्हणून लढण्यात कुठे बी.टी. मागे राहले? तरी त्यांना मतदारांनी का नाकारले?

महाराष्ट्र विधान परिषदेत ३० वर्षाचा लढा जगणाऱ्या बी.टीं.नी आपल्या या अर्ध्या आयुष्यात ना स्वतःची संस्था उघडली ना एखादी शाळा आणली. प्राध्यापक, शिक्षक, पदवीधर एवढेच नव्हे तर शेतकऱ्यांसाठी लढणाऱ्या या लढवय्याने ना कोणती माया जमवली ना कोणत्या मोहात ते कधी पडले. गेल्या ३० वर्षात त्यांनी त्याच्या आमदार निधीचा दुरुपयोग केल्याचा आरोप करणाऱ्या एका ढालचोराने जेव्हा बी.टीं.नी गेल्या ३० वर्षात कुणा कुणाला कसा निधी दिला? याची माहिती गोळा केली तेव्हा त्याचे डोळे पांढरे झाले. पुराव्याआधीच आरोप करणाऱ्या त्या उमेदवाराला नंतर बी.टी. सरांच्या आमदार निधीचा तपशिल प्रकाशित करण्याची हिंमत झाली नाही. तसे त्याने ते प्रकाशित केले असते तर बी.टीं.चाच प्रचार झाला असता आणि प्रकाशित करणाऱ्यांची 'शोभा' झाली असती. एका शाळेचं उदाहरण फार बोलकं आहे. ग्रामीण भागातील शाळेत अचानक 'बोअर' करणारी मशीन येऊन थांबली. आम्हाला शाळेत 'बोअर' करण्याचे सांगण्यात आले आहे. बी.टी. सरांच्या आमदार निधीतून हे काम होणार आहे असं त्या बोअरवाल्यांनी सांगताच आनंदलेले शाळा व्यवस्थापन म्हणाले, आम्ही तर अशी मागणी बी.टी.देशमुखांकडे कधी केलीच नव्हती. आमच्या इकडच्यांना मागितली होती. त्याने आम्हाला १० टक्के मागितले होते आणि आता न मागताच बोअरवेल मिळणार. वाऽऽरे गजब आमदार... तर बी.टीं.च असं होतं. कारण त्यांची आमदारकी त्यांच्यासाठी कधीच नव्हती. आमदारकी, खासदारकी, नामदारकीपेक्षा बी.टी. मोठे आहेत. मंत्र्यांना घाम फोडणारा माणूस आपण पाडला. आपणच आपल्याला पाडून आपण काय मिळवलं?

अमरावती विद्यापीठातून पदवी घेतलेल्या काही विद्वानांच्या मते ही परिवर्तनवादी लाट होय. मतदारांना परिवर्तन हवं होतं त्यांनी ते घडवून आणलं. बस्स. एव्हढचं. खरंच हे परिवर्तन आहे का? एखादी वाईट गोष्ट घालवून चांगली आणणे. प्रस्थापित करणे म्हणजे परिवर्तन. चांगलं घालवून चांगलं आणणंही परिवर्तन नव्हेच. तो असतो 'बदल'. सुमार आणनं म्हणजे तर अधोगतीच. परिवर्तन नव्हे. फार तर यालाही बदल म्हणा. बदल चांगला असतोच असे नाही. परिवर्तन मात्र चांगलेच असते. याचा अर्थ डॉ. रणजित पाटीलही अमरावती विद्यापीठाचे पदवीधर आहेत असं आमचं मुळीच म्हणणं नाही. डॉ. रणजित पाटील सुप्रसिद्ध अस्थितज्ञ आहेत. परंतु विधान परिषदेत जाऊन त्यांना तेथे पोहोचलेल्या बिल्डरांच्या सहजासहजी न सापडणाऱ्या फासळ्या थोड्यात मोजायच्या आहेत? अनुशेषाचा 'अ' शिकण्यासाठी डॉक्टरांना आगामी किती वर्षे लागतील? तोपर्यंत विदर्भ 'अस्थी' पंजर झालेला असेल. आणि शेवटी डॉ. रणजित पाटील भाजपाचे शिस्तबद्ध शिपाईच ना? भाजपाने बस म्हटले बसले, उठ म्हटले उठले... बी.टीं.च तसं नव्हतं. कॉंग्रेसचा पाठिंबा असतांनाही ते आपल्या मतदारांच्या हक्कासाठी सरकारलाही पालथं घालायचे. कॉग्रेसला न जुमानता प्रश्न मांडायचे. मर मर भांडायचे, कदाचित हेच भाजपाच्याही पथ्यावर पडलं असावं? नव मतदारांना तेच हवं असावं. ठरवा तुम्हीच, परंतु आता एक नक्की. मतदारांनी यावेळी मतदार संघ एका पक्षाकडे सोपवला. त्यांना अपक्ष मंजूर नव्हता. यापुढे येथे पक्षीय राजवटच चालणार. पुढील खेपेस भाजपाला टक्कर देण्यासाठी कॉंग्रेस अधिकृतपणे उतरेल. पक्षांच्या जबड्यात आपली मान या मतदार संघाने दिली आहे. म्हणून आता कधी न शिरलेला जातीयवाद आणि पैशाचा महापूर याही मतदार संघात आता यानंतर वाहणार आहे. पदवीधरांना उमेदवारांकडून निवडणूक भत्ता मिळण्याची शाश्वती आहे. असो डॉ. रणजीत पाटील यांचे अभिनंदन. अमरावती विभागातील अनुशेष, ऊर्जा प्रकल्पांचे महाभूत, शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या, शिक्षणाचा केविलवाणा दर्जा, पदवीधरांची बेरोजगारी, नेट सेट अधिव्याख्यात्यांचे प्रश्न, अमरावती विद्यापीठाचा सुमार दर्जा या प्रश्नांचा त्यांनी सखोल अभ्यास करून प्रश्नांची ते सोडवणूक करोत याच शुभेच्छा!

*मंगळवार, दिनांक ७ डिसेंबर २०१० रोजीच्या दैनिक 'हिंदुस्थान' मध्ये प्रसिद्ध झालेला माधव पांडे याचा लेख.*

# बी प्रक्टिकल

**"अद्वितीय, अलौकिक आणि महापुरुष या अशा शब्दात नेतृत्वाला अडकविले की पराभवाची छाया गडद होते. बीटीसरांचा पराभव एका अर्थाने निस्वार्थ वृत्ती, निरपेक्ष भाव, साधन सुचिता, प्रामाणिकपणा यांचा पराभव आहे. "**

**- माधव पांडे**

परवा विधानपरिषदेतून ११ सदस्य निवृत्त झाले. रामनाथ मोथे, सुधिर तांबे, विक्रम काळे व राजेंद्र जैन पुन्हा परिषदेत आले. निवृत्त सदस्यांमध्ये आ.बी.टी.देशमुख यांचा समावेश होता. पाच वेळा विधानपरिषदेची निवडणूक जिंकणारे बी.टी.या वेळी पराभुत झाले. निरोप समारंभात अजितदादा पवार, छगन भुजबळ भावपूर्ण बोलले. बी.टी.सभागृहात हवे होते. मग अडलं कुठं. राजकारण्यांच्या बोलण्यावर विश्वास ठेवू नका. मगरमच्छ के आसु. बीटींचा पराभव असमर्थनिय आहे. जिल्ह्यात बी.टी. समर्थक व विरोधक त्यांच्या पराभवाची चर्चा करीत आहेत. ११ पैकी ४ सदस्य ज्याअर्थी विधान परिषदेत पुन्हा गेले तेंव्हाच **७ सदस्यांना घरी बसावे लागले हे उघड. तरीही त्यांच्या पराभवाची चर्चा नाही. मग बीटी सरांच्या पराभवाची चर्चा सावत्रिक का होत आहे.?**

अद्वितीय, अलौकीक आणि महापुरुष अशा शब्दात तुम्ही कोणालाही अडकवा. समजून घ्या त्या पुरुषाचा पराभव जवळ आला. जेंव्हा तुम्ही अद्वितीय होता, तेंव्हाच अलौकीक या विरुदाने सजविले जाता. नेतृत्वाच्या मर्यादा असतात हे मान्य करण्याची आमची परंपरा आहे. बीटी सरांच्या पराभवाची खऱ्या अर्थाने चिकित्सा करण्याची इच्छा ज्यांना आहे त्यांनी सर्वप्रथम ही निवडणूक समजवून घेतली पाहिजे. या निवडणूकीत सरांचा पराभव होणार हे उघड होतं. आज हे म्हणायला फार सोपं आहे. चार आठवड्यापासून आपली भेट नाही. आज भेटतो आहे ती पराभवाची मिमांसा घेवून.

चंद्रपुरला माझ्या एका परिचितासोबत भाजपा प्रदेश अध्यक्ष सुधीर मुनगंटीवार यांना चार महिन्यापूर्वी भेटायला गेलो होतो. विषय तिकिटाचा. सुधिरजी म्हणाले, अकोल्यात रणजित पाटील काम करीत आहे. आपण संपर्कात राहा. चित्र जवळ जवळ स्पष्ट होत. रणजीत पाटीलांना तिकिट मिळणार आणि मिळालंही, रणजित पाटील विरूद्ध बी.टी.देशमुख असा सामना रंगला असं वरवरचं चित्र आहे. खरं सांगा बीटी सरांना रणजित पाटील विरोधक असु शकतात? नाही. कुठल्याच वळणावर, कुठल्याच मार्गावर बीटी सर आणि पाटील याची गाठ भेट नाही. व्यवसाय एक नाही. कुठली खुन्नस नाही. तरीही ९३६० मतांनी रणजित पाटीलांनी बीटींना पराभुत केलं.

या निवडणूकीचं वैशिष्ट ज्यांच्या लक्षात आलं त्यांनी बीटींचा पराभव झाला असं घाडसाचं विधान कधी केलं नसतं. तब्बल पहिल्या क्रमांकाची १६७५८ आणि दुसऱ्या क्रमांकाची १९०१८ एवढी मत सरांनी घेतली. यापेक्षा जास्त रणजित पाटलांची मत आहेत, त्यामुळे ते विजयी. या लढाईचं कुठलही सुत्र नाही. बीटी सरांची या मतदार संघावर पकड होती आणि ती सुटली असं म्हणू नका. १६७५८ मत घेणारा उमेदवार अलौकीक अर्थाने पराभुत नसतो. मात्र हा सगळा पसारा आम्ही का मांडतो आहोत? लौकीक की अलौकीक हा मुद्दा नाही. पराभव तो पराभव. खरं आहे. बीटींचा पराभव झाला. बीटींचाच कशाला अलिकडे लोकशाहीत लोकशाहीचाच पराभव होतो. आता पराभव नियोजित असतात. कोणाला पाडायचं याचंही नियोजन असत. सगळं स्विकारलं पाहिजे.

माझ्या एका मित्राला बीटी समर्थकाचा फोन आला. पलिकडून तुम्ही अखेर बीटींना पाडलंच, काय मिळवलं. विदर्भाचं नुकसान केलं. कळवळून आणि कळकळीनं ती व्यक्ती बोलत होती. जणू काही झालंच नाही अशा स्वरात माझा मित्र म्हणाला, फायदा काही दिसला नाही त्यामुळे नुकसानाचं काय? त्याच्या या बोलण्यातून जी व्यावहारीकता उघड झाली ती स्विकारण्याची आमची तयारी पाहीजे. जगाचा विचार करणारी माणसं घराकडे दुर्लक्ष करतात असा इतिहास आहे. बीटी सराचा पराभव एका उमेदवाराचा पराभव आहे असं कोणालाचं वाटत नाही. तत्व, मूल्य आणि आचार धर्म पराभुत झाले याची बोच अनेकांना लागली. खरं आहे पण अर्ध सत्य. बीटी सरांनी जो आदर्श उभा केला त्याचा हा पराभव आहे हे मान्य करणे जड आहे. कारण आदर्श कधीही पराभुत होत नसतात.

निष्ठा, प्रामाणिकपणा व पारदर्शकता यांचा पराभव नसून यंत्र, तंत्र व मंत्रणा यांचा हा विजय. आम्ही नेतृत्वावर एवढा विश्वास ठेवतो. मात्र काळावर विश्वास ठेवायला नकार देतो. नेतृत्वाच्या सभोवताल असलेल्या अनुयायांनी सातत्याने काळाचे भान राखले पाहिले. काळ बदलला. आचार धर्म, प्रचार धर्म होत नाही अस सांगणारा दैत्य माध्यमाच्या रुपानं उभा ठाकला आहे. सत्य किती विलक्षण रुप घेते ते या निमित्ताने समोर आले. सार्वजनिक जीवनातलं पावित्र्य टिकवून ठेवतांना काळाचा महिमा लक्षात घ्यायला अनेक लोक नकार देतात. सरांच्या बाबतीत असं तर झालं नसेलं ना?

रणजित पाटलांनी जवळपास ३५ हजार मत नक्की केली होती. या निवडणुकीत पक्षाची मात्रा फारशी चालत नाही. ज्या उमेदवाराकडे मतांचा गठ्ठा असेल तो निवडून येणार. उद्या पाटलांपेक्षा जास्त मत खेचणारा उमेदवार येवू शकतो. त्यामुळे ही निवडणूक बीटींना पराभुत करणारी होती असा समज करुन घेणे चुकीचे. तरीही ही निवडणूक एका वेगळ्या अर्थाने भुतकाळावर मात करणारी ठरली.

बीटींना हे सगळं दिसत नव्हतं अशातला भाग नाही. राज्यशास्त्राचे प्राध्यापक, ३० वर्षाचा संसदिय कामकाजाचा अनुभव, विद्यापीठ ही सगळी संचाराची क्षेत्र असतांना सरांनी हा पराभव ओढून घेतला असं म्हणता येईल का? या सगळ्या प्रश्नांची उत्तरं का शोधावी. रणजित पाटलांबद्दल कुठलीही असुया वा द्वेष नसतांना बीटीसरांची बाजु का घ्यावी. या सर्व वाजुंनी विचार करायला निघालात तर कदाचित या पराभवातून झालेलं नुकसान कधी न भरून येण्याएवढं आहे असं लक्षात येवू शकतं.

बीटीसरांच्या कार्य कर्तृत्वाची गोळा बेरीज ही निवडणुक ठरवू शकत नाही. कोणी आदर्श जीवनाचा वसा घेतला असेल तर तो त्याचा आता वैयक्तीक भाग झालाय. सार्वजनिक जीवनात मूल्य ढासळत आहेत ही केवळ ओरड. आम्ही सगळ्यांनी याला आपापल्या परीनं हातभार लावला. समाजात आदर्शवाद, समता, बंधुता राहीली पाहिजे ही केवळ घोषणा, प्रत्यक्षात काय? बीटीसर आदर्श आहेत. असं केवळ म्हणू नका. किती लोकांनी त्यांचा आदर्श घेतला. विनोबा भावेंनी वैयक्तिक सत्याग्रह केला. सरांचाही तसाच. आम्ही सगळे कौतुककर्ते आहोत. हे सतीचं वाण घ्यायला कोणीच तयार नाही. म्हणून आम्हाला बीटी हवेत. आम्ही स्वार्थी, दुसऱ्यावर जबाबदारी ढकलणारे, बीटींचा पराभव जर असेल तर तो आमच्या स्वार्थीपणात आहे. किती प्राध्यापकांना बीटी व्हावं वाटतं. १६७५८ लोकांनी सरांना पसंती दिली. सर विचार आहेत, आचार आहेत पण प्रचाराच काय, चांगले अनुयायी मिळणं हे महापुरुषाच्या यशाचं गमक असतं. निवडणूक कोणाचीही पात्रता ठरवित नाही. चांगल्या लोकांची संख्या कमी होत आहे. पदवीधरांमधल्या १६७५८ लोकांना आदर्शाला पाठींबा द्यावा वाटला. हे वास्तव आहे काय? नाही. यापैकी कित्येक लोक व्यावसायिक सोयींनी पाठिंबा देतात.

या निवडणूकीकडे असंच बघायचं असेल तर जातीपातीचा ही विचार करावा लागेल पण हे सगळं सराना ना मंजूर. वास्तव असलं तरी टाळायचं आहे. गेली तीस वर्ष हे जुळून आलं. आज नाही. वर्तमानाने खणखणाट केलाय. बीटीसर उद्या विधीमंडळात नसतील. अनेक व्यावसायिक उघडे पडतील. त्यांचे इंन्टरेस्ट दबतील. पण यासाठी आम्हाला बीटीसर हवे होते काय? निखाऱ्यावरुन चालण्यासाठी कोणीतरी अवलीया आम्हाला हवा होता. धर्माचा ध्वज घेवून त्यागाचं पात्र धरायला आमचा प्रतिनिधी हवा होता. खुप साऱ्या अपेक्षा होत्या. सरांनी त्या पूर्ण केल्या.

काळ बदलला. सगळ्यांना हे मान्य होतं. दहा निवडणूकींचा अनुभव असणारे राजकारणी अवती भोवती होते, तरीही मतांचा जोगवा कोणीच का मागितला नाही. ही निवडणूक एका अर्थाने निवडीपुरती मर्यादित नव्हती. रणजीत पाटीलही योग्य उमेदवार आहेत. प्रश्न जे आता कधी शक्य नाही त्याचा आहे. आम्ही आमच्यातली मोठी माणसं ओळखण्यात कमी पडतो. दाजीसाहेबांना आम्ही ओळखलं नाही. समजवून घेतो तो आमचा स्वार्थ. या जगाचा विचार करा रे. जवळची दूरची सगळीच माणसं अशा पराभवाला कारणीभुत असतात. मुल्यांची जोपासना करण्याची जबाबदारी आता कोणी खांद्यावर घेणार नाही. उद्याच्या भारतात आम्ही आदर्श नेता दाखवू शकणार नाही. तसंही आत्म्याचा आवाज ऐकायचा कोणाला? बीटी सरांच्या पराभवाची या सर्व अंगानी जबाबदारी स्विकारली पाहिजे. सर कुठे पराभुत झाले. पराभुत झाली ती आमची दृष्टी, निस्वार्थी वृत्ती, निरपेक्षभाव, पारदर्शक व्यवहार, साधन सुचिता, प्रामाणिकपणा आणि तळमळ, तगमग हे सगळं काळाच्या ओघात वाहून गेलंय.

*The Hitavada Suturday, December 4, 2010*

# The House bids warm farewell to BT, the giant among stalwarts

**by Kartik Lokhande**

Nagpur, Dec 3 : IT was one of the rarest of rare occasions when appreciation and ovation replaced normal scenes of accusations, accrimony, and walkouts and -- basking in the glory of 30 years of rich experience in value-based politics-- a gratituous B.T.Deshmukh accepted happily the respect paid by the Legislative Council in unison. All pairs of eyes, in the House and in the galleries alike watched BT as he said in response, "Values will live on, democracy will live on. Thanks for everything you all have given me.'

The occasion was bidding farewell to retiring members of Legislative Council. A moved lot, the members of the Upper House including the ministers and the legislators, did not hesitate even for a moment in saying that they would miss value based politics which BT practised throughout his rich tenure of 30 years in the same House. BT was recently defeated by new comer Ranjit Patil in Amravati Division Graduates' Constituency election after a long tenure as MLC. His tenure as MLC is coming to an end in a couple of days.

Right from Chief Minister Prithviraj Chavan and Deputy Chief Minister Ajit Pawar to Leader of Opposition Pandurang Phundkar and Shiv Sena Leader Diwakar Raote, everybody appreciated BT's contribution in enriching the quality of debates in the Council. Chairman Shivajirao Deshmukh said that the House would never forget BT. All were unanimous in recognising the veteran as the ""One Man Army" when it came to fighting for backlog removal of Vidarbha region.

""He is a giant among stalwarts. May it be fighting a pitched battle for removal of Vidarbha's backlog or may it problems of teachers, he was ready with references and valid points. He is truly a man of character, a man of action," said Ajit Pawar against whom BT has been fighting a battle for removal of irrigation sector backlog. Home Minister R.R.Patil said that BT's defeat was not only a defeat of value-based politics, but also of the system in its entirety. Public Works Minister Chhagan Bhujbal, recalling his association with BT, said, the House will miss BT. "He is a man like a lighthouse for even the ministers and new members. Whenever he asked questions, the minister concerned would always feel ill-prepared. That, he will not be a part of this House is a great loss not only to Vidarbha but also to the parliamentary democracy," Bhujbal said.

Kapil Patil, Hemant Takle, Suresh Nawale and other members also expressed their gratitudes towards B.T.Deshmukh for guiding them regularly on various issues, especially on behavior in the House. Ulhas Pawar, who has worked with BT in days of student movement, rightly put in words the feelings of the House by saying, "Today, the Council is emotional bidding farewell to its most sincere, most virtuous member."

All the while, a frail-looking BT listened to everything with his characteristic keenness. And, when he rose to respond, everyone in the House and the press as well as visitors'. galleries merged with the pin-drop silence eager to be broken by him. "Defeat is an out come in parliamentary democracy and I accept it with all my heart, Human body and peoples' representation are not eternal, I had seen defeat coming. But, I am happy that I chose defeat over compromise," he began. In a short but highly impressive speech that will be remembered for a long time to come, BT continued, "I just want to say that in politics, attack is unavoidable. However, while attacking someone, we should not nurture enmity in our heart. While giving step-motherly treatment, we should not lose brotherhood totally. If we are in majority, we should not be careless, and if we are in minority, we should not be impetuous. That is all I want to say." and, he concluded with a simple, "I am thankful to everybody for all cooperation you extended. I know, despite challenges, values will live on, democracy will live on.

# 'Money-bags posing grave threat to democratic values'

Nagpur, Dec 3 (Staff Reporter) : In times in which money-bag politicians hold the sway, Some of them found themselves condemning the role money plays in electoral politics. This was witnessed by Maharashtra Legislative Council on Friday as the House said farewell to B.T.Deshmukh. All said, BT lost the recent election due to influence of money pumped in by Sophiya power Company Limited, a private power producer whose project BT has been opposing tooth and nail. Many, including Home Minister R.R.Patil, wondered if political parties would allow corporates to decide who should sit in the Legislative Houses. B.T.Deshmukh's defeat has introduced that fear in the mind, some added.

While bidding a farewell to B.T. Deshmukh who stood as values personified, the Legislative Council could not resist from becoming vocal about unsettling changes in politics.

The changes -- from value -based politics to elective merit based politics-- that have shaken democracy to the core. Chairman of Legislative Council Shivajirao Deshmukh, Deputy Chief Minister Ajit Pawar, Home Minister R.R. Patil, public Works Minister Chhagan Bhujbal, Leader of Opposition Pandurang Phundkar, Shiv Sena leader Diwakar Raote and other members expressed concerns over the money-bags trying to take control of Parliamentary democracy, all referring to defeat of BT. Calling BT a spiritually elevated personality, phundkar said that BJP's candidate Ranjit Patil won the Graduates' Constituency elections in Amravati Division defeating BT. "We thought that we may not succeed, but our workers worked really hard. However, I must say that Sophiya Power-- against whom against whom BT is fighting - also damaged BT's prospects," he added. That was followed by Ajit Pawar stressing on the need to formulate a law to regulate malpractices -- that have become order of the day-- in Legislative Council elections. ""Today, capacity to spend and elective merit is valued more than individual character," he lamented.

Shivajirao Deshmukh reminded the House that previously also the House had passed resolutions and sent to the Central Government. "Now, everyone should pursue the matter to save democracy from money-bags who do not mind spending Rs. 100 crore in Legislative Conucil elections, "he observed. Diwakar Raote blamed Sophiya Power for BT's defeat and said that if corporates decide who should get elected, no expert may win Council seat on merit.

"It is not the defeat of BT, but of the whole system. " said R.R.Patil, adding, "Sophiya's money power worked against BT. It is time to give a serious thought. It is a defeat of democracy if contractors/business houses stop scholarly persons from getting elected to this House." He remained that previously he had suggested an amendment to The Representation of the People Act, and stressed that the Central Government considered it. "We all know of examples of horse-trading of legislators. Legislators, corporators, ZP members take money. In future, parties would accept money. If money-bags control politics. It is a grave threat to democracy said the Home Minister.

Bhujbal also lamented, ""today "Laxmiputra" (money-bags) are entering Legislative Houses and "Sarawatiputra" (intellectuals) are staying away from them. Legislative Council is supposed to be platform for intellectuals from various fields, but if use of money power continues increasing, The House will lose its value," he cautioned. Kapil Patil added. "Extra political powers are deciding who should go to the Legislative Houses. Hence, we need to give it a larger thought." Ulhas Pawar also expressed his concerns.

*गुरुवार, दिनांक २ डिसेंबर २०१० रोजीच्या दैनिक 'जनमाध्यम' मध्ये प्रसिद्ध झालेला प्रदीप भाकरे याचा लेख.*

# बीटींचा पराभव जिव्हारी लागणारा

**प्रदीप भाकरे**

१९८० पासून सतत अमरावती विभागातील पदवीधरांचे नेतृत्व करणाऱ्या बी.टी.देशमुखांना यंदा चुरशीच्या लढतीत पराभवाला सामोरे जावे लागले. यंदाच्या निवडणूकीत प्रथमच आपसातील हेवेदावे आणि अंतर्गत गटबाजीला मुठमाती देत भाजपने डॉ. रणजीत पाटील यांना रिंगणात उतरविले होते. त्यांच्यासाठी प्रदेशाध्यक्ष मुनगंट्टीवार यांच्यापासून भाजपचा प्रत्येक पदाधिकारी झटला आणि कामगिरी फत्ते झाली. ३० वर्षे विधीमंडळाचे सभागृह दणाणून सोडणाऱ्या बीटींचा पराभव झाला आणि रणजीत पाटलांच्या रुपाने एक तरुण तुर्क विधानपरिषदेत पोहोचला. रणजीत पाटील यांनी मिळविलेल्या विजयश्रीबद्दल कुठलाही आक्षेप नाही. मात्र, बीटींचा झालेला पराभव जिव्हारी लागण्यासारखा आहे.

ज्या अभ्यासू वृत्तीने, तळमळीने आणि आत्यंतिक पोटतिडकीने बीटींनी पदवीधरांसोबत, सिंचन अनुशेषाचा प्रश्न लावून धरला, ती पोटतिडीक अनेकांनी अनुभवली आहे. ३० वर्षात कितीतरी मुख्यमंत्री, मंत्री बदलले असतील. मात्र बीटी तेच राहिलेत. नवीन येणाऱ्या प्रत्येक मंत्र्यांनाच बीटींविषयी आदरयुक्त भीती होती. पृथ्वीराज चव्हाण यांच्या मंत्रीमंडळात शालेय मंत्रीपदाचा कार्यभार सांभाळल्यानंतर राजेंद्र दर्डा हे बीटींचे मार्गदर्शन घेतात आणि काहीही मदत देण्यास तयार होतात, या एकाच घटनाक्रमामध्ये बीटींचे नेतृत्व गुण लपले आहेत.

विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या सिंचनाच्या अपुऱ्या सोईमुळे होत असल्याचा अहवाल एस. स्वामीनाथन यांनी दिला होता. शेतकरी आत्महत्येमागील ही नेमकी बाब हेरून बीटींनी सिंचन अनुशेषाचा प्रश्न कित्येक वेळा लावून धरला आणि विदर्भासाठी मुख्यमंत्र्यांना तथा पंतप्रधानांना पॅकेज जाहीर करावे लागले. हे पॅकेज बीटींच्या यशाचे गमक आहे. बीटी काय आहेत हे त्यांच्या पक्षीय विरोधकांना सुद्धा विचारा. सभागृहात बीटी सरांचा प्रश्न असला की मंत्री घरून गृहपाठ करुन येतात हा अनुभव आहे आणि तो अनुभव अनेक मंत्र्यांनी वा मुख्यमंत्र्यांनी जाहीर सभांमधून प्रचंड जनसमुदायासमोर कथन केला आहे. यावरून बीटींच्या अभ्यासू वृत्तीची कल्पना यावी, हेल्पलाईनच्या माध्यमातून सोफिया प्रश्नी राज्यशासनाला व मंत्रीमंडळातील अनेक चेलाचपाट्यांना उघडे पाडण्यात बीटींचा सिंहाचा वाटा आहे. अजित पवारांनी सोफियाला मदत व्हावी यासाठी रातोरात कसे नियम बदलविले, कायद्यात कशा सुधारणा केल्यात हे बीटींशिवाय कुणी उघडच करु शकत नव्हते कारण सत्ताधिशांच्या उरावर नाचण्याची ताकद फक्त आणि फक्त बीटींमध्येच होती. सलग ३० वर्षे जो व्यक्ती आमदार म्हणून पदवीधरांचे प्रतिनिधीत्व करतो, त्याला अनेकदा मंत्रीपदाची ऑफर दिल्या जाते ती ऑफर बीटींनाही कित्येकदा मिळाली मात्र, तत्वनिष्ट असणाऱ्या बीटींनी ती नाकारली.

सोफिया प्रश्नावर अजित पवार, तत्कालीन मुख्यमंत्री अशोक चव्हाण आदिंची सभागृहामध्ये बोबडी वळली होती. बीटींनी ज्या अभ्यासू वृत्तीने सोफिया प्रकल्पाचा सांगोपांग अभ्यास केला ती विजीगिषू वृत्ती मोजक्या लोकप्रतिनिधींमध्ये आढळून येते. बीटींच्या पराभवामुळे त्यांचा हा वारसा रणजीत पाटील यांच्याकडे वळला आहे. रणजीत पाटील उच्चविद्याविभूषित आहे, ते हुशार आहेत. त्याबाबत कुठलाही किंतू नाही. मात्र, राजकीय ज्ञानाचे काय? डॉक्टरी पेशातून वेळ काढून ते थेट आमदार झाले आहेत. त्यांना राजकीय पूर्व इतिहास नाही. भाजपनेही पैसेवाला गडी हेरून रणजीत पाटलांना अधिकृत रसद पुरविली आणि बीटीविषयी ज्यांना ज्यांना आदर आहे, ज्यांना अत्मियता आहे त्यांना बीटींचा पराभव 'सल' ठरला आहे. ही सल अशीच बोचत राहणार.

संपूर्ण निवडणूकीमध्ये बीटी विरुद्ध २२ अशीच लढत पाहायला मिळाली. बीटींवर हीन पातळीवर आरोप केल्या गेले. मात्र त्या आरोपांचे बीटींनी कधी खंडन केले नाही. आरोप-प्रत्यारोपाच्या या धुराळ्यात बीटींचा पराभव घडवून आणल्या गेला. विरोधासाठी विरोध करणारे अनेक उमेदवार बीटींविरोधात एकवटले होते. वयाच्या पंचहत्तरीमध्ये सत्तेचा मोह का? असा सवाल करून विरोधकांनी रान उठविले त्यावर बीटीनी उत्तर द्यायला हवे होते. मात्र, बीटीनी एकंदरीतच आरोपांचे खंडण न केल्यामुळे मतदारांमध्ये चुकीचा मॅसेज गेला आणि विरोधी उमेदवारांची आरोपांची मोहीम फत्ते झाली. ३० वर्षात बीटींनी काहीही केले नाही असे छातीठोकपणे सांगणाऱ्या काही डॉक्टर उमेदवारांनी तरी विद्यापीठात असतांना काय मोठे दिवे लावले, हा प्रश्न त्यांनी स्वतःलाच विचारावा. मात्र स्वतः निवडून आलो नाही तरी बेहत्तर, मात्र बीटींना पाडणारच अशी एककल्ली मोहीम राबविणाऱ्यांनी बीटींच्या पराभवावर पेढे वाटले असावे. काही उमेदवारांना स्वतःची कुवत माहित होती. आपण निवडून येणार नाही. मात्र, बीटी पडले तर स्वतः जिंकल्याचा आनंद होईल, अशा आविर्भावात काही उमेदवारांनी बीटींना टीकेचे लक्ष केले. डॉ. रणजीत पाटील हा उमदा तरूण विधानपरिषदेत पोहोचला हे मतपेटीवरून सिद्ध झाले आहे. त्यामुळे त्याचे स्वागत करावेच लागेल.

**रणजीत पाटलांचे मोठेपण**

भाजपचे नवनिर्वाचित आमदार डॉ. रणजीत पाटील यांनी आज पत्रकार परिषदेपूर्वी बीटी सरांच्या घरी जाऊन त्यांचे आर्शीवाद घेतले. बीटी आमचे आदर्श आहेत. गेल्या ३० वर्षापासून ज्या सभागृहात बीटी वावरले त्या सभागृहात जाण्याचा योग बीटींनाच हरवून आपल्याकडे आला आहे. निवडणूकीमध्ये विजय आणि पराभव होतच असतात. आपण बीटींचा पराभव केला असे म्हणणार नाही. आमदारकीची बॅट बीटींनी समोर नेण्यासाठी आपल्या हातात दिली अशा शब्दात रणजीत पाटील यांनी बीटींविषयी कृतज्ञता व्यक्त केली. या कृतज्ञतेपेक्षा बीटींना त्यांच्या आदर्शपणाची आणखी वेगळी कुठली पावती असू शकेल.

*सोमवार, दिनांक ६ डिसेंबर २०१० रोजीच्या दैनिक 'लोकमत' मध्ये प्रसिद्ध झालेल्या विधानपरिषदेच्या 'साप्ताहीक समालोचन' मधील काही मजकूर.*

## साप्ताहिक समालोचन
## विधान परिषद

तिसऱ्या दिवशीच्या कामकाजातील डोळ्यांच्या कडा ओल्या करणारी बाब म्हणजे अभ्यासू आणि संसदीय कामकाजाची खडान्खडा माहिती असलेले बी.टी.देशमुख यांना निरोप देतांना त्यांनी दिलेले भाषण म्हणजे बी.टी.च्या अनुभवांचा महासागरच होता.

या सभागृहात अनेक वर्षे काढलेले बी.टी. शिक्षक मतदार संघाची निवडणूक हरल्यामुळे त्यांचे हे शेवटचे भाषण होते. यंदा सभागृहातील त्यांचे भाषण ऐकताना दोन्ही बाकावरील सदस्य आत्ममग्न झालेले होते. सदस्यांना आत्मचिंतन करायला लावणाऱ्या बी.टी.नी सभागृहाला बरेच काही दिले. विशेषतः दोन्ही बाकावरील सदस्यांनी कामकाजाची शिस्त आणि अभ्यास करण्याची वृत्ती बाळगण्याची शिकवण दिली. ते या सभागृहात पुन्हा येतील की नाही हे आज सांगता येत नसले तरी त्यांनी या सभागृहावर पाडलेली छाप मात्र कायम राहणार आहे.

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **CHIEF EDITOR :** Dr.A.G.Somvanshi,Shankar Nagar, AMRAVATI-444 606. **EDITOR :** Prof. S.S. Gawai 1,Abhinav State Bank Colony, Chaprashi Pura, Camp, AMRAVATI 444 602. **PUBLISHER :** Prof. Dhote D.S., 4C, 'Rajdatta', Mahalaxmi Colony, Near Shankar Nagar, Amravati-444 606. Type Setting at NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, Amravati-444 601. **PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/ 2001/4448 Postal Registration No. ATI/RNP/78/ 2009-11 WPP Registration No. NR/ATI/WPP-01/ 2009-11 Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting : **27.12.2010**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, **Amravati-444 601**.

---

To,..........................................................................

..........................................................................

..........................................................................

..........................................................................

..........................................................................